अल्पावधीत
लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला
वाहिलेले
दर्जेदार मासिक

मेहता मराठी ग्रंथजगत

मे २०१४ | किंमत १५ रुपये

महाराष्ट्र दिन ...

शुभेच्छा

मेहता मराठी ग्रंथजगत

मे २०१४ वर्ष चौदावे अंक पाचवा

संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा

अंकाची किंमत
१५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.
प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

अनुक्रमणिका

संपादकीय	५
साहित्यवार्ता	८
पुरस्कार	४५
अभिप्राय	५७
पुस्तक परिचय	६१
इंग्रजी पुस्तक परिचय	१०१
श्रद्धांजली	१०६
बालनगरी	१११

मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ,
माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड,
टेलिफोनभवनसमोर,
पुणे-४११ ०३०
फोन :०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २२४/२२५
E-mail : info@mehtapublishinghouse.com

डिजिटल अंकाची वर्गणी

तीन वर्षांची ३००रु. पाच वर्षांची ४००रु.

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

संवाद.....

वाचकहो,

अक्षय्य तृतीया,

महत्त्वाच्या साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभ मुहूर्त.

श्रीकृष्णाने युधिष्ठिराला सांगितले होते की, 'या तिथीस केलेले दान व हवन क्षयाला जात नाही.' म्हणून हिला 'अक्षय्यतृतीया' असे म्हटले जाते. त्यामुळे देव आणि पितर यांना उद्देशून या तिथीस जे कर्म केले जाते ते सर्व अक्षय (अविनाशी) होते. या दिवशी सुरू केलेल्या कोणत्याही शुभ कार्याचे फळ 'अक्षय्य' (न संपणारे) असे मिळते. म्हणूनच पावसाळा तोंडावर घेऊन येणाऱ्या या 'अक्षय्य तृतीयेच्या' मुहूर्तावर शेतकरी जमिनीतल्या मृत्तिकेची पुजा करणे, मशागत करणे, बियाणे पेरणे, नवीन फळबागा, वनस्पतींची लागवड करणे अशी अनेक शुभ कार्ये करतात. जेणे करून संपुर्ण मानव जातीला पोसणाऱ्या या मृत्तिकेतील धन, धान्याचा कधीही क्षय होऊ नये.

अशा या शुभमुहूर्तावर आपणही एक शुभ कार्य हाती घ्यावं असे आम्हासं वाटते, जेणे करून आपला हा संवाद असाच अक्षय्य राहावा. आपण केलेले लेखन, एखादे पुस्तक वाचल्या नंतरची आपली प्रतिक्रिया, आजुबाजूला घडणाऱ्या गोष्टींवरची तुमची मतं किंवा केवळ स्वान्त सुखायः म्हणून केलेले लेखन तुम्ही आम्हाला ईमेलद्वारे पाठवू शकता.

आपले लेखन ई-मेलने खालील पत्त्यावर पाठवा...

mmgj@mehtapublishinghouse.com

निवडक लेखनाचा अंकात समावेश करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच उत्तम लेखासाठी पारितोषिक म्हणून कोणत्याही एका खरेदीवर ४०टक्के सवलत देण्यात येईल.

तुमच्या पत्रोत्तराच्या अपेक्षेत,

मेहता मराठी ग्रंथजगत

चोवीस तासात घरपोच पुस्तक

ॲमेझॉनने ऑनलाइन पुस्तकविक्रीला आरंभ करून आता दोन दशके होतील. प्रथमपासूनच या कल्पनेला वाचक-ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. कोणतेही पुस्तक ऑर्डर दिल्यावर दोन-तीन दिवसात घरपोच मिळण्याची सोय झाल्याने एखाद्या पुस्तकासाठी ग्रंथदालनात जाण्याची गरज उरली नाही. ऑनलाइनवर त्या पुस्तकाची मागणी नोंदवून त्याची सवलतीची किंमत ॲमेझॉनच्या खात्यावर भरली की झाले! इंटरनेटवर हजारो पुस्तकांची माहितीही बघता येई; एखाद्या प्रकरणाची झलक बघता येई, इतर वाचकांनी त्याबद्दल प्रकट केलेली मते, समीक्षकांनी लिहिलेले अभिप्राय, मुखपृष्ठ, लेखकाची माहिती – संगणकावर बघता येई. त्यामुळे वेळ आणि पैसा – दोहोंचीही बचत होऊ लागली. ऑनलाइन पुस्तक विक्रीचा व्यवहार सुरळीत सुरू झाल्यावर पुस्तकांबरोबर खेळणी, संगीताच्या ध्वनीफिती, डीव्हीडी, रेडीमेड ड्रेसेस, फर्निचर वगैरेची विक्रीही ॲमेझॉनने सुरू केली. जी दुर्मिळ पुस्तके होती ती स्कॅन करून ई-बुक्सच्या स्वरूपात ग्राहकांना देण्याचीही सुविधा केली गेली. गुगलने जागतिक ग्रंथालयांमधून उपलब्ध पुस्तकांचे स्कॅनिंग करण्याचा अवाढव्य प्रकल्प राबवला. वीस लाख पुस्तकांचे स्कॅनिंग केले. ती पुस्तकेही ई-बुकच्या वाचकांना मिळू लागली. ही पुस्तके संगणकावर किंवा लॅपटॉपवर वाचावी लागत. त्यामुळे प्रवासात थोडा त्रास होई. तेव्हा ॲमेझॉनने किंडल हे वाचनयंत्र तयार केले. पुस्तकाच्या आकाराचे आणि दोनशे ग्रॅम वजनाचे किंडल कोठेही नेणे-आणणे सहज शक्य असे. त्यावर स्क्रीनवर पुस्तक वाचताना छापील पुस्तक वाचत आहोत असाच अनुभव येई. किंडल हे वाचनयंत्र आरंभी पाचशे डॉलरला मिळे. ते आता

पन्नास डॉलरपर्यंत खाली आले आहे. ई-बुकची किंमत छापील पुस्तकापेक्षा कमी असल्याने किंडलची किंमत कमी झाल्याने ई-बुक एक डॉलरपासून मिळू लागल्याने, शिवाय बरीच पुस्तके मोफत मिळत असल्याने वाचकांची सोय झाली. ॲमेझॉनने लक्षावधी ई-बुक्सची विक्री केली. किंडलसारखी वाचनयंत्रे ग्रंथविक्रेत्यांनीही बाजारात आणली. त्यामुळे स्पर्धा सुरू झाली.

ई-बुक्सना आरंभापासून अमेरिका आणि इंग्लंडमध्ये चांगला प्रतिसाद मिळाला. जर्मनी, फ्रान्स, चीन, जपान या देशातही ई-बुक्सचे सावधपणे स्वागत झाले. ॲमेझॉनसारखी ऑनलाइन रिटेल वितरण व्यवस्था इतर देशात निर्माण होण्यास अवधी लागणारच. पारंपरिक छापील पुस्तकांच्या विक्रीत युरोप-अमेरिकेत घट होऊ लागली. ई-बुक्सची संख्यात्मक विक्री वाढू लागली; परंतु एकूण गोळाबेरीज पाच-दहा टक्क्यांच्या आतबाहेरच राहिली. ॲमेझॉनकडे एकूणच प्रकाशक प्रतिस्पर्धी म्हणून पाहू लागले. चीन, जपान, फ्रान्स, रशिया वगैरे देशांनी ॲमेझॉनला आपल्या भूमीवर पाय ठेवता येऊ नये असे धोरण ठेवले. तरीही ॲमेझॉनची घोडदौड चालूच आहे.

भारत ही एक मोठी बाजारपेठ आहे; आणि इंग्लिश भाषा ही उच्च शिक्षणाचे माध्यम असल्याने भारतात इंग्रजी जाणणाऱ्यांची संख्या वीस-तीस कोटींच्या दरम्यान आहे. ती अमेरिका-इंग्लंडपेक्षाही जास्त आहे. त्यामुळे ॲमेझॉनने भारतात आपले बस्तान बसवण्याचा प्रयत्न करणे स्वाभाविकच आहे. दहा महिन्यांपूर्वी ॲमेझॉनने भारतात आपल्या वितरणाच्या दृष्टीने तयारी सुरू केली. भारतात पुस्तक विक्री, खेळणी, भेटवस्तू, चित्रपट-संगीत डीव्हीडी यांजबरोबर किराणा माल, कपडे, इलेक्ट्रॉनिक वस्तू, फ्रीज, वॉशिंग मशिन्स अशा सर्वच प्रकारच्या रिटेल ऑनलाइन विक्रीचे उद्दिष्ट ॲमेझॉनने आपल्यापुढे ठेवले आहे. शॉपिंग मॉलप्रमाणेच सर्व प्रकारचा माल ॲमेझॉनमध्ये मिळू शकेल. पण ऑनलाइन. तो ग्राहकाला २४ तासात घरपोच मिळावा म्हणून वाहतूक-वितरण व्यवस्थेतील सोयी-गैरसोयींचा अभ्यास चालू आहे. ॲमेझॉनची सध्या दरवर्षी उलाढाल ७५ अब्ज डॉलर्सच्या घरात आहे. भारतात रिटेल ऑनलाईनच्या क्षेत्रात फ्लिपकार्ट आणि स्नॅपडील या दोन मोठ्या कंपन्या आपले हातपाय पसरत आहेत. गावोगाव गोडाऊन्स ठेवून अल्पावधीत कुरियरद्वारे ऑनलाइन वितरण व्हावे यासाठी नवनवीन कल्पना लढवत आहेत. भारतात क्रेडिट कार्डचा वापर करणारे लोक कमी आहेत म्हणून कॅश अगेन्स्ट डिलिव्हरी ही कल्पना

फ्लिपकार्टने पुढे रेटली आहे.

ॲमेझॉनने भारतातील टपाल खात्याचा वापर करण्याचे ठरवले. परंतु २४ तासात ग्राहकाला मालाची डिलिव्हरी देणे जमत नाही. शिवाय डिलिव्हरी देण्यासाठी एखाद्या ग्राहकाच्या घरी गेल्यावर ते बंद असते. तेव्हा चौकाचौकात असणाऱ्या किराणा दुकानदारांमार्फत डिलिव्हरीची यंत्रणा उभी करता आली तर – या कल्पनेवर ॲमेझॉनचे सध्या मंथन चालू आहे. आजमितीला ॲमेझॉन वर्षाला दीड कोटी वस्तूंची भारतात विक्री करते. ४००० दुकानदारांचे सहाय्य त्यासाठी घेते.

ॲमेझॉनमुळे पुस्तकांबरोबर इतर ग्राहकोपयोगी वस्तूंच्या विक्रीची एक कार्यक्षम यंत्रणा उभी राहू शकेल.

Books take out heritage to the next generation. Good books develop imagination, imagination develops creativity, and creativity develops supreme thinking power. The knowledge will make one a wise man in the society.

- Dr. APJ Abdul Kalam

'फेसबुक'चे भारतात दहा कोटी युजर

जगातील आघाडीचे सोशल नेटवर्क असणाऱ्या 'फेसबुक'ने भारतातील दहा कोटी युजरचा टप्पा पार केला आहे.

'भारतातील मोबाइल इंटरनेटची बाजारपेठ दिवसेंदिवस विस्तारत आहे. इंटरनेटच्या वाढत्या वापराचा फायदा फेसबुकला झाला आहे,' अशी माहिती 'फेसबुक इंडिया'चे प्रमुख (ग्रोथ अँड मोबाइल पार्टनरशिप) केविन डिसुझा यांनी दिली. सध्या भारतात १० कोटींहून अधिक ॲक्टिव्ह फेसबुक युजर आहेत.

चालू वर्षअखेर भारतातील 'फेसबुक'चा ॲक्टिव्ह यूजरबेस अमेरिकेच्या यूजरबेसला मागे टाकण्याची शक्यता असून, तो १५ कोटींवर जाण्याचा अंदाज आहे. सध्या जगभरात 'फेसबुक'चे १२३ कोटी ॲक्टिव्ह यूजर आहेत. बहुतांश यूजर हे विकसनशील देशांमधीलच आहेत. या पार्श्वभूमीवर कंपनीने आशिया खंडात विस्तारीकरणाच्या योजना आखल्या आहेत. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून 'फेसबुक'ने व्हॉटस ॲप' ही सोशल नेटवर्किंग कंपनी १९ अब्ज डॉलर मोजून विकत घेतली. या व्यवहारांतून कंपनीशी नवे ४५ कोटी यूजर जोडले गेले.

भारतातील 'फेसबुक'ने २००८ मध्ये हैदराबाद येथे पहिले कार्यालय थाटले. त्यावेळी देशातील यूजरची संख्या सुमारे ८० लाख होती. सध्या भारतात १६.४८ कोटी ॲक्टिव्ह इंटरनेट यूजर आहेत. त्यातील निम्मे पॉकेट इंटरनेटच्या मदतीने इंटरनेटचा वापर करतात, अशी माहिती 'ट्राय-ने दिली.

सात हा जगातील सर्वांत आवडता क्रमांक

शून्य ते नऊ या दहा आकड्यांच्या खेळावर साऱ्या विश्वाचे व्यवहार

चाललेले आहेत. आर्थिक व्यवहार असो, नाहीतर अंतराळात यानाचे प्रक्षेपण करायचे असो, कोणत्याही क्षेत्रात आकड्यांशिवाय काम चालू शकत नाही. एखाद्या ठराविक तारखेशी काही आठवणी निगडित असतात म्हणून, किंवा एखादा आकडा 'लकी' ठरतो म्हणून एखाद्या आकड्याविषयी विशेष प्रेम वाटू लागते आणि मग तो फेव्हरिट आकडा बनतो. अशा कोणत्या ना कोणत्या कारणामुळे सर्वाधिक व्यक्तींच्या मनावर सत्ता गाजवायचा मान 'सत्त्या'ला मिळाला आहे.

नुकत्याच घेण्यात आलेल्या एका ऑनलाइन सर्वेक्षणामध्ये 'तुमचा फेव्हरिट आकडा कोणता' असा प्रश्न विचारण्यात आला होता. सर्वेक्षणाच्या आधारे, सात हा जगातील 'फेव्हरिट क्रमांक' असल्याचा दावा ॲलेक्स बेलॉस या ब्रिटिश लेखकाने केला आहे. ४४ हजार जणांना हा प्रश्न विचारण्यात आला होता. सातच्या खालोखाल तीन हा आकडा लोकप्रिय आहे. विषम आकडे आवडणाऱ्या लोकांचे प्रमाण साठ टक्के आहे; तर ११० हा आकडा कोणालाही आवडत नसल्याचे निष्कर्षातून दिसून आले.

सर्वेक्षणात सहभागी झालेल्यांनी आकड्यांना दिलेली विशेषणे

एक : स्वतंत्र, मजबूत, शूर

दोन : सावध, हुशार, नाजूक, सहानुभूती असलेला

तीन : श्रीमंत, बढाईखोर, अहंमन्य

चार : मवाली

भारतीय बाजारपेठ हॉलिवूडपट!

हॉलिवूडपट ५०-५० दिवस तिकीट खिडकीवर टिकून राहात कोट्यवधींची कमाई करीत आहे. हॉलिवूडपटांच्या भारतातील या लोकप्रियतेचा अधिकाधिक लाभ उठवण्यासाठी वॉर्नर ब्रदर्स, फॉक्स स्टार स्टुडिओ आणि पीव्हीआर सिनेमा यासारख्या संस्थांनी भारतीय सिनेबाजाराकडे लक्ष केंद्रीत केले आहे. या वर्षी ३० हून अधिक हॉलिवूडपट देशात झळकणार आहेत.

आतापर्यंत हॉलिवूडपटांचे भारतातील व्यवसायाचे प्रमाण आठ ते १२ टक्के होते. आता हे प्रमाण ३५ टक्क्यांपर्यंत गेले आहे. यात प्रामुख्याने नेटप्रेमी युवापिढीचा सहभाग आहे, असे मत पीव्हीआर समूहाचे विपणनप्रमुख गिरीश वानखेडे यांनी नोंदवले. अमेरिकेत झळकणारे

हॉलिवूडपट भारतातही त्याच आठवड्यात झळकतात.

'स्पायडरमॅन'सारख्या फ्रँचायजी चित्रटपटांचाही हॉलिवूडपटांच्या लोकप्रियेतत मोठा वाटा आहे. त्यांचा चाहता वर्ग आधीपासून तयार झालेला असल्याने नव्या सिक्वलनाही सुरुवातीपासून चांगला प्रतिसाद मिळतो.

'भाषांतरित चित्रपट' बाजारही तेजीत आहे. हॉलिवूडपट हिंदी, तामीळ आणि तेलुगू यातही भाषांतरित केले जातात. त्यामुळेच त्यांची लोकप्रियता वाढते. अगदी मालेगाव आणि नंदुरबारसारख्या दुर्गम भागातही हे चित्रपट पाहिले जातात. दरम्यान, फॉक्स स्टार स्टुडिओचे मुख्य कार्यकारी अधिकारी विजय सिंग यांनीही आगामी वर्षात 'एक्समेन', 'रिओ', 'नाईट ॲट म्युझियम'सारख्या फ्रँचायझी चित्रपटांसह १५ हॉलिवूडपट भारतात प्रदर्शित करणार असल्याची माहिती दिली.

'फेसबुक मूव्ही'

व्हॉटसॲप, टेलिग्राम यामध्ये फेसबुकला विसरू नये यासाठी 'फेसबुक मूव्ही' ही कल्पना लढवलेली असावी. फेसबुकने दिलेल्या या पर्यायामुळे आपल्या आयुष्यातील अनेक प्रसंगांचे एकत्रीकरण पाहायला आनंद वाटतो.

सोशल मीडियामधील सर्वाधिक लोकप्रिय फेसबुक नेहमीच नावीन्यपूर्ण आणि आकर्षित करणारे पर्याय नेटिझन्सना देते. फेसबुकवर अनेक जण तासन्तास घालवतात.

स्टेटस, फोटो अपलोड, व्हिडिओ अपलोड, लाइक, कॉमेंट, शेअर, डिसलाइक अशा पर्यायानंतर आता फेसबुकने 'लुकबॅक' अर्थात आपला 'फेसबुक जीवनपट' तयार करण्याची संधी दिली आहे. यातून जुन्या, नव्या आठवणींचा खजिना तयार मिळतो. शिवाय त्याला संगीतही दिले जाते. एक मिनिट दोन सेकंद कालावधीचा हा व्हिडिओ आपला जीवन प्रवास पॉवर पॉइंट प्रेझेंटेंशनमधून उलगडतो.

लाइफ इव्हेंट आणि आठवणीतील क्षणांना प्राधान्य देत https://facebook.com/lookback या एका क्लिकवर तयार होणारा 'फेसबुक मुव्ही' आपल्या मित्रांना दाखवण्यासाठी प्रत्येक फेसबुक युजर उत्सुक आहे.

‘इंडियन लिटरेचर ॲब्रॉड उपक्रम

भारतीय भाषांतील दिग्गज लेखकांचे साहित्य इंग्रजीशिवाय जगभरातील अन्य भाषांमध्येही जावे, या उद्देशाने भारतीय साहित्य अकादमीने सुरू केलेल्या ‘इंडियन लिटरेचर ॲब्रॉड’ या उपक्रमाला उत्साहवर्धक प्रतिसाद मिळतो आहे. ज्या भारतीय लेखकांच्या साहित्याला सर्वाधिक मागणी येत आहे, त्यात मराठीतील सहा सात साहित्यिकांचा समावेश आहे.

भारतीय लेखकांच्या साहित्याला जर्मन, फ्रेंच, स्वीडिश, जपानी, रुमानियन, पर्शियन आदी अनेक भाषांतील प्रकाशकांकडून मागणी आहे. यादृष्टीने विदेशात ज्या निवडक २०-२५ भारतीय लेखकांना विशेष मागणी आहे, त्या यादीत भालचंद्र नेमाडे, दिलीप चित्रे, विंदा करंदीकर, व्यंकटेश माडगूळकर, भाऊ पाध्ये, विजय तेंडुलकर ही मराठी नावे दिमाखाने झळकत आहेत. दिल्लीत फेब्रुवारी मध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय पुस्तक प्रदर्शनात रवींद्रनाथांपासून भैरप्पा व विजय तेंडुलकरांपर्यंत दिग्गजांचे साहित्य इंग्रजीत उपलब्ध होते. पण, अन्य भाषांत ते आढळत नाही. याउलट अन्य भाषांतील पाब्लो नेरूद (स्पॅनिश) किंवा ऑक्टोव्हिया पाझ यांच्यासारख्या अनेक नामवंतांचे उत्तमोत्तम साहित्य हिंदीत बऱ्यापैकी आले आहे.

भारतीय भाषांतही विपुल लेखन होते. मात्र त्या तुलनेत भारतीय साहित्याचे विदेशी भाषांत जाण्याचे प्रमाण कमी आहे.

लाखे यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

“उत्तम गाणे लिहिता येणे ही परमेश्वराची देणगी आहे. परंतु आपल्याकडे जास्तीत जास्त दुर्बोध आणि न कळणारे लिहिले की ते श्रेष्ठ आहे असे लोक आपोआपच मानू लागतात. परंतु चांगली कविता आणि गाणी तुमच्या हृदयाला साद घालत असतात,” असे मत डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी व्यक्त केले.

कवी राजन लाखे लिखित ‘सौंदर्याच्या गर्भातून’ आणि ‘मन माझे मी मनाचा’ या काव्यसंग्रहांचे प्रकाशन कविवर्य मंगेश पाडगावकर यांच्या हस्ते झाले. या वेळी डॉ. माधवी वैद्य, दिलीपराज प्रकाशनाचे राजीव बर्वे आणि अनमोल प्रकाशनाचे नरेंद्र नांदुरकर उपस्थित होते.

“मराठीत हृदयाला भिडणारी कविता लिहिणारे फार थोडे आहेत. पाडगावकर हे त्यातील एक आहेत. त्यांच्या गाण्याने मराठी साहित्य आणि

संस्कृतीला समृद्ध केले आहे,'' चांगले गाणे हे सुरांचा शोध घेत जाते. पाडगावकरांच्या गाण्याने मराठी साहित्य आणि संस्कृतीला समृद्ध केले आहे. लाखे हे सत्याच्या उपासनेत रमणारे कवी असल्याचेही त्यांनी सांगितले.

या प्रसंगी लाखे यांच्या कवितांचा संगीतमय आविष्कार सादर झाला. सूत्रसंचालन उद्धव कानडे यांनी केले.

ज्येष्ठ नागरिक आनंद मेळावा

''माणूस घडवणे ही समाजाची सर्वांत मोठी समस्या आहे. तरुणांमध्ये सामाजिक नीतिमूल्ये रुजविण्याचे काम ज्येष्ठ नागरिकच करू शकतात,'' असे मत डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांनी ॲस्कॉप ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या दक्षिण विभागाने आयोजित केलेल्या 'आनंद मेळाव्या'त व्यक्त केले. दादासाहेब बेंद्रे, पत्रकार संजय आवटे, नगरसेविका अश्विनी कदम, नितीन कदम उपस्थित होते.

नवलगुंदकर म्हणाले, ''मानवी जीवन ही एक वही असून तिची सर्व पाने स्वच्छ असावी ही संतांची शिकवण आहे. युवाशक्तीकडे सत्याचा अभाव आहे. त्याची जाणीव करून देण्याचे काम ज्येष्ठ नागरिकांनी करावे.'' ॲड. बेंद्रे म्हणाले, ''केंद्र सरकारने ज्येष्ठ नागरिकांसाठी पोटगीचा कायदा केला आहे. मात्र तामिळनाडू व ओडिशा या राज्यांमध्येच त्याचा वापर केला जातो. इतर राज्यांनीही हा कायदा अमलात आणल्यास ज्येष्ठ नागरिकांना त्याचा फायदा होईल.

'चाइल्ड लाइन' संस्थेच्या पाहणीतून धक्कादायक माहिती उघड

वर्गातील एखादी मुलगी आवडते किंवा मुलगा आवडतो म्हणून नकळत होणाऱ्या अल्लड प्रेमाची व्याख्या आताच्या पिढीने बदलली आहे. चिठ्ठ्यांपुरती मर्यादित असलेली ही प्रकरणे आता एकमेकांना 'न्यूड' एमएमएस पाठविण्यापर्यंत पोहोचली असून या 'क्लिप' इंटरनेटवर अपलोड होत आहेत. विशेष म्हणजे, स्वत:ची 'न्यूड' क्लिप इतर मुलांना पाठवताना काहीही गैर वाटत नसल्याचे मुली स्पष्टपणे सांगत आहेत.

मुलांच्या समस्या सोडविण्यासाठी काम करणाऱ्या 'ज्ञानदेवी चाइल्ड लाइन' संस्थेच्या हेल्पलाइनमुळे वेगवेगळ्या सामाजिक स्तरातील मुलांशी सातत्याने संवाद होत असतो. तसेच संस्थेच्या बालसेनेकडूनही शाळेतील

नवे कोरे

लढा लोकपालचा...

उद्रेक आम आदमीचा!

लेखक
धनंजय बिजले

किंमत : २००/-रु.
पोस्टेज : ३०/-रु.



देशात आज ५५ कोटी मोबाईल फोन, तर चौदा कोटी इंटरनेट कनेक्शन्स आहेत. रस्त्यावर दर मिनिटाला वीस नव्या कोऱ्या मोटरसायकल, तर तासाला दोनशे चकचकीत चारचाकी गाड्या दाखल होत आहेत. सुबत्तेची गंगा दुथडी भरून वाहत असताना दुसऱ्या बाजूला जनता भ्रष्टाचार, अत्याचाराविरोधात रस्त्यावर उतरत आहे. 'भारत हा जणू गरीब लोकांचा श्रीमंत देश बनला आहे.' नेमक्या अशा काळातच आम आदमीच्या आणि समाजसेवकांच्या चिवट लढ्याने देशाला 'लोकपाल' मिळाला. अन्यायाविरोधात लोक आता कोणाचे नेतृत्व नसले, तरी संघर्ष करीत आहेत. जिवंत, सशक्त, सळसळत्या लोकशाहीसाठी हे आश्वासक चित्र आहे. समाजाच्या सर्व थरांत सध्या घुसळण सुरू आहे. हे सारे नेमके आताच का घडत आहे? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा केलेला हा प्रयत्न....

देशात बोकाळलेला भ्रष्टाचार, त्याविरुद्धचे सरकारचे बोटचेपे धोरण, लोकपालसाठीचा लढा, अण्णा हजारे यांची सारी आंदोलने, आम आदमी पक्षाची किमया, भारलेली टेक्नोसॅव्ही पिढी सोशल मीडियाद्वारे व्यवस्थेला देत असलेले आव्हान... यांविषयी केलेला हा ऊहापोह!

अत्यंत योग्य वेळी लोकपाल आणि त्यानिमित्ताने देशभर झालेल्या भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनावरील हे एक अभ्यासपूर्ण पुस्तक आहे. पत्रकारिता करतानाच समोरच्या प्रश्नांचा अभ्यास कसा करावा व तो कसा मांडावा, याचे हे उत्तम उदाहरण आहे. सर्व जाणकार नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी हे पुस्तक जरूर वाचावे!

घडामोडींविषयी माहिती मिळत असते. मुलांवर होणारे लैंगिक अत्याचार, मानसिक छळ आणि परीक्षेची भीती या विषयी हेल्पलाइनवर फोन येत असतात. पण गेल्या काही महिन्यांपासून शाळेतील प्रेमप्रकरणे गंभीर रूप धारण करीत असल्याचे फोन येत आहेत, अशी माहिती संस्थेच्या प्रमुख अनुराधा सहस्त्रबुद्धे यांनी दिली.

शाळेतील अल्लड वयात प्रेमप्रकरणे सुरू होतात, ती तत्कालीन असतात इथपर्यंत आपली समज होती. पण हे प्रेम आता विचित्र दिशेला जाते आहे. प्रियकर मुले अलीकडे मुलींना 'तू तुझे न्यूड फोटो किंवा क्लिप पाठव' अशी मागणी करीत आहेत. विशेष म्हणजे मुलींकडून या क्लिप एमएमएस अथवा इतर ॲप्लिकेशनच्या माध्यमातून पाठविल्या जात आहेत. त्यामुळे प्रियकराने माझी क्लिप घेतली; पण ती इंटरनेटवर टाकण्याची धमकी आता तो देतो आहे, प्रियकर मला ब्लॅकमेल करतो आहे, अशा तक्रारी हेल्पलाइनवर येण्यास सुरुवात झाली आहे. यामध्ये १३ ते १७ वयोगटातील विद्यार्थ्यांचा सहभाग आढळून आला आहे. मुलींना स्वत:च्या क्लिप प्रियकराला पाठविण्यात काहीच गैर वाटत नाही. मात्र त्यांना केवळ पालकांना हे कळाले तर काय वाटेल किंवा क्लिप इंटरनेटवर अपलोड झाली तर काय होईल, याचीच भीती वाटते आहे. याशिवाय दहा बारा वर्षे वयाची मुले 'पोर्न वेबसाइट' बघण्यात बराच वेळ घालवतात अशी माहिती बालसेनेच्या मुलांकडून मिळाली आहे.

सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अलीकडे बहुतांश पालक आपल्या मुलांना शाळेच्या वयातच स्मार्ट फोन घेऊन देत आहेत, पण ही मुले या फोनचा वापर कसा करतात किंवा घरी असल्यावर कम्प्युटरवर कोणत्या वेबसाइट पाहतात, याची कल्पना पालकांना नसते. आपल्या मुलांना या गैरप्रकारांपासून वाचविण्यासाठी त्यांच्याशी संवाद साधा, इंटरनेटचे महत्त्व सांगत असतानाच त्यावर कोणतीही माहिती शेअर केल्यामुळे होणाऱ्या तोट्यांचीही त्यांना जाणीव करून द्या, असे आवाहन चाइल्ड लाइनने केले आहे.

'उन्हात बांधलेली घरं'चे प्रकाशन

घरात जन्माला आलेले अपंग आणि मतिमंद मूल म्हणजे ईश्वराने पाठविलेला देवदूत असे मी मानतो. विशेष मुलांना सांभाळताना आई-

वडिलांना मानसिक आधाराची सर्वाधिक गरज असते. परंतु बहुतेक वेळा समाजातून होणारा मानसिक त्रास त्यांना सहन करावा लागतो, अशी चिंता माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी व्यक्त केली.

संध्या देवरुखकर यांनी लिहिलेल्या 'उन्हात बांधलेली घरं' आणि त्यांनी संपादित केलेल्या 'मतिमंदत्व : स्थिती आणि परिस्थिती' या पुस्तकाचे प्रकाशन सकाळ प्रकाशनातर्फे जलतरणपटू आणि युवा अभिनेत्री गौरी गाडगीळ यांच्या हस्ते झाले. सकाळ प्रकाशनाचे मुख्य व्यवस्थापक आशुतोष रामगीर आणि दीपाली चौधरी उपस्थित होते.

धर्माधिकारी म्हणाले, ''सरकारचे अनुदान लाटण्यासाठी अनेक संस्था खोटे अहवाल सादर करतात. परंतु आजही विशेष मुलांसाठी काम करणाऱ्या काही संस्था प्रामाणिकपणे काम करीत आहेत. अहंकार हाच माणसाचा शत्रू असून त्यामुळे माणूस सुख गमावून बसतो. म्हणूनच माणसाने अहंकार बाजूला ठेवून सुखी आयुष्य जगण्याचा प्रयत्न करावा.''

देवरुखकर म्हणाल्या, ''वैद्यकीय उपचार कमी पडतात तेव्हा या समस्येकडे गंभीरतेने पाहणे आवश्यक आहे. या पुस्तकांच्या माध्यमातून विशेष मुलांचे पालक, जवळचे जिवलग यांना थोडा आधार देण्याचा प्रयत्न केला आहे.''

राणी पारसनीस म्हणाल्या, ''मतिमंद मुलांचा बुद्ध्यांक वाढविता येत नाही; परंतु आहे त्या बुद्धीचा योग्य प्रकारे वापर करता येतो. त्यासाठी या मुलांना योग्य प्रशिक्षण दिले पाहिजे.'' गौरी गाडगीळ, डॉ. सुनील गोडबोले आणि गीतांजली हत्तगंडी यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन गीतांजली जोशी यांनी केले.

अक्षरधारा बुक गॅलरीतर्फे बालकुमार शब्दोत्सव

बालवाचकांच्या वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी अक्षरधारा बुक गॅलरीतर्फे 'वाचू आनंदे : बाल कुमार शब्दोत्सवा'त सहा एप्रिल ते ३१ मे दरम्यान मनोरंजनपर कार्यक्रम, पुस्तक अभिवाचन स्पर्धा आणि प्रदर्शने यांची रेलचेल राहणार आहे.

शब्दोत्सवाचा शुभारंभ 'तोत्तोचान' या बहुचर्चित पुस्तकाच्या अनुवादक चेतना गोसावी यांच्या हस्ते झाला. शब्दमेघ संस्थेतर्फे या पुस्तकाचे अभिवाचनही झाले. महोत्सवादरम्यान आयटी तज्ज्ञ अतुल कहाते, ज्येष्ठ

पर्यावरण तज्ज्ञ दिलीप कुलकर्णी, डॉ. अरुणा ढेरे, चेतना जोशी, स्वानंद बर्वे, राजीव तांबे, रेणू गावसकर, किरण पुरंदरे आदी मान्यवर उपस्थित होते. बोक्या सातबंडे, गोट्या, हॅरीपॉटर, फास्टर फेणे, शेरलॉक होस, पंचतंत्र वगैरे पुस्तके बुक गॅलरीच्या सभासद मुलांना घरी नेऊन वाचता यावी म्हणून पन्नास रुपये घेऊन वार्षिक सभासदत्वही देण्यात आले.

स्पाय प्रिन्सेस

'युद्धस्य कथा रम्या' असं म्हणतात खरं; पण युद्धाच्या किंवा महायुद्धाच्या सर्वच कथा रम्य नसतात. मात्र कधी तरी या वचनाला जागणारी काही माहिती हाती लागते आणि हे वचन सार्थ वाटू लागते. ब्रिटनच्या 'रॉयल मेल'ने अलीकडेच दुसऱ्या महायुद्धातील वीरांगना असलेल्या भारतीय वंशाच्या नूर इनायत खान हिचे टपाल तिकिट जारी केले. 'रॉयल मेल'तर्फे दुसऱ्या युद्धातील अविस्मरणीय व्यक्तींची तिकिटे काढण्यात येत आहेत. 'रिमार्केबल लाइव्हज' मालिकेत १० तिकिटांच्या एका संचात नूरचा समावेश आहे. तिची जन्मशताब्दी सुरू असताना तिला हा सन्मान देण्यात आला आहे!

नूर इनायत खान ही 'म्हैसूरचा वाघ' म्हणून प्रसिद्ध असलेल्या टिपू सुलतानाची वंशज. दुसऱ्या महायुद्धात तिने ब्रिटिशांसाठी गुप्तहेर म्हणून काम केले. तिच्या अद्‌भूत आयुष्यावर पुस्तक लिहिण्याऱ्या शर्बाणी बसू यांनी नूरचे टपाल तिकिट निघाल्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे. नूरचा जन्म जानेवारी १९१४ मध्ये मॉस्कोत झाला. तिचे वडील हझरत इनायत खान भारतीय आणि आई ओरा रे बेकर अमेरिकेची नागरिक होती. अमेरिकेत रामकृष्ण मिशनच्या आश्रमात त्या दोघांची भेट झाली. हझरत इनायत खान सुफी पंथाचे प्रचारक व संगीतकार. ते टिपू सुलतानाच्या वंशातले, पाश्चात्त्य देशांत सुफीझमचा प्रसार करण्याचे काम ते करीत असत. नूरचे बालपण पॅरिसमध्ये गेले. दुसऱ्या महायुद्धात जर्मनांनी पॅरिसचा ताबा घेतला, तेव्हा नूरचे कुटुंब लंडनला स्थलांतरित झाले.

लंडनमध्ये नूर महिलांच्या सहायक हवाई दलात दाखल झाली आणि नंतर खास मोहिमांतील अधिकारी म्हणून तिला निवडले गेले. तत्कालीन पंतप्रधान विस्टन चर्चिल यांनी ही गुप्त संस्था सुरू केली होती. ती लंडनहून पॅरिसला जाणारी पहिली महिला रेडिओ ऑपरेटर होती. तिथे तिने मॅडेलेइन

या गुप्त नावाने तीन महिने काम केले. मात्र, फितुरीमुळे ती पकडली गेली. तिला अटक झाली आणि नाझी जर्मनीतील छळछावणीत तिला ठार मारण्यात आले, तपासादरम्यान तिचा अनन्वित छळ करण्यात आला. मात्र तिने काहीही माहिती दिली नाही. तिचे खरे नावही सांगितले नाही. तिला गोळी घालण्यात आली. तेव्हा तिचे अखेरचे शब्द होते, लिबर्ते (मुक्ती)! यावेळी नूर ३० वर्षांची होती. नूरला जॉर्ज क्रॉस हा सर्वोच्च सन्मान देऊन ब्रिटनने, तर 'क्रॉइक्स दे गुएरे' हा सन्मान देऊन फ्रान्सने गौरवले. काळाच्या ओघात अशा अनेक कहाण्या अस्तंगत होतात; पण या टपाल तिकिटाच्या आणि स्पाय प्रिन्सेस पुस्तकाच्या रूपाने सुदैवानं नूरची कहाणी अजरामर झाली आहे. मेहता पब्लिशिंगने हे पुस्तक प्रकाशित केले आहे.

विदेशी शोज आणि देसी सिनेमा

परदेशात एखादा टीव्ही शो लोकप्रिय आहे ना, भारतातल्या तरुणाईलाही तो आवडतोय ना, मग वाट कसली बघताय? उचला त्याची स्टोरी! हा आहे. उचलेगिरीचा आगामी बॉलिवूड फंडा. जे लोकप्रिय आहे ते उचलण्यात हिंदी सिनेमे कधीच मागे नसतात. मग ती हॉलिवुडची कॉपी असो किंवा दाक्षिणात्य सिनेमांचे रिमेक्स. जे विकतंय, तेच पिकवण्याचा बॉलिवुडकरांचा तर जुनाच शौक आहे. त्यामुळेच आता ट्रेंड आहे, परदेशातल्या लोकप्रिय शोजवर आधारित बॉलिवूड सिनेमा आणण्याचा.

'टू अँड हाफ मेन', 'ग्ली', 'शेरलॉक होम्स', 'हॅनिबल' असे काही आंतरराष्ट्रीय शोज तरुण वर्ग आवडीने बघतो. आंतरराष्ट्रीय टीव्ही मालिकांतून अनेक दिग्दर्शकांना सिनेमा बनवण्याची प्रेरणा मिळत आहे. यामध्ये राजश्री प्रॉडक्शन्स निर्मित 'सम्राट अँड को' या आगामी सिनेमाचे उदाहरण देता येईल. राजीव खंडेलवाल त्यात एका डिटेक्टिव्हच्या भूमिकेत दिसेल. डिटेक्टिव्ह सम्राटचे पात्र 'शेरलॉक होम्स' वर आधारित असेल. 'हॅनिबल' या आंतरराष्ट्रीय मालिकेतल्या डॉ. लेक्टरची भूमिका करण्याची संधी इम्रान हाश्मीने व्यक्त केली होती. त्याची ही इच्छा पूर्णही होतेय. आगामी 'मिस्टर एक्स' हा सिनेमाच 'हॅनिबल' मालिकेवर आधारित असून इम्रान करत असलेले पात्र डॉ. विक्रम सिंघल हे डॉ. लेक्टरवरूनच उभे केले आहे. विक्रम भट दिग्दर्शित हा बिग बजेट थ्रीडी सिनेमा असेल.

याआधीही 'अतिथी तुम कब जाओंगे?' सिनेमातील एक संपूर्ण सीन

‘मिस्टर बीन’ या मालिकेतल्या सीनची कॉपी होती, तर ‘ब्रेक के बाद’ सिनेमातील इम्रान खान आणि दीपिका पदुकोनची भूमिका ‘फ्रेंडस्’ मालिकेतील रॉस आणि रेशलशी साधर्म्य साधणारी होती. ‘दिल चाहता है’ आणि ‘जिंदगी ना मिलेगी दोबारा’ मधल्या तिन्ही मित्रांच्या भूमिका ‘फ्रेंड्स’मधल्याच रॉस, चँडलर आणि जोई यांच्यावर बेतलेल्या आढळतात. कॉर्पोरेट विश्वातील लैंगिक शोषणावरील ‘इन्कार’ हा सिनेमा ‘स्कँडल’ या मालिकेवर आधारित होता.

ब्लॉकबस्टर हिट ठरलेला ‘रेस’ हा चित्रपट ‘सीएसआय’ मालिकेवर आधारित आहे. ‘स्टुडंट ऑफ द इयर’वर ‘ग्ली’ या आंतरराष्ट्रीय मालिकेची छाप दिसते. एकता कपूर ‘सेन्स अँड सेन्सिबिलिटी’ या ब्रिटिश टीव्ही मालिकेच्या स्टार चॅनल ‘ग्रेज ॲनटॉमी’च्या रिमेकवर काम करत असल्याचे समजते.

जागतिक पातळीवर तरुणाईमध्ये लोकप्रिय असलेल्या ‘हॅनिबल’, ‘शेरलॉक’, ‘क्राइम सीन इन्व्हेस्टिगेशन’, ‘फिअर फॅक्टर’, ‘२४’, ‘सो यू थिंक यू कॅन डान्स’ अशा अनेक मालिकांचे भारतीयीकरण आपल्या प्रेक्षकांनी स्वीकारले. त्यामुळे आता दिग्दर्शकही त्यावरून प्रेरित होऊन काम करत आहेत, असे मत एएक्सएन इंडियाचे बिझनेस हे सुनील पंजाबी यांनी व्यक्त केले.

त्यांनीही पुढील मूळ मालिकांच्या रिमेकचा उल्लेख केला.

ग्ली : स्टुडन्ट ऑफ द इयर

सीएसआय : रेस

प्रिझन ब्रेक : झिंदा

हॅनिबल : मिस्टर एक्स

शेरलॉक : सम्राट अँड को

सीएसची परीक्षा ‘ओपन बुक’

कंपनी सेक्रेटरी (सीएस) परीक्षा आता ‘ओपन बुक’ पद्धतीने घेण्याचा निर्णय इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाने घेतला आहे. मात्र परीक्षेची काठिण्य पातळी वाढवण्यात येणार आहे. डिसेंबरच्या परीक्षेमध्ये ही पद्धत प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यात येणार आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियातर्फे सीएस परीक्षा घेण्यात

येते. या वर्षीपासून जूनमध्ये होणारी फाउंडेशन परीक्षा ही संगणकाच्या माध्यमातून बहुपर्यायी प्रश्न स्वरूपात होणार आहे. डिसेंबरमधील सीएसची अंतिम परीक्षा ही 'ओपन बुक एक्झाम' होणार आहे. त्यासाठी वैकल्पिक विषयाची परीक्षा ओपन बुक होणार आहे. बँकिंग, इन्श्युरन्स, इन्टेलेक्च्युअल प्रॉपर्टी राइट्स, इंटरनॅशनल बिझिनेस कॅपिटल-कमोडिटी अँड मनी मार्केट्स या विषयांसाठी ओपन बुक एक्झाम होणार आहे. फाउंडेशन परीक्षा बहुपर्यायी असली किंवा अंतिम परीक्षा ओपन बुक एक्झाम असली, तरी तिची काठिण्य पातळीही वाढण्याचा इशारा संस्थेने दिला आहे. या वर्षी प्रायोगिक तत्त्वावर परीक्षा घेण्यात येणार आहे, खरे म्हणाले, ''वैकल्पिक विषयांच्या परीक्षेमध्ये प्रामुख्याने विद्यार्थ्यांना असलेली विषयाची समज पाहण्याचा हेतू आहे. त्यामुळे या परीक्षेचे प्रश्न हे विश्लेषणात्मक असतील. त्यामुळे विद्यार्थ्यांनी पुस्तकाचा आधार घेतला, तरीही त्यांच्यासाठी ही परीक्षा आव्हानात्मकच असेल. परीक्षा पद्धतीत होणाऱ्या बदलांप्रमाणे त्यांच्या काठिण्य पातळीमध्येही वाढ करण्यात येणार आहे. त्यामुळे दर्जावर कोणताही परिणाम होणार नाही.''

महिलांच्या सुरक्षेसाठी 'झीरो ॲप' मोबाइल ॲप

पुण्यातील जीएसआयटी या सॉफ्टवेअर कंपनीच्या वतीने महिलांच्या सुरक्षेसाठी 'झीरो अवर' हे मोबाइल ॲप्लिकेशन तयार करण्यात आले आहे. हे ॲप मोफत असून सध्या अँड्रॉइड फोनवर गुगल प्लेमधून डाऊनलोड करता येणार आहे.

हे ॲप वापरण्यासाठी इंटरनेटची गरज नाही. या ॲपमध्ये तुम्हाला तुमचा आवाज सेट करता येणार आहे. यामुळे अडचणीच्या काळात तुम्ही आवाज दिला, की तुमच्या नातेवाइकांना, जवळच्या व्यक्तींना एसएमएसद्वारे तुम्ही संकटात आहात याची माहिती मिळेल. कोणी मदतीसाठी येत असेल, तर त्याची माहितीही या ॲपद्वारे मिळणार आहे. मोबाइल हलवूनही संकटात असल्याचा संदेश देता येणार आहे.

झीरो अवरमध्ये रेकॉर्डिंग आणि ट्रॅकिंग या सुविधाही उपलब्ध आहेत. याशिवाय या ॲपमध्ये जवळच्या बँका, पोलीस ठाणे, रुग्णालये, एटीएम यांचीही माहिती मिळणार आहे.

डिजिटल स्वाक्षरीचे प्रमाणपत्र

कर्मचाऱ्यांच्या भविष्यनिर्वाह निधीचे व्यवस्थापन करणाऱ्या 'एम्प्लॉइज प्रॉव्हिडंट फंड ऑर्गनायझेशन (ईपीएफओ) विभागाने १०० पेक्षा अधिक कर्मचारी कामाला असलेल्या संस्थांना डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र सादर करण्याची सक्ती केली आहे.

'ईपीएफओ' विभागाने डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी १०१ ते ५०० कर्मचारी असलेल्या संस्थांना ३० जूनपर्यंत प्रमाणपत्र द्यावे लागणार आहे. ५०० हून अधिक कर्मचारी असलेल्या संस्थांनी ३० एप्रिलपर्यंत प्रमाणपत्र देण्याचा आदेश दिला आहे. १०० पेक्षा कमी कर्मचारी असलेल्या संस्थांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात येणार आहे.

डिजिटल स्वाक्षरीमुळे कर्मचाऱ्याने नोकरी बदलल्यानंतर पीएफ खाते ऑनलाइन ट्रान्स्फर करता येणार आहे. यासाठी www.epfindia.com या वेबसाइटशी संपर्क साधावा.

'शब्दांगण'चे उद्घाटन

'वाचनातून माणसाचा विकास घडत असतो. त्यामुळे वाचनसंस्कृती जपणे फार महत्त्वाचे आहे,' असे मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या रेणू गावस्कर यांनी व्यक्त केले.

गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर 'शब्दांगण' या संस्थेचे उद्घाटन रेणू गावस्कर यांच्या हस्ते झाले. चित्रकार रविमुकुल, साहित्य परिषदेच्या कार्याध्यक्षा डॉ. माधवी वैद्य, संस्थेचे लक्ष्मण राठिवडेकर, प्राची राठिवडेकर आदी उपस्थित होते. संस्थेतर्फे आरोग्यविषयक पुस्तकांची गुढी या वेळी उभारण्यात आली. तसेच गावस्कर यांच्या 'एकलव्य न्यास' या संस्थेतील विद्यार्थ्यांना पुस्तके भेट देण्यात आली.

गावस्कर म्हणाल्या, 'पुस्तकाचे वाचन करताना आपण त्यातील पात्रांशी एकरूप होतो. त्यांच्या सुख-दुःखांची जाणीव होते. त्यांचे अनुभव आपल्याला संवेदनशील करतात. त्यामुळे संवेदनशील होण्यासाठी वाचन करणे आवश्यक आहे.'

फेसबुकमधून साकारले ग्रंथालय

'शिवाजी ट्रेल' या संस्थेने पुणे आणि परिसरातील दुर्गम गाव-

शाळांपर्यंत अवांतर वाचनासाठी पुस्तके पोचविण्याचा प्रकल्प हाती घेतला असून मुळशीजवळील भांबर्डे गावातील संपर्क विद्यालयाला २५० पुस्तकांचा संच प्रदान केला.

गेल्या अनेक वर्षांपासून शिवाजी ट्रेल ही संस्था दुर्ग संवर्धनाचे महत्त्वपूर्ण काम करते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची पुस्तके मिळत नसल्याने संस्थेने सावित्री फोरम, डीडी फॅन क्लब आणि दुर्गसंवर्धक महासंघ या संस्थांच्या सहकार्याने चार महिन्यांत अडीचशे पुस्तके जमा केली. हा संच संपर्क विद्यालयाला देण्यात आला.

फेसबुकच्या माध्यमातून ग्रंथालय उभे करण्याचा हा देशातील पहिलाच प्रयत्न असावा. या उपक्रमातून ग्रामीण भागात वाचनसंस्कृती निर्माण होण्यासाठी मदत होईल. अधिकाधिक गावांना, शाळांना या उपक्रमाच्या माध्यमातून मदत करण्याचा मानस आहे.

ट्रॅक करा ई-मेलचा प्रवास

ई-मेलची सुरुवात होऊन आता कित्येक दशके झाली. कित्येकांच्या जगण्याचा कामाचा तो अविभाज्य घटक झाला आहे. पूर्वी पत्र, निरोप देऊन होणाऱ्या गोष्टी आता ई-मेलद्वारे होतात. विवाहाची निमंत्रणे, शाळा-सोसायटीमधील मीटिंग यांची माहितीही ई-मेलद्वारे पोहोचवली जाते. एका व्यक्तीने पाठविलेला ई-मेल अपेक्षित ठिकाणी पोहोचेपर्यंत त्याने किती अंतर पार केले, हे ट्रॅक करणारी सिस्टिम विकसित झाली आहे. 'जीपीएस'च्या आधारे 'ई-मेल माइल्स' हे तंत्रज्ञान विकसित करण्यात आले आहे. यामध्ये जीपीएस आणि इंटरनेट ट्रॅकिंगच्या आधारे ई-मेलच्या प्रवासाचे अंतर ठरविले जाते. 'ई-मेल माइल्स' हे सर्व्हरमधील प्रत्येक लोकेशन टॅग करते आणि त्यानंतर ई-मेलने प्रवास केलेले संपूर्ण अंतर ट्रॅक करते. ॲपल आणि जीमेलवर 'प्लग इन' म्हणून 'ई-मेल माइल्स' उपलब्ध आहे. नवीन ई-मेल मिळाल्यावर त्यात हा लोकेशन टॅग असतो. त्यात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणापर्यंतचे अंतर कापले जाते. केबल किंवा सर्व्हरच्या मार्गे केलेला प्रवास प्रत्यक्ष मोजला जात नाही. त्यामुळे पुण्याहून मुंबईला पाठविलेला मेल दोन्ही शहरांमधील अंतर अवघे १५० किलोमीटर असले तरी प्रत्यक्षात कित्येक हजार किलोमीटर अंतर पार करत असावा. 'ई-मेल पाठव; ते सोपे आहे आणि फुकटसुद्धा,' असे बोलताना शंभरदा तरी विचार करा.

जुन्नरमध्ये सातवाहन काळातील अवशेष

जुन्नर येथील दिल्ली पेठ येथे पुण्याच्या डेक्कन कॉलेजच्या पुरातत्त्व विभागाकडून सुरू असलेल्या उत्खननात सातवाहन काळातील वैशिष्ट्यपूर्ण बांधकामाचे अवशेष प्रथमच आढळून आले आहेत,

डॉ. श्रीकांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उत्खननाचे काम सुरू आहे. यात भाजलेल्या विटांपासून निर्मित बांधकामाचे वैशिष्ट्यपूर्ण अवशेष प्राप्त झाले आहेत. त्यांची रचना चौरसाकृती असून, अशा प्रकारची तीन बांधकामे या उत्खननात आढळली असे त्यांनी सांगितले.

डेक्कन कॉलजचे कुलगुरू व ज्येष्ठ पुरातत्त्व संशोधक डॉ. वसंत शिंदे यांच्या म्हणण्यानुसार, बांधकामाच्या विशिष्ट रचनेवरून ही बहुधा धान्य साठविण्याची कोठारे असावीत.

महाराष्ट्रात आतापर्यंतच्या सातवाहनकालीन उत्खननात अशा प्रकारची विशिष्ट बांधकाम रचना प्रथमच आढळून आली आहे. अशा प्रकारच्या अनेक वैशिष्ट्यपूर्ण रचना जुन्नर येथे सापडण्याची शक्यता आहे.

या परिसरातील लेण्या व पांढऱ्या मातीच्या टेकडांचे उत्खनन करून अभ्यास केल्यास सातवाहन म्हणजेच आद्य ऐतिहासिक काळातील समाजजीवनाची सर्वांगीण माहिती मिळण्यास मदत होणार आहे. सन २००५ पासून येथे डेक्कन कॉलेजच्या पुरातत्त्व विभागामार्फत उत्खनन करण्यात येत आहे.

याशिवाय नाणी, शंख, काचेपासून निर्मित बांगड्या, भाजलेल्या मातीचे मणी, भांडीकुंडी, लोखंडाच्या वस्तू, दगडी मणी व पाटे वरवंटे, घराची कौले व प्राण्यांची हाडे मोठ्या प्रमाणात प्राप्त झाली आहेत.

'बोलक्या रेषा'चे प्रकाशन

समाजव्यवस्थेतील दोषांवर चित्रांच्या माध्यमांतून संवाद साधणाऱ्या चित्रकार घनश्याम देशमुख यांच्या 'बोलक्या रेषा' या हास्यचित्र पुस्तकाचे प्रकाशन अभिनेते मोहन आगाशे यांच्या हस्ते करण्यात आले.

'राजकीय रेषा' तून भाष्य करणाऱ्या चित्रांना विशेष दाद मिळत होती. नेत्यांची आश्वासने, पुण्यातील समस्या, सत्तेसाठी चढाओढ असे अनेकविध मुद्दे चित्रांतून मांडताना त्यांना शब्दांची साथ लाभली आहे. 'ऑफीस रेषा' कार्यालयातील घटनांवर भाष्य करतात. फक्त विनोदी घटना न मांडता

कामाच्या ठिकाणी स्त्रियांवरील अत्याचार आणि त्यावरील उपाय, बेरोजगारी, व्यापारातील बदलाचे परिणाम या कल्पना विचार करायला लावतात.

माळढोकवर शोधनिबंध

माळरानावरचा राजस पक्षी म्हणून ओळख असणाऱ्या अन् रुबाबात राहणं पसंत करणाऱ्या माळढोक पक्ष्यांची स्वभाव वैशिष्ट्ये, जीवनशैली, वर्तणुक यावर आधारित संशोधन आता शोधनिबंधाद्वारे शब्दबद्ध झाले आहे. सदैव सावध असणारा, शत्रूला चकवा देत उंच भरारी घेणारा, मनसोक्त धूळस्नानात रमणारा, माळढोक त्यामुळे मनावर ठसतो.

बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीचे (बीएनएचएस) संचालक डॉ. असद रहेमानी, पक्षी अभ्यासक डॉ. प्रमोद पाटील आणि वॉशिंग्टन येथील नॅशनल झुलॉजिकल पार्कमधील तज्ज्ञ सारा हलगर हे गेल्या पाच-सहा वर्षांपासून भारतातील माळढोक पक्ष्यांच्या वर्तणुकीवर संशोधन करत आहेत. त्यांचा संशोधनपर अहवाल नुकताच बीएनएचएसच्या जर्नलमध्ये प्रकाशित झाला आहे. या अहवालात माळढोकच्या अधिवासाची गरज आणि वर्तणूक यांची सांगड घातली आहे. खाद्य मिळविण्यासाठी लढविण्यात येणारी शक्कल. शत्रूपासून आपल्या पिल्लांचे संरक्षण करण्यासाठी तत्पर असणारी मादी, आपल्या अधिवासात दुसऱ्या न पक्ष्याचे पाऊल पडताच होणारी झुंज, मादीला आकर्षित करण्यासाठी 'हुम... हुमा'. असा एक किलोमीटरपर्यंत ऐकू जाईल एवढ्या मोठ्याने काढलेला आवाज, शत्रूवर चढविलेला हल्ला किंवा त्याला दिलेला चकवा, अशी माळढोकची स्वभाव वैशिष्ट्ये या संशोधनात टिपली आहेत.

माळढोकच्या ऐटबाज आणि रुबाबात चालण्याला आद्य पक्षी तज्ज्ञ डॉ. सालीम अली यांनी 'मार्शल्स वॉक' अशी उपमा दिली आहे. याबाबत पाटील म्हणाले, ''जागतिक स्तरावर अतिसंकटग्रस्त यादीत माळढोकचा समावेश आहे. त्यामुळे या पक्ष्यांच्या संवर्धनासाठी त्यांची जीवनशैली आणि वर्तणुकीवर अभ्यास करण्याचे आम्ही ठरविले. भारताबरोबरच आफ्रिका (कोरी माळढोक) आणि ऑस्ट्रेलिया (ऑस्ट्रेलियन माळढोक) येथील माळढोकच्या तुलनात्मक संशोधनाचाही यात समावेश आहे. आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियात आढळणाऱ्या माळढोक पक्ष्यांचा भारतातील माळढोकशी असणारा जनुकीय संबंध, उत्क्रांतीचा शोध यानिमित्ताने घेण्याचा प्रयत्न

केला. माळढोकच्या ६३ स्वभाव वैशिष्ट्यांचे ११ विभागांत संशोधन पूर्ण करण्यात आले आहे. सतत सावधान असणे, ताठ मानेने चालणे, पंख फुलविणे, नीटनेटकेपणा, मातीत लोळणे असे माळढोक पक्ष्यांचे भावविश्व या संशोधनात उलगडले आहे.

स्टेट्सच्या कविता

सध्या ई-बुक, ब्लॉगसारखी माध्यम वापरण्याचे प्रमाण वाढले आहे. त्याचप्रमाणे फेसबुकवरही स्टेट्स म्हणून कविता लिहिण्याऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. त्या पार्श्वभूमीवर 'स्टेट्स' म्हणून लिहिलेल्या कविता काव्यसंग्रहाच्या रूपाने प्रकाशित होणार आहेत.

'फेसबुकवर स्टेट्स म्हणून मला कधीच विनोदी लिहावेसे वाटले नाही. 'स्टेट्स' मधून काही तरी विचार मांडावा या उद्देशाने मी कविता लिहू लागलो. त्यांची संख्या दोनशेच्या वर गेली. या सर्व कविता 'व्हॉट्स ॲप'सारख्या माध्यमातून सहजपणे एकमेकांना पाठवता येतील अशा या छोट्या संक्षिप्त स्वरूपातील आहेत. या कवितांना भाषेचे बंधन नाही. त्रिवेणीसारखा काव्यप्रकारही यात हाताळला आहे. विचारांचे विविध पैलू उलगडण्याचा हा एक प्रयोग आहे', असे वैभव भिडे यांनी सांगितले.

अलिकडे कविता वाचण्याचे प्रमाण कमी होऊ लागले आहे, त्यामुळेच येत्या काळात गझलसारखा काव्यप्रकार अधिक लोकप्रिय होणार आहे. नव्या पिढीला कवितेविषयी गोडी निर्माण करण्यासाठी अशा छोट्या कवितांची गरज आहे. त्यांना कवितेची गोडी लागल्यावर आपसूकच ते मोठ्या कवींच्या मोठ्या कविता वाचतील, असेही जोशी यांनी सांगितले.

सुरेश भट यांच्यावरील संकेतस्थळ

'गझलसम्राट सुरेश भट यांच्या स्मृती जपण्यासाठी व नव्या गझलकारांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी हे संकेतस्थळ आता नव्या स्वरूपात दिसणार आहे. गझलेविषयीचे स्वतंत्र लेखन, नव्या संग्रहाची समीक्षा, गझलेचे रसग्रहण, गझलकारांच्या मुलाखती तसेच नव्या लेखकांसाठी प्रोत्साहनपर स्पर्धा, असे उपक्रम संकेतस्थळावर सुरू होणार आहेत.

'गझल' हा स्वतंत्र काव्यप्रकार मराठीत लोकप्रिय करणाऱ्या सुरेश भट

यांचे पुत्र चित्तरंजन भट यांनी सात वर्षांपूर्वी १५ एप्रिल रोजी संकेतस्थळ सुरू केले होते. चित्तरंजन म्हणाले, ''नव्या गझलांना प्रोत्साहन देण्यासाठी संकेतस्थळाची निर्मिती झाली होती. या 'ग्लोबल' प्रयोगामुळे दूरस्थांना गझलेशी असणारी नाळ टिकवून ठेवता आली, तसेच अनेकांना गझलेशी नव्याने जोडूनही घेता आले.'' गझलेचा तंत्रशुद्ध अभ्यास करणाऱ्यांसाठी देखील हे संकेतस्थळ उपयुक्त सिद्ध होईल.

या संकेतस्थळावर आपले नवे लेखन नियमित टाकणाऱ्यापैकी तरुण गझलकार वैभव देशमुख म्हणाले, ''गझल या प्रकारावर स्वतंत्रपणे चर्चा सुरू करण्याचे श्रेय मी या संकेतस्थळाला देईन, अनेकांना हुरूप देत एका नव्या चळवळीचेच स्वरूप यातून उभे राहिले आहे. रसिकांची गझलाबाबत अभिरुची वाढवतानाच त्यातील तंत्र व आशयाचा संमिश्र पटही यामुळे उलगडला.''

या संकेतस्थळावर पाचशेहून अधिक गझलरचना वाचता येतील. सुरेश भटांच्या काही गाजलेल्या निवडक कविता आणि नव्या गझलकारांसाठी भटांनी लिहिलेली व गझलेचे तंत्रशुद्ध व्याकरण असणारी 'गझलेची बाराखडी' उपलब्ध आहे.

माजी कोळसा सचिव परख यांचा काँग्रेसवर पुस्तकबाँब

संजय बारू यांच्यापाठोपाठ पंतप्रधानांशी संबंधित कोळसा मंत्रालयाचे माजी सचिव पी. सी. परख यांनीही आपले पुस्तक प्रकाशित करून डॉ. मनमोहनसिंग यांना 'रबरस्टॅम्पची उपमा दिली. पाच वर्षांनी येणाऱ्या निवडणुकांशिवाय राजकारण्यांवर जबाबदारीचे ओझेही टाकले पाहिजे, असे मतप्रदर्शनही त्यांनी केले आहे.

कोळसा गैरव्यवहारात कोळसा मंत्रालयाचे माजी सचिव परख यांच्यावरही 'सीबीआय'ने छापे टाकले होते. त्यांच्या 'क्रूसेडर ऑर कॉन्सपिरेटर' पुस्तकाचे दिल्लीत प्रकाशन झाले. यात कोळसा खाणींचा लिलाव करण्याची सूचना मुळात आपणच केल्याचा दावा परख यांनी केला असून, डॉ. मनमोहनसिंग यांच्या कार्यशैलीवरही टीकास्त्र सोडले आहे. त्यांच्या 'नरो वा कुंजरो वा' या भूमिकेमुळेच तत्कालीन कोळसा राज्यमंत्री दासरी नारायण राव व शिबम सोरेन यांना भ्रष्टाचाराला मोकळे रान मिळाले व त्यांचा भ्रष्टाचार वाढत गेला, असे परख यांनी सांगितले, त्यांच्या मते

देशातील राजकीय नेते प्रशासनाला भ्रष्टाचाराच्या दलदलीत ओढून स्वत: नामानिराळे राहतात. यामुळे ब्रिटिशकाळात जगात अग्रेसर असलेली भारतीय प्रशासनिक व्यवस्था आज जगात पार तळाला गेल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली आहे.

जाणकारांच्या मते प्रत्यक्ष पुस्तकाचे संबंधित प्रकरण चाळले असता, पंतप्रधानांवरील टीकेला काहीही ठोस आधार नसल्याचे उघड दिसत आहे. मावळत्या पंतप्रधानांवर टीका करून स्वत:वर केवळ प्रसिद्धीचा झोत वळवून घेणे व दिल्लीतील संभाव्य नव्या सत्ताधाऱ्यांच्या 'गुड बुक्स'मध्ये शिरण्याची या नोकरशाहांची धडपड सुरू असल्याचे स्पष्टपणे दिसते, असेही राजकीय जाणकार मानतात.

काँग्रेसच्या मते, कोळसा खाणींचे वाटप करताना केंद्राला संबंधित राज्यांच्या परवानगीची गरज असते व कोळसा खाणी असलेली बहुतांश राज्ये भाजपशासित आहेत. काँग्रेसने म्हटले आहे, की बारू यांच्या पुस्तकाबाबत पंतप्रधान कार्यालयाने मांडलेली बाजू पुरेशी आहे. कोणताही ठोस पुरावा नसताना केवळ स्वत:च्या स्मरणावर बारू यांनी निष्कर्ष काढले आहेत.

मोबाईल ॲपसाठी 'सेबी'ची स्पर्धा

तंत्रज्ञानाच्या लाटेवर स्वार झालेल्या 'ॲप्स'ची भुरळ पडलेल्यांमध्ये आता 'सिक्युरिटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया'ची (सेबी) सुद्धा भर पडली आहे. एक नवेकोरे मोबाईल ॲप विकसित करण्यासाठी 'सेबी' थेट खुली स्पर्धाच घेणार आहे.

नव्या गुंतवणूकदारांना गुंतवणुकीसंदर्भात पुरेशी माहिती व शिक्षण मिळावे, तसेच गुंतवणूकदार अर्थशिक्षित व्हावेत, मोबाईल गेममधून सुलभ अर्थशिक्षण हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे.

लोकांच्या दैनंदिन जगण्याचा भाग असणाऱ्या; परंतु क्लिष्ट भासणाऱ्या अशा 'फायनान्शियल सिक्युरिटीज मार्केट'चा अभ्यास सुलभ करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान व मोबाईल तंत्रज्ञानाचा उपयोग केला जाणार आहे. ॲन्ड्रॉईड प्रणाली असणाऱ्या मोबाईलसाठी स्पर्धेतून नव्याने तयार झालेले ॲप वापरता येतील.

इंग्रजी व्यतिरिक्त हिंदी तसेच इतरही प्रादेशिक भाषांमध्ये हे ॲप वापरता

येणे शक्य व्हावे, या हेतूने अनुक्रमे ३ लाख, २ लाख व १ लाख रुपयांची पहिली तीन बक्षिसे असतील, सोबतच अनेक उत्तेजनार्थ बक्षिसेही असणार आहेत. सेबीच्या संकेतस्थळावर याविषयी अधिक माहिती मिळू शकेल.

डॉ. आंबेडकर - गौतम बुद्ध - सदिच्छा पत्रे

भगवान गौतम बुद्ध आणि भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानवहिताचे विचार लोकांपर्यंत पोचवण्यासाठी 'नवयान आर्टस ग्रुप'मधील काही तरुणांनी हिंदी, पाली, मराठी आणि इंग्रजी भाषांमध्ये तब्बल २४ हजार सदिच्छापत्रे बनवली आहेत. याच्या विक्रीतून मिळणारा निधी बुद्धिस्ट गॅलरीच्या उभारणीसाठी वापरला जाणार आहे.

आयटी क्षेत्रात काम करणारे प्रशांत गवई, कुशल शंभरकर, राहुल खांडेकर, तुषार आल्हाट, निशा भंडागे-गवई, किशोर लांडगे यांची ही संकल्पना आहे. डॉ. आंबेडकरांनी नेहमीच सर्वसामान्यांच्या हिताचा विचार केला. त्यांचे हेच विचार या सदिच्छापत्रातून या तरुणांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. संगणकाच्या साहाय्याने तयार केलेल्या सदिच्छापत्रांवर सुंदर चित्र नावीन्यपूर्ण डिझाईन्स आणि अलंकारिक शब्दांत संदेश असल्याचे गवई यांनी सांगितले.

आंबेडकराइट इंटरनॅशनल मिशनचा उपक्रम

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने लवकरच अमेरिकेत सुरू होणाऱ्या संस्थेत आंतरराष्ट्रीय दर्जाचा कायद्याचा अभ्यास, टेक्नॉलॉजी सेंटर, संशोधन व सांस्कृतिक देवाण-घेवाण केंद्र, वसतिगृह व मार्गदर्शन केंद्र उभारण्यात येणार आहे.

अमेरिकेत आंबेडकराइट इंटरनॅशनल मिशन (एआयएम) या संस्थेमार्फत जागतिक पातळीवर नेटवर्किंगचे काम करण्यात येते. डॉ. आंबेडकर हे कोलंबिया विद्यापीठात शिक्षणासाठी गेले त्या घटनेस शंभर वर्षे पूर्ण झाली म्हणून वॉशिंग्टन डीसी येथे संस्थेने तेरा एकर जागा विकत घेतली आहे. तेथे भारतीय विद्यार्थ्यांसाठी निवासव्यवस्था, शिक्षण व नोकऱ्यांसाठी मार्गदर्शन केंद्र सुरू होणार आहे.

माजी समाजकल्याण आयुक्त आर. के गायकवाड म्हणाले, ''अमेरिकेसह कॅनडा, कतार, ओमान, सौदी अरेबिया, इंडोनेशिया, जपान

यांसारख्या देशात संस्थेच्या शाखा आहेत. दलित, आदिवासी व मागसवर्गीयांच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय बाबींवर विचारविनिमय करण्यात येतो. या माध्यमातूनच संस्थेद्वारे केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे.''

या केंद्रासाठी अमेरिकेत स्थायिक झालेले राजू कांबळे, मिलिंद अवसरमोल, अशोक भगत कार्यरत आहेत. अन्य देशांमध्ये गौतम चक्रवर्ती (इंग्लंड), पंजमूर्ती, ॲड. सरस्वती, श्रीरामस्वामी (मलेशिया), आनंद बाली (कॅनडा), हबरबनसिंग, रमेश क्लेयर (जर्मनी) यांचा समावेश आहे. तर भारतातून आर. के. गायकवाड, रमेश कटके, डॉ. विजय कदम, प्रा. राजेश खंकाळ (महाराष्ट्र), अशोक भारती (दिल्ली), अँड. शिरीष पटेल (अहमदाबाद) हे हातभार लावत आहेत.

पंतप्रधानांची दहा वर्षांत एक हजार भाषणे

मौन बाळगण्याविषयी नेहमी टीकेचे लक्ष्य ठरणारे पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी गेल्या दहा वर्षांत एक हजार भाषणे दिली आहेत. पंतप्रधानांचे माजी माध्यम सल्लागार संजय बारू यांच्या एका पुस्तकाने राजकीय खळबळ उडवून दिल्यानंतर सध्याचे माध्यम सल्लागार पंकज पचौरी यांनी गेल्या दहा वर्षांतील त्यांच्या सत्ता काळातील कामगिरीचा बचाव करताना हा दावा केला आहे.

गेल्या दहा वर्षांत मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखाली देशाने अन्य लोकशाही देशांपेक्षाही अधिक चांगली प्रगती केली आणि जीडीपीमध्ये तिप्पट वाढझाली असल्याचा दावाही पचौरी यांनी केला आहे. त्यांनी मनमोहनसिंग यांच्या मौनी प्रतिमेसाठी प्रसारमाध्यमांना जबाबदार ठरविले. ते म्हणाले, की पंतप्रधान बोलत नाहीत, असे काहीच नाही. मात्र माध्यमांमुळे ते जनतेपर्यंत पोचू शकले नाहीत. गेल्या दहा वर्षांत त्यांनी एक हजार भाषणे दिली आहेत. दरम्यान, पचौरी यांनी युपीए सरकारच्या कामगिरीचाही आढावा घेतला.

तृतीयपंथीयांना कायदेशीर मान्यता

तृतीयपंथीयांना कायदेशीर मान्यता देण्याचा ऐतिहासिक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या पुढे स्त्री, पुरुष यासोबत तृतीयपंथी हे तिसरे लिंग

डेव्हीड मॅकी यांचे डॉ. वृषाली पटवर्धन यांनी अनुवादित केलेले बालसाहित्य

बालमित्रांनो तुमच्या आवडत्या
पॅचवर्कवाल्या रंगबेरंगी एल्मर हत्तीच्या
धाडसाची ही धमाल गोष्ट
तुम्हाला नक्कीच आवडेल!



एल्मर

किंमत : प्रत्येकी ६०/-रु.

पोस्टेज : ३०/-रु.



एल्मर आणि विल्बर



एल्मर आणि वारा



एल्मर आणि हरवलेला टेडी



एल्मर आणि अनोळखी पाहुणा मित्र

वर्गीकरण कायदेशीर होणार असून, केंद्र व सर्व राज्य सरकारांनी त्यांना मतदान ओळखपत्र, पारपत्र, वाहन चालविण्याच्या परवान्यासह सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देशही सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. इतर मागासवर्गीयांना देण्यात येणाऱ्या सर्व सुविधाही त्यांना देण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे.

तृतीयपंथीयांना मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी योग्य पावले उचलून त्यांना पुरेशा आरोग्यसुविधा, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, अशी सूचना सर्वोच्च न्यायालयाने न्या. के. एस. राधाकृष्णन आणि ए. के. सिकरी यांच्या खंडपीठाने केली. खंडपीठ म्हणाले, ''स्त्री आणि पुरुषानंतर तृतीयपंथीयांचे वेगळे तिसरे लिंग वर्गीकरण करावे. ते समाजाचे भाग असू, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सरकारने सर्वतोपरी प्रयत्न करायला हवेत. पूर्वी तृतीयपंथीयांना समाजात मानाचे असे. आता मात्र त्यांना अन्याय आणि छळवणुकीला सामोरे जावे लागत आहे. भारतीय दंड विधान कलम ३७७चा पोलिस आणि अन्य सरकारी संस्थांकडून गैरवापर होत आहे.

जनतेच्या मानवी हक्कांवर देशातील प्रगती अवलंबून आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे आम्ही आनंदी आहोत. असे लक्ष्मीनारायण त्रिपाठी तृतीयपंथीयांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या कार्यकर्त्याने यांनी म्हटले.

फेसबुक, ट्विटरचे डिझाइन बदलले

बरेच दिवस युझरला नवीन काही दिले नाही की त्यांना तेच ते वापरण्याचा कंटाळा येतो. त्यामुळेच नुकतेच फेसबुकने न्यूज फीड रिडिझाइन केले आहे. त्यात न्यूज फीडसाठी असणारी जागा कमी करण्यात आली असून फ्रेंड रिक्वेस्ट, गेमसाठीचा एक कॉलम वाढविण्यात आला आहे. ट्विटरही डिझाइन बदलण्याच्या तयारीत असून ही डिझाइन फेसबुकसारखी असेल अशी चर्चा आहे.

फेसबुकने नव्या न्यूज फीडमध्ये स्पॅमचा पर्याय खुला करून दिला आहे. तसेच यूजरपर्यंत त्याच्या उपयोगाच्याच स्टोरी अधिकाधिक पोहोचतील, अशी काळजी घेण्यात येत आहे. त्यासाठी यूजरने केलेले लाइक्स, वारंवार वापरलेले कन्टेन्ट यासारख्या गोष्टींचा उपयोग केला जाणार आहे. त्यामुळे हा फोटो लाइक करा, तुमच्यावर त्याची कृपा होईल वगैरे प्रकारच्या फीड दूर

होतील, अशी फेसबुकला आशा आहे. मात्र यामुळे एकच फीड वारंवार तुमच्यासमोर येण्याचा धोका निर्माण झाला आहे.

वर्षभरापूर्वी न्यूजफीडच्या डिझाइनमध्ये खूप मोठा बदल करण्याचे सूतोवाच फेसबुकने केले होते आणि ते मोबाइल ॲपसारखे दिसेल, असे सांगण्यात आले होते. मात्र फेसबुकचे बहुतांश यूजर छोट्या स्क्रीनचे कमी रिझोल्युशनचे कम्प्युटर वापरत असल्याने त्यांना नवीन डिझाइनचा फारसा उपयोग होणार नाही, असे फेसबुकच्या तांत्रिक टीमच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी या फीडमध्ये फारसा मोठा बदल न करण्याचा निर्णय घेतला आहे. तरी देखील फेसबुकने केलेले हे बदल यूजरना तितकेसे रुचलेले नाहीत. नवीन डिझाइन अगदी त्रासदायक असल्याची तक्रार यूजर करत आहेत. काहींना हा लेआऊट गुगल प्लस सारखा वाटतो आहे.

इतके दिवस फेसबुक ट्विटरकडून विविध आयडिया घेत होते. आता ट्विटरने फेसबुकचे डिझाइन घेतले आहे. नव्या डिझाइनमध्ये आतापर्यंत सर्वाधिक पंसती मिळालेले ट्विट्स जरा मोठे दिसतील. त्यामुळे युजरना ते शोधणे सोपे जाईल. काही ट्विट पिन करून ठेवण्याची सोयही यामध्ये आहे. सोबतच ट्विट फिल्टर करण्याचाही ऑप्शन आता मिळणार आहे. इतरांची प्रोफाइल पाहताना ट्विट, ट्विट आणि फोटो किंवा ट्विट आणि त्यावरील रिप्लाय यामधून निवडण्याचा पर्याय देण्यात आला आहे. नव्या प्रोफाइलमध्ये फोटोही मोठा दिसणार आहे.

'पीएमओ'ने फेटाळले बारूंच्या पुस्तकातील दावे

पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांचे माजी माध्यम सल्लागार संजय बारू यांच्या 'दी ॲक्सिडेंटल पीएम : दी मेकिंग अँड अनमेकिंग ऑफ मनमोहनसिंग' पुस्तकातील उल्लेख म्हणजे 'रंगवलेली काल्पनिक कथा' आहे, अशा शब्दांत पंतप्रधान कार्यालयाकडून (पीएमओ) पुस्तकातील दावे फेटाळून लावण्यात आले. पुस्तकातील अनेक उल्लेख निरर्थक आणि निराधार असल्याचे पंतप्रधान कार्यालयाचे प्रवक्ते पंकज पचौरी यांनी स्पष्ट केले.

पचौरी म्हणाले, 'पंतप्रधान कार्यालयाच्या फाइल्स आधी काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी यांना दाखविल्या जायच्या हा उल्लेख खोडसळपणाचा आणि निराधार आहे. पंतप्रधान कार्यालयाची एकही फाइल कधीही सोनिया गांधी

यांना दाखविली गेली नाही.' या संदर्भात पचौरी यांच्या माध्यमातून पंतप्रधान कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पंतप्रधानांच्या माजी माध्यम सल्लागारांनी लिहिलेले पुस्तक म्हणजे विशेष अधिकारपदाचा गैरवापर करण्याचा प्रयत्न आहे. करण्याचा प्रयत्न आहे. व्यवसायिक फायदा उठविण्यासाठीच ही धडपड सुरू आहे. पुस्तकातील वर्णन म्हणजे त्यांनी रंगविलेली काल्पनिक कथा आहेत.

दरम्यान, माझे पुस्तक समतोल आहे, अशी प्रतिक्रिया पुस्तकाचे लेखक संजय बारू यांनी दिली. ते म्हणाले, पुस्तकात 'यूपीए सरकार'च्या चांगल्या कामांचाही उल्लेख करण्यात आला आहे. पन्नास टक्क्यांहून अधिक पुस्तक पंतप्रधानांनी घेतलेले निर्णय आणि सोडविलेले प्रश्न यांच्यावर आधारित आहे. ते एक असे पंतप्रधान होते की, ज्यांनी खूप काही केले आणि पुस्तकात त्याच्या नोंदी आहेत.'

कृष्णगिरीत शंभर महाराष्ट्रीय कुटुंबे

मराठा आरक्षणाचा मुद्दा महाराष्ट्रात ऐरणीवर असला तरी मूळचे महाराष्ट्रीय असलेले मराठी नागरिक तमिळनाडूत आरक्षणाचा लाभ घेत आहेत. 'आरक्षणामुळे प्रगतीची दारे उघडली. सरकारने खूप उपकार केले.' असे मत मराठा समाजातील निवृत्त तहसीलदार जनार्दन राव यांनी व्यक्त केले.

'शिवाजीनगर अगराहरम' शहरालगत चार किलोमीटरवरील शांत वस्ती. नारळीच्या उंच झाडांच्या सावलीत विसावलेली. तब्बल १०० घरे. दर्शनी भागत विठ्ठल मंदिर. येथील माणसे घरात मराठी बोलणारी. लोखंडे, भोसले, जाधव, शिंदे आदी मराठी आडनाव धारण केलेली. पण तमीळ संस्कृतीत खोलवर मिसळलेली.

जनार्दन राव यांचे आडनाव निकम. त्यांची पाळेमुळे महाराष्ट्रातील पुण्याची. 'शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे यांच्या काळात आमचे पूर्वज येथे आले. स्थायिक झाले. मी त्यांच्या १७ व्या पिढीचा वारसदार.' जनार्दन राव निकम सांगत होते. तमिळनाडू राज्यात ६९ टक्के आरक्षण असून मागास वर्गासाठी (बीसी) ३० टक्के आरक्षण आहे. यात मुस्लिम मागास वर्गाच्या ३.५ टक्क्यांचा समावेश आहे. याच 'तामिळनाडू पॅटर्न'चा लाभ जनार्दन राव यांच्या मुलांना झाला आहे.

तमिळनाडूमध्ये लोकसभेच्या ३९ जागांसाठी २४ एप्रिल रोजी मतदान झाले. कृष्णगिरी हा कर्नाटकलगतचा जिल्हा.

अगराहरम येथे शोमाजी राव यांची ओळख झाली. 'मी पंचायत प्रेसिडेंट' असा परिचय त्यांनी दिला. ''मराठा लोक मूळचे लढवय्ये. परंतु येथे स्थायिक झालेले लोक टेलरिंगचे काम करायचे. 'बीसी' आरक्षणानंतर बराच फरक पडला. अनेकांना सरकारी नोकऱ्या लागल्या. आमच्या सर्टिफिकेटवर 'मराठी (नॉन ब्राह्मीन)' लिहिले आहे. कृष्णगिरी तालुक्यात मराठा समाजाची ५० हजार लोकसंख्या, हस्सर तालुक्यात २० हजार, वेल्लोर जिल्ह्यात ७५ हजार, तर तमिळनाडूत अंदाजे साडेचार लाखांहून जास्त लोकसंख्या आहे,'' अशी महिती त्यांनी दिली.

कृष्णगिरीचे विद्यमान खासदार ए. जी. सुगावनम हे करुणानिधी यांच्या 'डीएमके' पक्षाचे आहेत. त्यांच्या मतानुसार, ''मराठा लोक येथे स्ट्रगल करताना दिसायचे. आरक्षणामुळे त्यांना संधी मिळाली.''

सुवीर मिरचंदानी

भारतीय वंशाचा सुवीर मिरचंदानी हा १४ वर्षीय मुलगा अमेरिकेत अचानक प्रकाशझोतात आला आहे. याला कारण आहे त्याचे संशोधन. जिद्द असल्यास कोणत्याही विषयाचे 'सोने' करता येते, हे त्याने दाखवून दिले. आपण बऱ्याच वेळा सरकारी कागदपत्रे पाहतो. या कागदपत्रांच्या प्रिंट काढण्यासाठी साधारण किती शाई लागत असेल, याचा विचारही आपल्या मनाला शिवत नाही. मात्र सुवीरच्या मनात हे कुतूहल निर्माण झाले. अमेरिका सरकार आणि सर्व राज्यांनी सरकारी कागदपत्रांमध्ये 'टाइम्स न्यू रोमन' हा फॉंट टाळून 'गॅरामॉंड' हा फॉंट वापरल्यास सरकारचे कागदपत्रांच्या प्रिंटच्या शाईवरील खर्चातून सुमारे चाळीस कोटी अमेरिकी डॉलर वाचतील, असे सुवीरने संशोधनातून दाखवून दिले.

पिट्सबर्गमधील माध्यमिक विद्यालयात सुवीर शिक्षण घेत आहे. अमेरिका सरकारने गॅरामॉंड हा फॉंट वापरल्यास दरवर्षी शाईवर होणाऱ्या ४६.७ अमेरिकी डॉलरमध्ये ३० टक्क्यांनी घट होऊन १३.६ कोटी अमेरिकी डॉलरची बचत होईल. तसेच, अमेरिकेतील सर्व राज्यांनी हा फॉंट वापरल्यास आणखी २३.४ कोटी अमेरिकी डॉलरची बचत होईल, असा निष्कर्ष सुवीरने काढला आहे. शाळेतील विज्ञान प्रकल्पासाठी सुवीर

विषयाचा विचार करीत होता. त्या वेळी लक्षात आले की शिक्षकांकडून मोठ्या प्रमाणात परिपत्रके मिळू लागली आहेत. कागदाचा पुनर्वापर होऊ शकतो, मात्र शाईच्या वापराबाबत आजवर कोणी विचार केलेला नव्हता. सुवीरने या विषयावर संधोधन करण्याचा निर्णय घेतला. 'शाईची किंमत ही फ्रेंच अत्तराच्या तुलनेत दुप्पट आहे.'

यासाठी त्याने शाळेतील शिक्षकांनी वितरीत केलेली सूचनापत्रे गोळा केली. यात सर्वांत जास्त वापरले जाणारे शब्द ई, टी, ए, ओ, आर हे होते. ही अक्षरे वेगवेगळ्या फाँटमध्ये वापरल्यानंतर त्यांना किती जागा लागते, याची पाहणी केली. टाइम्स न्यू रोमन, गॅरामाँड, सेंच्युरी गॉथिक आणि कॉमिक सॅन्स या फाँटचा वापर त्याने केला. या फाँटचा वापर केल्यानंतर प्रिंट काढण्यासाठी किती शाई लागते, याचा संगणकप्रणालीद्वारे त्याने अभ्यास केला. या संशोधनातून गॅरामाँड फाँटसाठी सर्वांत कमी शाई लागत असल्याचा निष्कर्ष समोर आला.

ब्रिटनच्या रस्त्यावर मराठमोळी गुढी

गुढीपाडव्यानिमित्त होणाऱ्या शोभायात्रांची नवी प्रथा आता सातासमुद्रापार पोहोचली आहे. गुढीपाडव्यानंतर (५ एप्रिल) लंडनजवळील स्लाव या शहरात स्थायिक मराठी मंडळींनी मराठी नववर्षानिमित्त शोभायात्रा काढली आणि ब्रिटनच्या 'हाय स्ट्रीट' वर गुढी उभारली. पारंपरिक भारतीय वेषात नटलेल्या स्लायवासीयांनी शोभायात्रेत भाग घेतला. त्याचप्रमाणे लंडनच्या महाराष्ट्र मंडळाकडूनही गुढी उभारण्यात आली. चार पुणेरी ढोलांच्या साथीत महाराष्ट्र मंडळाच्या ढोल-ताशा पथकाने 'डॉलिस हिल'चा भाग दणाणून सोडला.

लंडनच्या नैर्ऋत्येला असणाऱ्या स्लाव शहरात अनेक मराठीजन स्थायिक झाले आहेत. त्यांनी स्थापन केलेल्या स्लाव मित्र मंडळातर्फे दरवर्षी गणेशोत्सव, नवरात्रोत्सव साजरा होतो. पण यंदा प्रथमच मराठी नववर्ष दिन ब्रिटनमध्ये सार्वजनिक स्तरावर साजरा झाला.

या शोभायात्रेला २५० च्या आसपास उपस्थिती होती. नऊवारी साडी, धोतर, झब्बा अशा वेषात सजलेल्या ब्रिटनस्थित भारतीयांनी वाद्यांच्या गजरात हाय स्ट्रीटवरूप गुढी मिरवत नेली.

पृथ्वीसारखा नवा ग्रह

खगोलशास्त्रज्ञांनी प्रथमच पृथ्वीसारखा एक ग्रह शोधून काढला असून, त्यावर पाणी आणि जीवसृष्टीला पोषक वातावरण असण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

नासाच्या केप्लर दुर्बिणीने खगोलशास्त्रज्ञांनी शोधून काढलेला हा ग्रह पृथ्वीपासून ५०० प्रकाशवर्ष दूर असून, त्यांनी या ग्रहाला 'केप्लर -१८६ एफ' असे नाव दिले आहे. 'या पूर्वी अंतराळात जीवसृष्टीय पोषक क्षेत्रात आढळलेले सर्व ग्रह पृथ्वीपेक्षा ४० पट मोठे होते; तसेच त्यांच्याबद्दल माहिती मिळवणे खूपच आव्हानात्मक होते. मात्र केप्लर - १८६ एफ या ग्रहाची रचना आपल्या पृथ्वीसारखी आहे.'असे खगोलशास्त्रज्ञांनी म्हटले आहे. तर 'केप्लर - १८६ एफ या ग्रहाचा शोध लागणे हे अंतराळ क्षेत्रातील महत्त्वाचे पाऊल आहे.' असे नासाच्या अंतराळभौतिकी विभागाचे संचालक पॉल हर्टझ् यांनी म्हटले आहे.

'सीडॅक'च्या मगदूम यांचा 'स्वराज्याचे शूर सेनानी' संदर्भग्रंथ

शहाजीराजे, छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांच्यापासून ते येसाजी कंक, कान्होजी आंग्रे, यशवंतराव होळकर यांच्यापर्यंत स्वराज्य निर्मितीतील अनेक शूर सेनानींचा इतिहास चित्रशबदबद्ध झाला आहे. प्रगत संगणन विकास केंद्रातील (सीडॅक) तांत्रिक अधिकारी दामोदर मगदूम यांनी 'स्वराज्याचे शूर सेनानी' नावाचा संशोधनपर संदर्भग्रंथ तयार केला आहे.

स्वराज्यासाठी प्राणार्पण केलेल्या अनेक सेनानींचा इतिहास, त्यांची समाधी - स्मारके आणि वंशावळीची इत्थंभूत माहिती यात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य निर्मितीतील योगदान, त्यांच्याबरोबरील शूर मावळ्यांची कामगिरी यात आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात, कर्नाटक आणि हरियाना या पाच राज्यांत चार वर्षे संशोधन केल्यानंतर मगदूम यांनी संदर्भग्रंथाची निर्मिती केली आहे. यातून मिळणाऱ्या रकमेचा उपयोग किल्ल्यांच्या संवर्धनासाठी केला जाणार आहे.

लढाईची ठिकाणे, त्या ठिकाणाची स्मारके, समाधी, वंशजाकडील कागदपत्रे, थेट वंशजांशी संवाद, पुरातत्त्व खात्याची मदत त्यांनी घेतली आहे. शिवाजी महाराजांचे वंशज छत्रपती युवराज संभाजीराजे यांच्यासह इतरांकडून यातील माहिती तपासून घेतली आहे. त्यामुळे त्यात अधिकृतपणा

आला असल्याचे त्यांनी सांगितले.

गोदाजी जगताप, पिलाजीराव सणस, नावजी बलकवडे, राणोजी शिंदे, रायाजी जाधव, चांदजीराव पाटणकर, संताजी शिळीमकर, बाळोजी ढमाले, नेताजी शिंदे, मानाजी पायगुडे अशा अनेक सेनानींची गाथा यात आहे. संक्षिप्त पद्धतीने इतिहास समजून घेण्यासाठी मराठी माणसांबरोबरच राज्य आणि केंद्रीय पुरातत्त्व खात्यालाही याची मदत होणार आहे. लवकरच याचे डिजिटायझेशन करून ऑनलाइन वाचकांनाही ते उपलब्ध करून दिले जाणार असल्याचे मगदूम यांनी सांगितले.

कोल्हापूरच्या मगदूम यांनी इलेक्ट्रॉनिक्समध्ये 'एमटेक' पदवी मिळवली. हैदराबाद येथून रिमोट संन्सिंगचे प्रशिक्षण, सेंटर फॉर स्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजी एज्युकेशन इन एशिया अँड पॅसिफिकमधून सॅटेलाइट कम्युनिकेशनचे शिक्षण घेतले. त्यासाठी त्यांना संयुक्त राष्ट्रसंघाची फेलोशिपही मिळाली. रेडिओलहरींतील संशोधनासाठी त्यांना माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते गौरविण्यात आले. महाराष्ट्राची संस्कृती आणि इतिहासासंबंधी असलेल्या 'मराठी देशा' या संकेतस्थळाला राज्य सरकारचा 'सर्वोत्कृष्ट मराठी संकेतस्थळ' हा पुरस्कार मिळाला आहे.

तमासगीर रघुवीर खेडकर यांचे अभ्यासवर्गात सादरीकरण

''माझी तुम्हा सर्वांना विनंती आहे... तमाशाला कृपया नावे ठेवू नका! ही ग्रामीण मातीतली कला आहे. त्यातला विनोद ग्रामीण असला तरी तो अश्लील नाही. घरातली हंडाभर गरिबी विसरून तमासगीर तुमच्यापुढे हसवायला उभा राहतो. त्याला कृपया हिणवू नका!'' अशी आर्जवी साद तमाशा कलावंत रघुवीर खेडकर यांनी प्रेक्षकांना घातली.

नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा (एनएसडी) व पुणे विद्यापीठाचे ललित कला केंद्र यांनी संयुक्तपणे आयोजिलेल्या 'अंडर्स्टॅण्डिंग थिएटर' या नाट्य अभ्यासवर्गात खेडकर आणि पार्टीने पारंपरिक तमाशा सादर केला. प्रा. सतीश आळेकरांनी त्यांच्याशी संवाद साधला.

खेडकर म्हणाले, ''आज समाजात तमासगिरांना किंमत राहिलेली नाही. तमासगीर म्हणून आमच्या जातीतही आम्हाला स्वीकारले जात नाही. पण या कलेशी, इथल्या परंपरेची नाळ जोडलेली आहे. ती टिकली पाहिजे. आज तमाशाला तरुणांची गरज आहे. जगात झालेल्या अनेक बदलांसोबत

तमाशातही बदल घडेल. काळानुरूप बदलणाऱ्या तमाशाला आता तरुणांनी पुढे नेण्याची गरज आहे.''

आपल्या संचात सुमारे ७० कलावंत सहकारी उत्तर प्रदेशातील असल्याचे खेडकरांनी सांगितले. ''महाराष्ट्रातील लोकांकडून कष्टाची कामे होत नाहीत. त्यांना थोड्या वेळात खूप पैसा हवा असतो... तमाशात मात्र खूप वेळानंतर थोडा पैसा मिळतो. हे परप्रांतीय मात्र आमच्यासोबत खांद्याला खांदा लावून उभे राहिले,'' असे ते म्हणाले.

दुर्मिळ ग्रंथाचे साहित्य परिषदेत प्रदर्शन

ग्रंथ जुने झाले, तरी त्यातील विचार जुने होत नाहीत. या ग्रंथांत प्रचंड ज्ञानभांडार असते. हे भांडार नव्या पिढीपर्यंत पोहोचवायला हवे आणि त्यासाठी नवीन माध्यमांची मदत घ्यायला हवी, असे मत पुरातत्त्व आणि मूर्तिशास्त्राचे अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषद आणि जनवाणी या संस्थेतर्फे दुर्मिळ ग्रंथ आणि नियमकालिकांचे प्रदर्शन साहित्य परिषदेत आयोजित करण्यात आले आहे. त्याचे उद्‌घाटन देगलूरकर यांच्या हस्ते करण्यात आले. वारसा सप्ताह आणि जागतिक ग्रंथ दिनानिमित्त हे प्रदर्शन भरविण्यात आले आहे.

एमकेसीएलचे व्यवस्थापकीय संचालक विवेक सावंत, परिषदेच्या कार्याध्यक्षा डॉ. माधवी वैद्य, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्ष सुनील महाजन, कार्यवाह महेंद्र भुंजाळ, जनवाणीच्या समन्वयक प्राजक्ता पणशीकर उपस्थित होते.

विवेक सावंत यांच्या हस्ते दुर्मिळ ग्रंथांच्या डिजिटलायझेशन प्रकल्पाचा आरंभ करण्यात आला. 'तुकारामबुवांचे विचार' (सन १९२२) या पहिल्या पुस्तकाची डिजिटल प्रत यावेळी प्रकाशित करण्यात आली. या वेळी बोलताना सावंत म्हणाले, ''हे मोठे काम आहे. ते एकट्यादुकट्याने होणार नाही. त्यासाठी सामाजिक चळवळच उभी करायला हवी. डिजिटलायझेशनचा प्रभाव वाढल्याने छापील पुस्तकांवर परिणाम होईल. ही भीती खरी नाही.

दाभोलकरांना काव्यांजली

ज्येष्ठ साहित्यिक रा. ग. जाधव यांनी डॉ. दाभोलकर यांच्या आठवणी

‘हे मित्रवर्या!’ कवितासंग्रहात जागविल्या आहेत. साधना ट्रस्टच्या या कवितासंग्रहाचे ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांच्या हस्ते प्रकाशन झाले. या वेळी मुक्ता दाभोलकर, अविनाश पाटील व्यासपीठावर होते. २० ऑगस्टला झालेल्या प्राणांतिक हल्ल्याचा ‘शॉक’ आणि आता शोक याचा एक मोठा तणाव वातावरणात जाणवत होता, दाभोलकरांच्या आठवणींत हरवलेले, तसेच अजून मारेकऱ्यांचा तपास न लागल्याने नाराजीची झालर असलेले भाव उपस्थितांच्या चेहऱ्यावर होते. सर्वच वक्त्यांनी या वेळी दाभोलकरांसोबतच्या आठवणींना उजाळा दिला.

डॉ. लागू म्हणाले, ‘‘सामाजिक कृतज्ञता निधी संकलनासाठी राज्यभर आम्ही नाटकाचे दौरे केले. डॉ. दाभोलकर आमचे नेतृत्व करत होते. तो काळ आणि ते दौरे काही औरच होते. दाभोलकर आज असते, तर आजही माझे हे नाटकांचे दौरे सुरू असते. दाभोलकर खऱ्या अर्थाने मित्रवर्य होते. सगळ्याच मानवजातीविषयी मित्रभाव असणारी फार थोडी माणसं असतात. कार्यकर्त्यांची पातळी सोडून वरच्या पातळीवर पोहोचले होते. तेथून संवाद साधत होते.’’

मुक्ता दाभोलकर म्हणाल्या, ‘‘वाटेल तिथे पोहोचणे आणि फायद्याचा विचार न करता फिरणे एवढेच त्यांचे विश्व होते.’’ संयम, विचार आणि ते पुढे नेण्यासाठी माणसे जोडणे व प्रगल्भता अशीच जीवनशैली त्यांनी जपली, असे मत पाटील यांनी व्यक्त केले.

मालिका लिहिण्याचे लेखकांपुढे आव्हान

कला ही कलाच असते, ती तिच्याच कलाने घ्यायला लावते. जुळून आलं सगळं तर कलाकंद, नाहीतर सगळ्याचा काला करून जाते. अशा प्रकारे कवितेच्या माध्यमातून कलाकारांनी आपल्या पडद्यावरचा व पडद्यामागील प्रवास रसिकांसमोर उलगडला. लोकांना आवडणारी मालिका लिहिण्याचे लेखकांपुढे आव्हान आहे, असे मत दिग्दर्शक हेमंत देवधर यांनी व्यक्त केले.

डीएस कुलकर्णी फाउंडेशनतर्फे आयोजित ‘डीएसके गप्पा’ या कार्यक्रमात अभिनेत्री प्राजक्ता माळी, सुकन्या कुलकर्णी, उदय टिकेकर, शर्मिष्ठा राऊत, लोकेश गुप्ते, ललित प्रभाकर, लेखिका अरुणा जोगळेकर, दिग्दर्शक हेमंत देवधर उपस्थित होते.

देवधर म्हणाले, ''एखाद्या माध्यमातून व्यक्त करणारी प्यादी म्हणजे कलावंत. रोज रंजक लिखाण करणे अवघड असते. मालिका लोकांना आवडेल अशी लिहिणे हे लेखकांसमोरचे आव्हान आणि ते मांडणे हे कलाकरांचे कौशल्य.'' राजेश दामले यांनी या कलाकरांची मुलाखत घेतली.

डीएसके गप्पांमध्ये बोलताना ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार म्हणाले, ''मनुष्य सुखासाठी जन्माला येतच नाही. तो दुःखच भोगत असतो. या दुःखातून माणसाची सुटका होऊ शकत नसली, तरी ते सहन करण्याची शक्ती तो अध्यात्मातून शोधण्याचा प्रयत्न करतो. परंतु त्याला ती शक्ती विनोदातूनच मिळते. विनोद हा दुःख विसरण्यासाठी संजीवनी मंत्र आहे.'' 'विनोद एक प्रवास' या कार्यक्रमाच्या वेळी साहित्यिक प्रा. द. मा. मिरासदार, वात्रटिकाकार रामदास फुटाणे, विनोदी लेखिका मंगला गोडबोले, दीपक देशपांडे उपस्थित होते. राज काझी यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

दुसरी गोष्ट

'प्रेक्षकांच्या अग्रक्रमावर दूरचित्रवाणीऐवजी नाटक, चित्रपट कसे आणता येतील. हे पाहिले पाहिजे. त्यासाठी जास्तीत जास्त प्रेक्षकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे,'' असे दिग्दर्शक चंद्राकांत कुलकर्णी यांनी सांगितले. पूर्वी राष्ट्रीय चित्रपट पारितोषिकांत दक्षिणी चित्रपटांचा दबदबा होता. आता ती जागा मराठी चित्रपटांनी घेतली आहे. मात्र चांगल्या आणि वाईट चित्रपटांतली दरी कमी व्हायला हवी, असेही ते म्हणाले.

'जीवनगाणी फिल्म्स' निर्मित आणि जिगिषा क्रिएशन्सची प्रस्तुती असलेला त्यांचा 'दुसरी गोष्ट' हा चित्रपट १ मे रोजी प्रदर्शित होत आहे. यावेळी चित्रपटाचे लेखक अजित दळवी, अभिनेत्री नेहा पेंडसे, सहदिग्दर्शका प्रतिमा जोशी आणि निर्मात्या डॉ. शैलजा गायकवाड, मंजिरी हेटे व प्रसाद महाडकर उपस्थित होते. ''चित्रपट पैसा मिळवणारा असावा, असे प्रत्येक निर्मात्याला वाटतेच. पण त्याहीपेक्षा तो कल्याने आनंद होतो का, अभिमान वाटतो का, हे जास्त महत्त्वाचे आहे. या चित्रपटाने आम्हाला असे समाधान दिले,'' असे निर्माते प्रसाद महाडकर यांनी सांगितले. 'आजचा दिवस माझा'ला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल संपादक विजय बाविस्कर यांच्या हस्ते दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी, लेखक अजित दळवी आणि सहदिग्दर्शका प्रतिमा जोशी यांचा या वेळी सत्कार

करण्यात आला.

लेखक अजित दळवी म्हणाले, ''आजचा दिवस माझा' या चित्रपटात राजकारण करायचे कशासाठी?' हा प्रश्न होता. 'दुसरी गोष्ट' ही माणसांची तर गोष्ट आहेच, पण ती देशाची आणि आपल्या प्रजासत्ताकाचीही गोष्ट आहे. आज आमच्या चित्रपटावर राष्ट्रीय पारितोषिकाची मोहोर उमटली असली, तरी असे वेगळे चित्रपट बनवताना काय अडचणी येतात, त्याची कल्पना लेखक दिग्दर्शकालाच असते.''

कुलकर्णी म्हणाले, ''या व्यवसायात येताना एक गोष्ट नक्की होती, की आपल्याला 'सेन्सेटिव्ह' काम करायचे आहे, 'सेन्सेशनल' नाही. पूर्वतयारी पक्की होती. काय करायचे, ते डोळ्यांसमोर होते. सुरुवातीला इथे प्रेक्षकांना असेच लागते,' अशा समजुती होत्या. पण राज्य नाट्यस्पर्धेतल्या प्रयोगांनी समविचारी लोकांनी धाडस दिले आणि सगळेच चित्र बदलत गेले. प्रेक्षकांच्या आकलनशक्तीवर विश्वास ठेवला. त्यामुळे पठडीतील काम कधीच केले नाही. पण त्यामुळे स्वत:ला सतत सिद्धही करावे लागले.''

नवीन चित्रपटाबद्दल बोलताना ते म्हणाले, ''प्रत्येकाला जन्माने एक व्यक्तिमत्त्व दिलेले असते. ती त्याची गोष्टच असते. मात्र, त्यात त्याचा काही सहभाग नसतो. पण त्यापलीकडेच आपले असे काही व्यक्तिमत्त्व निर्माण करणाऱ्या, दुसरी गोष्ट निर्माण करणाऱ्या माणसाची ही कथा आहे. या चित्रपटाची पार्श्वभूमी राजकीय आहे, पण त्यापेक्षाही ती प्रेरणा देणारी गोष्ट आहे. यात काही सत्य घटनांचा संदर्भ आहे, पण कुणाच्याही आयुष्यावर हा चित्रपट आधारलेला नाही.''

''दक्षिणेकडच्या चित्रपटांपेक्षा मराठी चित्रपटात काम केल्याने मी अधिक समृद्ध होते,'' असे नेहा पेंडसे हिने सांगितले. ''या चित्रपटाची टीम आणि दिग्दर्शक खूप प्रगल्भ असल्याने मला माणूस म्हणून खूप काही मिळाले. दक्षिणेत पैसा चांगला मिळाला, पण मराठीत कलाकार म्हणून खूप समाधान मिळाले,'' असेही तिने सांगितले.

कन्नडमधील समकालीन साहित्य

जागतिकीकरणाचा रेटा आज इतरांप्रमाणे कर्नाटकालाही पोचत आहे आणि त्याचे पडसाद कन्नड साहित्यात उमटताना दिसत आहेत. लहान गावातून येऊन शहरात स्थायिक झालेल्या लेखकांची परंपरा कन्नड

साहित्यात आधीपासूनच आहे. त्यामुळे इथल्या जवळ जवळ प्रत्येक लेखकाची मुळं गावाकडे असतात आणि त्याचं प्रतिबिंब त्यांच्या साहित्यात उमटतं. आज ती खेडीही बदलत चालल्यामुळे कन्नड लेखकांच्या लेखनातही तो फरक दिसत आहे.

मंगळूर उडपीजवळच्या कांतावर या गावात राहणाऱ्या ना. मोगसाले नावाच्या लेखकाने त्या भागातील आता लुप्त होत चाललेल्या मातृप्रधान व्यवस्था असलेल्या कुटुंबावर जागतिकीकरणाच्या पडलेल्या प्रभावाचं वर्णन करणारी तीन पिढ्यांची कहाणी 'उल्लंघन' या कादंबरीत रंगवली आहे.

नेमिचद्र नावाची एरोनॉटीक इंजिनियर असलेली एक लेखिका कथालेखनाबरोबरच जगभर आणि देशभर व्यवसायाच्या दृष्टीनं होत असलेल्या भ्रमंतीविषयी अत्यंत संवेदनाशीलपणे लेखन करत असते.

काही वर्षांपूर्वी एका पोलीस खात्यात अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या आणि स्वेच्छेने एका दलित लेखकाशी विवाहबद्ध झालेल्या कवयित्रीची एक कविता ऐकली होती. तिचा मथितार्थ आठवतो तो असा, अत्याधुनिक कपड्यातली एक धीट मुलगी पाहून कवियत्री विचारते, इतकी आधुनिक अशी तू कुठून आलीस? ती मुलगी उत्तरते, तुझ्यातूनच! आता तू मला बघून का दचकते आहेस?

अशीच एक कथाही आढळली होती. आधुनिक सोसायटीमधल्या दोन विवाहित तरुणी. एक मुलाची आई. दुसरीला मूलबाळ नाही. संध्याकाळी खालच्या बागेत सहज भेटून गप्पा मारताना दोघींचं बोलणं औपचारिक आहे. पण इंटरनेटच्या माध्यमातून बोलताना त्यांच्यामधील क्रूरपणा बाहेर येतो. त्याचं पर्यवसान एकीच्या आत्महत्येत होतं.

ब्यारी या मंगळूरलगतच्या मुसलमान समाजात बोलल्या जाणाऱ्या बोली भाषेतील 'रामायण' आणि 'महाभारता'चा कन्नड अनुवादही नुकताच प्रकाशित झाला आहे. तसंच फकीर महंमद कटपाडी यांनी लिहिलेलं मंगळूर भागातील शेतकऱ्यांनी दिलेल्या ऐतिहासिक लढ्यातील पुस्तकही अलिकडेच प्रकाशित झालं आहे.

गिरीश कार्नाड यांचं नुकतंच प्रकाशित झालेलं नाटक 'बेंदकाळूरु बेंगळूरु' त्याचा मराठी अनुवाद 'उणे पुरे शहर एक' हाही प्रसिद्ध झाला आहे आणि त्याचे पुणे-मुंबई-नागपूर येथे प्रयोगही होत असतात. यात एका मोठ्या 'गावा'चं 'महानगरा'त रूपांतर होत असताना बदलणाऱ्या मानसिकतेचं

चित्रण केलेलं आहे. पंचाहत्तर ऐंशीच्या घरातल्या या दोन्ही संवदेनशील लेखकांच्या आधुनिक जगाच्या संदर्भातील प्रतिक्रिया म्हणून या कलाकृती महत्त्वाच्या आहेत.

तसंच वैदेही या कथा-कादंबरी-नाटक-कविता-चरित्रलेखन या सर्व क्षेत्रात लीलया संचार करणाऱ्या लेखिका. आजवर इतर भाषांप्रमाणे कन्नडमध्येही कमलादेवी चटोपाध्याय यांच्यावर बरेच ग्रंथ लिहिले गेले आहेत. त्या मूळच्या मंगळूरच्या असल्यामुळे कन्नडिगांचे त्यांच्यावर विशेष प्रेम. आता वैदेही यांनी त्यांच्यावर एक स्वगत सिद्ध केलं आहे. त्यामुळे एका पारंपरिक पार्श्वभूमी असलेल्या संवेदनशील, कलाप्रेमी, बुद्धिवान, प्रगल्भ महिलेचा वैधव्य, घटस्फोट आणि मैत्र या संबंधीचा स्वत:शी झालेला संवाद साकार होईल. तसंच हे लेखन 'सादरीकरणा'साठी अनुकूल असल्यामुळे ते जास्त लोकांपर्यंत पोचावं अशी लेखिकेची अपेक्षा आहे.

– उमा वि. कुलकर्णी

समकालीन बंगाली साहित्य : मृणालिनी गडकरी

बंगालच्या साहित्यक्षेत्रावर नजर टाकल्यास प्रकर्षाने लक्षात येतं की, बंगाली साहित्याचा स्थायीभाव 'प्रयोगशीलता' हा आहे. विषय, आशय, अभिव्यक्ती आणि भाषा अशा महत्त्वाच्या गोष्टींमध्ये प्रयोग करण्याची प्रवृत्ती, नावीन्याची ओढ बंगाली जुन्या-नव्या, लहान-थोर साहित्यिकांत दिसून येते. बंगाली कथा-कादंबरीचा विचार केल्यास, त्यातून मांडल्या गेलेल्या विषयांची विविधता आपल्याला थक्क करते. मानवी जीवनात घडणारी कोणतीही घटना बंगाली साहित्यिकांना वर्ज्य नाही. क्षुल्लक वाटणारी एखादी घटना सुंदर कथारूप घेऊन समर्थपणे वाचकांपुढे येते. अभिव्यक्तीतही लेखक निराळेपण आणत असतात.

कवितेचा विचार करता, बंगाली अर्वाचीन कवितेचा जन्मच मुळी उत्स्फूर्त प्रयोगशीलतेतून झालेला दिसतो. प्राचीन काळी बंगालमध्ये पद्यरचना होत होती, ती धार्मिक व्रतवैकल्यासाठी. पुढे आख्यानकाव्यांचा जन्म झाला. पण अठराव्या शतकात शहरातून 'कविवाला' संप्रदाय निर्माण झाला. यांच्या रचनांचा दर्जा अगदी सामान्य असेलही, पण यातूनच आधुनिक कविता जन्माला आली. सध्या शंख घोष, अनिता अग्निहोत्री, जय गोस्वामी, श्रीजात यांच्यासारख्या नावाजलेल्या कवींबरोबर अनेक कवी

परखडपणे वास्तव चितारताना दिसतात. सुजित दास 'मध्यरातेर कोलकाता' या कवितेत काय म्हणतात पाहा : 'सहावा पेग संपवून शांतपणे, क्रेडिट कार्ड काढून खिशातून, मायकेल मधुसूदनांनी मिटवलं बिल। समोरच्या रस्त्यावर पांढऱ्या ॲम्बॅसडरमध्ये ईश्वरचंद्र पाहत होते त्यांची वाट। बादुडबागानहून उलटे आले होते ते मायकेलला देण्यासाठी लिफ्ट। ईश्वरचंद्र अजूनही एसी गाडी नाही वापरत आणि मोबाइल तर त्यांना नको असतो डोळ्यांसमोर।' या ओळीतून मायकेल मधुसूदन आणि ईश्वरचंद्र यांचा स्वभाववैशिष्ट्यांना आधुनिक काळाच्या प्रकाशात स्पष्ट केले आहे.

मायकेल मधुसूदनांचा उल्लेख झालाच आहे. म्हणून सांगते की, बंगालीत काव्यरचना केल्यावर मायकेल आपल्या मित्राला म्हणाले होते रॉयल बेंगॉल टायगरला रक्ताची चटक लागली, आता बघायलाच नको. हीच उक्ती रवीन्द्रनाथांनाही लागू पडते. काव्यानंतर त्यांचे प्रेम होते नाटकांवर. त्यांनी 'नाटक' या प्रकारात अनेक प्रयोग केले. 'रक्तकरबी', 'फाल्गुनी', 'राजा', 'डाकघर' या नाटकांतून ते स्पष्टपणे जाणवतात. 'रक्तकरबी'मधील 'राजा' ही महत्त्वाची व्यक्तिरेखा रंगमंचावर येतच नाही. येतो तो त्याचा फक्त आवाज! आजही प्रयोगशीलतेची ही परंपरा सुरूच आहे. उदाहरणार्थ, 'के' (कोण) या नवीन नाटकात एक अभिनव प्रयोग नाटककार ब्रात्य बसूंनी केला आहे. हे नाटक 'क्राइम थ्रिलर' असलं तरी त्याला 'कॉमेडी'च्या चौकटीत बसवलं आहे. प्रवेशांतरासाठी त्यांनी प्रकाशयोजना आणि वातावरणनिर्मितीची कौशल्याने उपयोग केला आहे. त्यामुळे प्रेक्षकांचा रसभंग न होता नाटक पुढे सरकतं. नाटकातील संवाद सरळ साधे पण रंगाचा उपयोग अतिशय विचारपूर्वक केला आहे. या नाटकातील डिटेक्टिव्ह संपूर्ण पिवळ्या पोशाखात - पिवळा ट्रॅक स्यूट, पिवळे स्पोर्ट्स शूज, पिवळी टोपी आणि भला मोठा पिवळा गॉगल - अशा काहीशा विदुषकी पद्धतीने रंगमंचावर येतो. संवादातून तो क्रिकेटवेडा असल्याचं कळतं. पिवळ्या रंगाचा उपयोग 'मोटीफ' म्हणून केला गेला आहे. क्रिकेटचा संदर्भ समाजातील प्रत्येक क्षेत्रासाठी रूपक म्हणून योजला आहे.

'धूसर गोधूलि'मध्ये असाच नावीन्यपूर्ण प्रयोग अगदी अलीकडेच केला गेला. शंख बसू यांच्या कवितेवर आधारित या नाटकाला निर्दिष्ट अशी नाटकाची चौकट नाही. यात काव्यवाचन, लालन फकिराची गीतं, नृत्य आणि माइम यांचा प्रयोग केला आहे. असे प्रयोग रसिक प्रेक्षकांना आनंद

देतातच, पण नाटककाराला आणि कलाकरांनाही वेगळं आव्हान पेलल्याचं समाधान देतात.

नवे कोरे

बंदा रुपाया!

लेखक
विश्वास पाटील

किंमत : २२०/-रु.
पोस्टेज : ३०/-रु.



मराठ्यांच्या गौरवशाली इतिहासाने भारलेली राने...
चित्रपटांचे गूढ-गहिरे चांदणे...
साहित्याची कोरीव लेणी....
मराठी नाटक आणि तमाशाच्या लोभसवाण्या खाणी...
संगीताच्या रसिल्या मैफली...
या पंचरंगी मुशाफिरीतून एका कादंबरीकाराने जडवलेला
अस्सल छापाचा हा
बंदा रुपाया!

कवी विष्णू खरे यांना यंदाचा 'नामदेव ढसाळ शब्द पुरस्कार'

'शब्द द बुक गॅलरी' आणि 'मुक्त शब्द मासिक' यांच्या वतीने दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्कारांमध्ये या वर्षापासून 'नामदेव ढसाळ शब्द पुरस्कारा'चा अंतर्भाव झाला आहे. हिंदीतील थोर कवी विष्णू खरे यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

कोणत्याही भारतीय भाषेमध्ये कवितेच्या क्षेत्रात असाधारण कार्य करणाऱ्या कवीला हा पुरस्कार दिला जाणार आहे.

अनुवादित साहित्यकृतीसाठी दिला जाणारा 'दुर्गा भागवत शब्द पुरस्कार' या वर्षी सिमॉन द बोव्हा यांच्या जगद्विख्यात 'सेकंड सेक्स' या ग्रंथाचा अनुवाद करणाऱ्या करुणा गोखले यांना जाहीर झाला आहे. दहा हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. हा अनुवाद पद्मगंधा प्रकाशने प्रकाशित केला आहे.

'बाबुराव बागूल शब्द पुरस्कार' किरण गुरव यांच्या 'राखीव सावल्यांचा खेळ' या शब्द पब्लिकेशनने प्रकाशित केलेल्या कथासंग्रहास जाहीर झाला आहे. दहा हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह हे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

कथनात्म साहित्यातील एकूण लेखकीय कारकिर्दीसाठी दिला जाणारा 'भाऊ पाध्ये साहित्य गौरव शब्द पुरस्कार' या वर्षी मराठी ऐतिहासिक कादंबरीला नवे वळण देणाऱ्या नंदा खरे यांना जाहीर झाला आहे. एकवीस हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असे स्वरूप आहे. ३ मे रोजी प्रबोधनकार ठाकरे मिनी थिएटर, बोरिवली येथे प्रख्यात कादंबरीकार किरण नगरकर यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार असून, डॉ. आ. ह. साळुंखे आणि गोविंद पानसरे हे प्रमुख पाहुणे असतील.

'असा घडला भारत'ला 'मसाप' तर्फे पुरस्कार

उत्कृष्ट छपाई, चांगल्या दर्जाची पाने, उत्तम मुखपृष्ठ म्हणजे चांगले पुस्तक नाही. तर पुस्तक निर्मितीमागे एक विचार असला पाहिजे. मजकूर अधिक वाचनीय कसा करता येईल याचा विचार प्रकाशकाने करावा, असे मत रोहन प्रकाशनचे प्रदीप चंपानेरकर यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे उत्कृष्ट ग्रंथ निर्मितीसाठी दिला जाणारा 'पुष्पा पुसाळकर पुरस्कार' यंदा रोहन प्रकाशनाच्या 'असा घडला भारत' या ग्रंथाला साहित्यिक राजेंद्र बनहट्टी यांच्या हस्ते देण्यात आला.

'असा घडला भारत या ग्रंथाची निर्मिती करणे मोठे आव्हान होते. सुमारे सात वर्षे त्याचे काम सुरू होते. व्यावसायिक फायद्याच्या पलीकडे विचार केला तरच अशी निर्मिती होते,' असे चंपानेरकर यांनी नमूद केले. पुरस्काराचे हे चौथे वर्ष आहे.

दिवाळी अंक पुरस्कार

''मासिके बंद पडायला लागली असताना दिवाळी अंकांनी कथा-कवितांना स्थैर्य दिले. जागतिकीकरणाचा बुलडोझर आपल्याला तुडवीत जाणार असून हे आव्हान सर्वांनाच पेलावे लागणार आहे. याला साहित्याही अपवाद राहिलेले नाही,'' असे मत साहित्यिक भारत सासणे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेने घेतलेल्या दिवाळी अंक स्पर्धेचे पुरस्कार (२०१३) साहित्य, मुक्तशब्द, संवाद, अक्षरवेल, वयम, छान प्रबोधन, अनुभव, हंस या अंकांनी पटकाविले आहेत.

या वेळी चंद्रकांत शेवाळे, मीनाक्षी केळकर, मनोहर सोनवणे, अंजली कुलकर्णी उपस्थित होते.

सासणे म्हणाले, ''दिवाळी अंकातील जाहिरातींचे आव्हानही पेलावे लागेल. दिवाळी अंकांनी संस्कृती संवर्धनाचे काम केले आहे.''

प्रास्ताविक डॉ. माधवी वैद्य यांनी केले.

'व्हॅमनिकॉम'चा पदवीदान समारंभ

''ताणतणाव, नैराश्य, मत्सर यामुळे आपल्याला खरे सुख कधीच अनुभवता येत नाही. म्हणूनच प्रत्येकाने आनंदी जीवन जगण्याला प्राधान्य

द्यावे. त्यामुळे आपल्या क्रयशक्तीमध्ये वाढ होऊन स्वत:बरोबरच राष्ट्राचाही विकास होण्यास मदत होईल,'' असे मत भूतानचे वित्तमंत्री नॉरबू वाँगचूक यांनी व्यक्त केले.

वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थेच्या (व्हॅमनिकॉम) कृषी व्यवसाय व्यवस्थापनाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा दीक्षान्त समारंभ झाला. या प्रसंगी माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील, माजी मंत्री शिवाजीराव पाटील, पोलीस महासंचालक अरूप पटनाईक, फिनोलेक्स कंपनीचे कार्यकारी अध्यक्ष प्रकाश छाब्रिया, संस्थेचे संचालक संजीव पट्टजोशी, प्रज्ञा सोनी, प्रा. निशांत उप्पल उपस्थित होते.

रूपाली नागणे ही विद्यार्थिनी सुर्वणपदकाची मानकरी ठरली, तर महेशकुमार, प्रजापती, आकांक्षा जोशी या विद्यार्थ्यांना अनुक्रमे रौप्य व ब्राँझपदकाने गौरविण्यात आले.

'व्हॅमनिकॉम' मध्येच दोन वर्षे शिक्षण घेतलेल्या वाँगचुक यांनी आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, ''भूतानने आतापर्यंत आनंदी जगण्याला प्राधान्य दिले आहे. आमची हीच ओळख चांगले प्रशासन आणि पर्यावरण निर्माण करण्यास कारणीभूत ठरली आहे. त्यामुळेच तिचे संवर्धन करण्याचा आता प्रयत्न होत आहे. बुद्धिमत्तेच्या जोरावर विविध क्षेत्रांत आपण यश मिळवू शकतो. परंतु देश घडविण्याची जबाबदारी आपल्यावर आहे हे लक्षात घेऊन आनंदी जगण्याचा मंत्र विद्यार्थ्यांनी जपावा, तरच आयुष्यात यशस्वी होता येईल.''

पाटील म्हणाल्या, ''जगण्याकडे सकारात्मक दृष्टीने बघण्यासाठी आनंदी राहायला पाहिजे काम, क्रोध, लोभ, अहंकार, मत्सर आयुष्यात असू नयेत. भरपूर कष्टाप्रमाणेच आनंदालाही तितकेच महत्त्व आहे. राष्ट्रीय उत्पन्नाप्रमाणेच 'एकूण राष्ट्रीय आनंद' कसा वाढेल, याकडेही लक्ष द्यायला हवे. दुष्काळ, गारपीटसारख्या संकटांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे. शेतकऱ्यांना संकटातून मुक्त करण्यासाठी कृषी अभ्यासक्रम केलेल्या विद्यार्थ्यांनी आपले ज्ञान व नवीन संकल्पना उपयोगात आणाव्यात.''

नासाच्या स्पर्धेत पुण्याचा चैतन्य वशिष्ठ पहिला

पुण्याच्या चैतन्य वशिष्ठ या विद्यार्थ्याने यंदाचे 'नासा'च्या 'स्पेस सेटलमेंट' स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. चैतन्य पुण्यातील 'सेंट

आरनॉल्डस् सेन्ट्रल स्कूल'मध्ये सातवीत शिकतो.

'नासा एएपझएस' आणि नॅशनल स्पेस सोसायटी' या संस्थांतर्फे दरवर्षी ही स्पर्धा घेतली जाते. या स्पर्धेत 'माणूस अवकाशात राहायला जाणे कस शक्य होऊ शकेल?' या विषयावर विद्यार्थ्यांनी प्रस्ताव तयार करून पाठवायचे होते. सातव्या इयत्तेतील विद्यार्थ्यांच्या गटात चैतन्यचा प्रस्ताव पहिला आला.

'ब्रह्मा' या त्याच्या प्रकल्पात अवकाश स्थानकाचे भाग बनवतात 'थ्री-डी प्रिंटिंग' तंत्राचा किंवा नॅनोटेक्नोलॉजीचा वापर करणे, अवकाशात टिकणारे अन्न तयार करताना मूळ पेशींच्या 'कल्चर'चा उपयोग करणे, पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापन यंत्रणा वापरणे असे मुद्दे चैतन्यने मांडले आहेत.

डी. एस. कुलकर्णी 'विश्वरत्न'

डी.एस.के विश्व ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने उद्योजक डी. एस. कुलकर्णी यांना 'विश्वरत्न' पुरस्कार ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या हस्ते देण्यात आला. 'विश्वरत्न' पुरस्कार हा डी.एस.के. विश्वमधील माझ्या ग्राहकांनी दिलेला असल्याने यापेक्षा मोठा पुरस्कार असूच शकत नाही, असे मत डी.एस. कुलकर्णी यांनी व्यक्त केले. या वेळी 'गुलमोहर' मासिकाच्या विशेषांकाचे प्रकाशनही करण्यात आले.

डॉ. प्रकाश-मंदा आमटे यांना लक्ष्मी-वासुदेव पुरस्कार

आदित्य प्रतिष्ठानतर्फे हेमलकसा येथील लोकबिरादारी प्रकल्पाचे प्रमुख डॉ. प्रकाश आमटे आणि डॉ. मंदाताई आमटे यांना यंदाचा 'लक्ष्मी-वासुदेव पुरस्कार' (२५ हजार रुपये, सरस्वतीचे शिल्प असलेले स्मृतिचिन्ह, मानपत्र) १४ एप्रिल रोजी टिळक स्मारक मंदिर येथे प्रदान करण्यात आला. उत्तरार्धात छत्रपती शिवाजीमहाराज पुण्यतिथीनिमित्त 'धन्य धन्य शिवराय' हा विशेष सांगीतिक कार्यक्रम विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांनी सादर केला. यापूर्वी स्वामी वरदानंद भारती, दाजीकाका गाडगीळ, स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, लता मंगेशकर, योगाचार्य बी. के. एस. अय्यंगार, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

अमिताभ बच्चन 'इंडियाज ग्लोबल आयकॉन'

केंद्रीय कॅबिनेट मंत्री वायलर रवी यांच्या उपस्थितीत 'बिग बी' अमिताभ बच्चन यांना इंडियाज ग्लोबल आयकॉन पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

जगात सर्वदूर पसरलेल्या भारतीयांनी अनेक क्षेत्रात चमकदार यश मिळवले आहे. राजकारणी, शास्त्रज्ञ, खेळाडू, उद्योजक, व्यावसायिक म्हणून त्यांनी अप्रतिम कामगिरी केली आहे. या यशाची दखल घेण्यासाठी टाइम्स नाऊ सीआयआयसीआय एनआरआय ऑफ द इयर पुरस्कारांचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. १३ देशातून या पुरस्कारांसाठी २८०० प्रवेशिका आल्या. अर्नेस्ट अँण्ड यंग या संस्थेने विजेत्यांच्या निवडीचे काम केले.

ललित कला अकादमी पुरस्कार

ललित कला अकादमी दरवर्षी देशभरातून १० कलाकारांना पुरस्कार देते. या वर्षीच्या मानकऱ्यांत जे. जे. स्कूल ऑफ आर्टस तरुण विद्यार्थी श्रीनिवास म्हेत्रे याचा समावेश आहे. अवघ्या २८व्या वर्षी त्याला हा पुरस्कार मिळाला आहे. लातूर जिल्ह्यातील निलंगा या छोट्याशा गावातून आलेला श्रीनिवास सतत सहा वर्षे ललित कला अकादमीच्या स्पर्धेसाठी चित्र पाठवत होता. एकदा त्याची कलाकृती स्वीकारली गेली; परंतु तिला पुरस्कार मिळू शकला नव्हता. यावेळी मात्र त्याने तो पटकावला. श्रीनिवासचे शिक्षण, सुरुवाताचे कलाशिक्षण, निलंगा येथे झाले; तर बॅचलर ऑफ फाईन आर्ट (बी.एफ.ए) हे त्याने भारती विद्यापीठ, पुणे येथे केले. त्यानंतर मास्टर ऑफ फाईन आर्ट (एम.एफ.ए.), घेण्यासाठी मुंबईच्या सर ज. जी. कला महाविद्यालयात प्रिंटमेकिंग या विभागात प्रवेश घेतला आणि २०११ साली त्याचे शिक्षण पूर्ण झाले. हे शिक्षण घेत असतानाच तो ललित कलेच्या स्पर्धेसाठी चित्र पाठवत असे. सतत सहा वर्षे सातत्याने या महत्त्वाच्या स्पर्धेत भाग घेतल्यावर त्याच्या चित्राला पारितोषिक मिळाले. एक लाख रुपये व प्रमाणपत्र असे हे पारितोषिक आहे. 'प्रिंटमेंकिंग' या विभागात संपूर्ण भारतभरातून त्याच्या कलाकृतींची निवड झाली. 'गायतोंडे, हुसेन, बेंद्रे या श्रेष्ठांप्रमाणे आयुष्यात काहीतरी करून दाखवावे अशी त्याची इच्छा आहे. 'प्रिंट'या माध्यमांत खूप प्रकार आहेत. लिथोग्राफी, लायनी, सेरीग्राफी, ड्रायपॉईंट, वुडकट इत्यादी. या सर्व गोष्टींचा अभ्यास करण्याची संधी त्याला जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्समध्येच त्याला मिळाली. खूप काम करावे आणि

प्रिंट माध्यमात स्वत:ची मुद्रा उमटवावी अशी त्याची इच्छा आहे.

'पुणे प्राइड' पुरस्कार

रेसिडेन्सी क्लबतर्फे यंदाचे 'पुणे प्राइड' पुरस्कार प्रतापराव पवार, विवेक सावंत, आशिष गावडे, देवेन वर्मा, डॉ. अनिल अवचट आणि अनिरुद्ध अत्रे यांना आणि ज्येष्ठ व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांना जीवनगौरव पुरस्कार भय्यूजी महाराज यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करून पुण्याचे नाव राष्ट्रीय पातळीवर नेणाऱ्यांना पुणे प्राइड या पुरस्काराने गौरविण्यात येते. १९११ पासून हा पुरस्कार देण्यात येतो.

जे. आर. डी. टाटा यांना पुरस्कार

'यशस्वी उद्योजक होण्यासाठी आत्मविश्वासाबरोबर ध्यास, प्रार्थना आणि दुर्दम्य आशावाद असायला हवा. यापुढे उच्च गुणवत्ता असणारे कामगार आणि व्यवस्थापक जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत टिकतील, 'असे मत ज्येष्ठ व्यवस्थापन तज्ज्ञ डॉ. प्र. चिं. शेजवलकर यांनी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास परिषदेच्या भारतरत्न जे. आर. डी. टाटा उद्योग पुरस्कार वितरण कार्यक्रमात व्यक्त केले. चिंचवड येथील ऑटोक्लस्टर सभागृहात हा कार्यक्रम झाला. टाटा मोटर्सचे माजी महाव्यवस्थापक मनोहर पारळकर, परिषदेचे अध्यक्ष कैलास आवटे, पुरुषोत्तम सदाफुले, जयवंत भोसले, राजेश नागेशकर या वेळी उपस्थित होते. डॉ. शेजवलकर यांच्या हस्ते प्रेमचंद मित्तल (उद्योगभूषण), थिसेन क्रुप इंडस्ट्रिज इंडिया (उद्योगरत्न), गणपतराव कोलते (उद्योगविभूषण), महानंद यादव (युवा उद्योगमित्र), कल्पना पठारे (उद्योगसखी) यांना पुरस्कार देण्यात आले. 'यशाची चव चाखून पहा व अपयश निरखून पहा,' असा सल्ला देऊन डॉ.शेजवलकर यांनी श्रमिक विद्यापीठ निर्माण करण्याची सूचना केली.

गीतकार गुलजार यांना फाळके पुरस्कार जाहीर

साठीच्या दशकातील 'मोरा गोरा अंग लै ले'पासून ते अलीकडच्या 'दिल तो बच्चा है जी' पर्यंत अशी एकाहून एक सरस असंख्य गाणी, 'आँधी'सारख्या चित्रपटाची निर्मिती, चिमुकल्यांसाठी 'पोटली बाबा की'

‘जंगलबुक’ या मालिका असे हिंदी चित्रपटसृष्टीलाच नव्हे तर छोट्या पडद्यालाही भरीव योगदान देणारे, गीतलेखनातील प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय ऑस्कर पुरस्कार मिळविणारे प्रख्यात गीतकार, चित्रपटनिर्माता व संवादलेखक गुलजार यांना २०१३चा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला. सुवर्णकमळ, दहा लाख रुपये रोख आणि शाल असे या पुरस्काराचे स्वरूप असून, राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होईल. भारतीय चित्रपटसृष्टीच्या विकासात महत्त्वाचे योगदान देणाऱ्या दिग्गज व्यक्तिमत्त्वाला केंद्र सरकारतर्फे दादासाहेब फाळके पुरस्कार देऊन गौरविले जाते.

संवेदनशील कवी, साहित्यिक, चित्रपटनिर्माता, पटकथा लेखक, नाटककार अशा वेगवेगळ्या बिरुदावली मिरविणाऱ्या गुलजार यांनी हिंदी, उर्दू, पंजाबी, ब्रज, खडी बोली अशा भाषांमध्ये साहित्यनिर्मिती केली असून, त्यांना २००२ मध्ये साहित्य अकादमी पुरस्काराने गौरविण्यात आले २००९ मध्ये स्लमडॉग मिलेनियर चित्रपटातील ‘जय हो’ या गीतासाठी ऑस्कर पुरस्कारही त्यांना मिळाला. याच गाण्यासाठी त्यांना ग्रॅमी पुरस्काराने देखील गौरविण्यात आले आहे. बिमल राय, हृषिकेश मुखर्जी, हेमंत कुमार यांसारख्या दिग्गजांसोबत सहाय्यक म्हणून गुलजार यांनी चित्रपटसृष्टीतील कारकीर्दीची सुरुवात केली.

बिमल रॉय यांच्या ‘बंदिनी’ चित्रपटासाठी त्यांनी पहिले गाणे लिहिले होते. कोशिश, अंगूर, नमकीन, माचिस, यांसारख्या चित्रपटांची निर्मितीदेखील गुलजार यांच्या नावावर आहे.

‘गुलजारनी आपल्या गीतांत नेहमीच शब्दाची ताकद जोखली... म्हणूनच त्यांच्या गाण्यातले शब्द वेगळंच वजन घेऊन येतात. त्यांच्या शायरीची धार गीतलेखनामध्येही जाणवते. हा सन्मान एका गुणवंत गीतकाराचा, कवीचा आणि दिग्दर्शकाचा आहे.’’ अशी प्रतिक्रिया प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांनी व्यक्त केली.

केवळ एका कलाकृतीला नव्हे; तर कलाक्षेत्रातील आजवरच्या कार्याला मिळालेला हा सन्मान म्हणजे आशीर्वादच आहे, या शब्दांत गुलजार यांनी आनंद व्यक्त केला. गुलजार म्हणाले, ‘काय सांगू... खरं तर आज माझ्याकडे शब्दच नाहीत. माझ्यावर भरभरून प्रेम करणाऱ्या, पाठिंबा देणाऱ्या प्रत्येकाचा मी ऋणी आहे. हा पुरस्कार म्हणजे मनापासून केलेल्या कामाला

दिलेली पावती तर आहेच याशिवाय काम योग्य मार्गानेच सुरू असल्याचे द्योतकही आहे.'

हृदयस्पर्शी आणि तरल शब्दकळेने सिनेसृष्टीला एकाहून एक अस्सल व सरस गीतांचा नजराणा गुलजार यांनी दिला. मेरे अपने, परिचय, कोशिश, अचानक, खुशबू, किताब, किनारा, आंधी, अंगूर, लिबास, लेकीन, मौसम, मीरा, इजाजत, माचिस, हुतुतू अशा कायम आठवणीत राहणारे एकाहून एक सरस चित्रपटांतून गुलजार यांनी भावस्पर्शी गाणी दिली. कथा आणि पटकथा आणि गीत आणि दिग्दर्शन, कविता या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांच्या शैलीचा एक आगळा ठसा आहे.

आजची पिढी योग्य पद्धतीने नियोजन करून उद्दिष्ट गाठते, म्हणूनच विशाल भारद्वाज, ए.आर. रेहमानबरोबर काम करण्याचा अनुभव खूप अनोखा असल्याचे गुलजार आवर्जून सांगतात.

सुमन कल्याणपूर यांना माणिक वर्मा स्मृती पुरस्कार

माणिक वर्मा प्रतिष्ठान व भारत गायन समाज यांच्यातर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'कै. श्रीमती पद्मश्री माणिक वर्मा स्मृती पुरस्कार' यंदा ज्येष्ठ गायिका सुमन कल्याणपूर यांना ज्येष्ठ बासरीवादक पं. हरिप्रसाद चौरसिया यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. २५ हजार रुपये रोख आणि मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. या वेळी सुमन कल्याणपूर यांची मंगला खाडिलकर यांनी प्रकट मुलाखत घेतली, त्यांच्या लोकप्रिय गाण्यांवर आधारित विशेष कार्यक्रम 'सुमन सुंगंध' हे कार्यक्रमही झाले.

राष्ट्रीय पुरस्कारांवर मराठी मोहोर

'यलो'ला स्पेशल ज्युरी पुरस्कार, गौरी गाडगीळचे विशेष कौतुक

भारतीय चित्रपटसृष्टीत मानाचे स्थान असलेल्या ६१व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची घोषणा झाली असून, गेल्या वर्षीप्रमाणेच या वर्षीही मराठीने आपला रुपेरी झेंडा डौलाने फडकावला आहे. 'फँड्री'मधून धगधगते समाजवास्तव पडद्यावर मांडणारा नागराज मंजुळे पदार्पणातील सर्वोत्तम दिग्दर्शक ठरला असून, याच चित्रपटातील सोमनाथ अवघडे सर्वोत्तम बालकलाकार ठरला आहे. 'तुह्या धर्म कोन्चा' सामाजिक आशयाच्या श्रेणीत सर्वोत्तम ठरला असून, याच चित्रपटातील 'खुरा खुरा' हे गीत गाणारी बेला

शेंडे सर्वोत्तम पार्श्वगायिका ठरली आहे. अमृता सुभाष सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेत्री, 'यलो'ला स्पेशल ज्युरी पुरस्कार, त्यातील भूमिकेसाठी गौरी गाडगीळचे विशेष कौतुक आणि सुमित्रा भावे यांच्या 'अस्तू'मधील संवादलेखनाचा गौरव असा मान मराठीला मिळाला आहे. 'आजचा दिवस माझा'ने सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा पुरस्कार पटकावला आहे.

अँड अवॉर्ड गोज टू ....

सर्वोत्कृष्ट चित्रपट : शीप ऑफ थीसियस

सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपट : जॉली एलएलबी

सर्वोत्तम दिग्दर्शक : हंसल मेहता (शाहिद)

सर्वोत्तम अभिनेता : राजकुमार राच (शाहिद)
और सूरज वेंजारामूडू (मल्याळम)

सर्वोत्तम अभिनेती : गीतांजली थापा (लायर्स डाईस)

सर्वोत्तम सहाय्य अभिनेता : सौरभ शुक्ला (जॉली एलएलबी)

सर्वोत्तम सहाय्य अभिनेत्री : अमृता सुभाष (अस्तु)
आणि अलिया एल काशिफ (शीप ऑफ थीसियस)

लोकप्रिय चित्रपट : भाग मिल्खा भाग

सर्वोत्तम गायक : रूपकुमार (जतिश्वर / बंगाली चित्रपट)

सर्वोत्तम गायिका : बेला शेंडे

नॅशनल ॲवॉर्ड जाहीर झाले, म्हणजे नेमके काय? अशीच फक्त आम्हा सगळ्यांची प्रतिक्रिया होती. सिनेमासाठी नॅशनल ॲवॉर्ड म्हणजे नेमके काय, ते आम्ही नेटवर आधी शोधले, कारण मला फक्त स्विमिंगमधील नॅशनल ॲवॉर्ड माहिती आहे. सिनेमाच्या सेटवर सगळेच माझ्याशी इतके घरगुती पद्धतीने वागत होते. त्यामुळेच हे शक्य झाले. अभिनयासाठीचे हे 'स्पेशल ज्युरी ॲवॉर्ड' असले, तरी स्विमिंगमध्येच करिअर करायचे आणि त्यात 'कोच' बनायचे, माझे स्वप्न आहे. अभिनेत्री गौरी गाडगीळ, यलो यांनी स्पष्ट केले.

'पुलित्झर'चे मानकरी

प्रसारमाध्यमांच्या क्षेत्रात अखेरचा शब्द समजल्या जाणाऱ्या सुप्रतिष्ठित अशा पुलित्झर पुरस्काराची घोषणा झाली असून, त्यात भारतीय वंशाचे विजय शेषाद्री यांचा झालेला सन्मान हा भारताची मान उंचावणाराच आहे.

पण शेषाद्री यांना हा सन्मान पत्रकारितेतील कामगिरीबद्दल मिळालेला नसून तो त्यांना त्यांच्या 'थ्री सेक्शन्स' या ताज्या काव्यसंग्रहाबद्दल मिळाला आहे. हा पुरस्कार मिळवणारे शेषाद्री हे पाचवे भारतीय! पण झुम्पा लाहिरी यांच्याबरोबर गोविंदबिहारी लाल, गीता आनंद, सिद्धार्थ मुखर्जी या साऱ्यांनाच हा पुरस्कार त्यांच्या सर्जनशील लेखनाबद्दल मिळाला आहे. त्यामुळे गेल्या शतकाभरातील भारतीय पत्रकारितेवरही प्रकाश पडला आहे.

पत्रकारितेतील मानाचा पुरस्कार हा ब्रिटनमधील 'द गार्डियन' या वृत्तपत्राची अमेरिकेतील आवृत्ती आणि 'वॉशिंग्टन पोस्ट' यांना संयुक्तपणे मिळाला आहे. एडवर्ड स्नोडेन या संगणकतज्ज्ञाने अमेरिकी गुप्तचर यंत्रणा नागरिकांवर कशी पाळत ठेवते, त्याबद्दल उघडकीस आणलेल्या माहितीच्या आधारे या वृत्तपत्रांनी एकूणच अमेरिकी प्रशासनाचा जो काही पर्दाफाश केला, याबद्दल त्यांचा गौरव झाला आहे. वर्तमानपत्रे ही जीवनाचा आरसा असतात, असे म्हणण्याची पद्धत आहे. पण त्याऐवजी अलीकडे प्रस्थापितांच्या दावणीला ती बांधली जाण्याचा प्रकार जगभरात रूढहोत असताना, बलाढ्य अशा अमेरिकी प्रशासनाचे ढोंग उघड करून दाखवण्याचा या दैनिकांचा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे.

विजय शेषाद्री हे पाच वर्षांचे असताना त्यांच्या माता-पित्याने अमेरिकेत जाण्याचा निर्णय घेतला आणि त्यांच्यावर पूर्णपणे तेथील अगदी वेगळ्याच संस्कृतीचे संस्कार झाले. पण तरीही आपल्या कवितांमधून मानवी मन आणि भावला याची व्यामिश्रता सखोलपणे दाखवण्याचे काम त्यांनी केले. शेषाद्री हे सध्या न्यूयॉर्कमधील एका महाविद्यालयात कविता आणि काव्यशास्त्र शिकवतात. गेली दोन दशके शेषाद्री यांचे नाव अमेरिकन कवी जगतात प्रमुख कवी म्हणून टिकून आहे. एवढी एक बाब त्यांचे या क्षेत्रातील आढळपद दाखवून देणारे आहे. अर्थात, प्रामुख्याने पत्रकारितेतील पुरस्कार देणाऱ्या या संस्थेला या जागतिक दर्जाच्या कवीला हा पुरस्कार देताना, शेषाद्री यांनी आपल्या लेखनाची कारकीर्द ही 'द न्यूयॉर्कर' या वृत्तपत्रातून 'कॉपी एडिटर' म्हणून सुरू केली होती, यांची आठवण असणारच् पण त्यानंतरच शेषाद्री हे नाव काव्य क्षेत्रात दुमदुमू लागले आणि अमेरिकेतील 'ट्वीन टॉवर्स' वर ९/११ रोजी झालेल्या भीषण हल्ल्यानंतर त्यांच्या 'डिऍपिरन्सेस' या न्यूयॉर्कर' मध्येच प्रसिद्ध झालेल्या कवितेने त्यांचे नाव जगभरात नेले. या कवितेनच मला जगभरातून अनेक चाहते मिळवून दिले.

असे त्यांनी स्वत:च सांगितले आहे. शेषाद्री यांना मिळालेल्या या पुरस्कारामुळे भारताचा गौरव झाला आहेच.

सतीश कामत यांना वरुणराज भिडे पुरस्कार

पत्रकार वरुणराज भिडे मित्रमंडळातर्फे ज्येष्ठ पत्रकार आणि 'लोकसत्ता'चे रत्नागिरी येथील विशेष प्रतिनिधी सतीश कामत यांना यंदाचा वरुणराज भिडे पुरस्कार देण्यात आला आहे. २१ हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

'केसरी'च्या पुणे येथील बातमीदार नम्रता फडणीस बीड येथील 'प्रजापत्र'चे संपादक सुनील क्षीरसागर आणि 'आयबीएन लोकमत'च्या नाशिक येथील प्रतिनिधी दीप्ती राऊत यांची आश्वासक पत्रकारितेबद्दल निवड झाली आहे. प्रत्येकी पाच हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

३७ वर्षे पत्रकारितेमध्ये असलेले सतीश कामत हे 'लोकसत्ता'चे रत्नागिरी येथील विशेष प्रतिनिधी आहेत. मराठवाडा नामांतर आंदोलन, दिल्लीतील राजकीय घडामोडी आणि केरळमधील मार्क्सवादी राष्ट्रीय स्वयंसेवक सघ संघर्षावरील त्यांच्या लेखनमाला गाजल्या. जून २००७ पासून संगमेश्वर तालुक्यातील राजवाडी येथे पीपल्स एम्पॉवारिंग मूव्हमेंट या संस्थेमार्फत काम विविध सामाजिक उपक्रम राबवत आहेत.

संवादिनीवादक सुधीर नायक यांना 'स्वर-लय-रत्न' पुरस्कार

गानवर्धन संस्थेतर्फे प्रसिद्ध संवादिनीवादक सुधीर नायक यांना ज्येष्ठ संवादिनीवादक 'अप्पासाहेब जळगावकर स्मृती स्वर-लय-रत्न' पुरस्कार ज्येष्ठ भरतनाट्यम नृत्यांगना डॉ. सुचेता भिडे-चाफेकर यांच्या हस्ते सुधीर नायक यांना प्रदान करण्यात आला.

सुधीर नायक यांनी मधुकर सामंत आणि पु. पुंडलिक प्रभू यांच्याकडून तबला आणि गायनाचे प्रारंभिक शिक्षण घेतले. ज्येष्ठ संवादिनीवादक पं. तुळशीदास बोरकर यांच्याकडून त्यांनी अखंडितपणे संवादिनीवादनाची तालीम प्राप्त केली आहे. पं. जितेंद्र अभिषेकी यांच्याकडून हिंदुस्थानी संगीतातील बारकावे आत्मसात करीत असतानाच सुधीर नायक यांना कंठसंगीताचे ज्ञानामृत मिळाले. स्वतंत्र संवादिनीवादनाबरोबरच अनेक

दिग्गज कलाकारांच्या मैफलींना त्यांनी संवादिनीची साथसंगत केली आहे.

१५वी आवृत्ती

वलय

लेखक
व.पु. काळे

किंमत : १२०/-रु.
पोस्टेज : ३०/-रु.

बुद्धिबळातला राजा खरा असतो का?
परीकथेतल्या पऱ्या खऱ्या असतात का?
नाटकातील पात्रं खरी असतात का?
प्रश्न साधे उत्तर सहज समजणारी.
आणि तरी ती समजून घ्यायला
नाना प्रकारच्या अनुभवातून जावे लागते.
वलयात गुरफटलेल्या कितीतरी माणसांची
ओळख व्हावी लागते. शहाणी आणि मूर्ख,
व्यवहारी आणि स्वप्नवेडी माणसं.
अशा माणसांच्या कथांचा हा संग्रह
वाचकांच्या मनाला स्पर्शून गेल्याशिवाय राहणार नाही.

वर्तमान इतिहासाच्या अदृश्य छटा



वर्तमानाचा गोळीबंद, निरसा क्षण इतिहासात शिरतो, तेव्हा तशाच असंख्य क्षणांच्या साथीने त्याला आभासी किंवा व्यक्तीनिष्ठ रूप लाभू शकते. त्यामुळे घडत्या क्षणी, वस्तुनिष्ठ असणाऱ्या इतिहासाला पुन्हा तसे रूप देण्यासाठी पुढे अचाट यातायात करावी लागते. ती यशस्वी होते असेही नाही. मग त्याची फळे वर्तमानासकट भविष्याला भोगावी लागतात. त्यामुळे वर्तमानाचा पसारा, तो जवळून पाहणाऱ्या पात्रांनी सविस्तर नोंदणे महत्त्वाचे असते. ही पात्रे जितकी मोक्याची, तितका इतिहासाचा कच्चा माल समृद्ध. या दृष्टीने संजय बारू यांच्या **'द ॲक्सिडेंटल प्राईम मिनिस्टर'** या ग्रंथाचे स्वागत करावयास हवे.

निवडणुकांच्या गदारोळात या आठवणी आल्याने त्यांना असंख्य हेतू आपोआप चिकटले. ते तूर्त दूर ठेवू. ज्येष्ठ आर्थिक संपादक बारू हे पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांचे पहिली चार वर्ष प्रमुख मीडिया सल्लागार होते. यावेळी डॉ. सिंगच नव्हे, तर 'दिल्ली दरबार' कसा दिसला, हे त्यांनी लिहिणे योग्य नव्हे तर आवश्यकही होते. युरोप आणि विशेषत: अमेरिकेत अशा पुस्तकांचा धबधबा कोसळत असतो, डॉ. सिंग यांनी 'अपघाती पंतप्रधान' असा उल्लेख स्वत:च केला होता, मात्र अपघाताने पंतप्रधान झालेला हा नोकर हा राजकारणी म्हणून कसा परिपक्व होत गेला किंवा या पदाचे गांभीर्य त्यांच्या रोमारोमात कसे भिनले, हे वाचणे म्हणजे सध्याच्या उथळ उखाळ्या-पाखाळ्यांवरचा उतारा ठरावा.

किस्से, प्रसंग, आठवणी, संघर्षाचे क्षण यांनी हे पुस्तक काठोकाठ भरले आहे. त्यामुळे जिवंत, प्रवाही बनले आहे. आता हेच पाहा... पंतप्रधान आल्यावर मंत्रिमंडळ बैठकीत साधे उठून उभे राहण्याचे सौजन्य अर्जुनसिंग दाखवत नसत, तर 'मनमोहन' अशी एकेरी हाक मारण्यात नटवरसिंग यांना फुशारकी वाटे. दोघांचेही कान मग '१० जनपथ'ला पिळावे लागले. दुहेरी सत्ताकेंद्राचा असा प्रदीर्घ प्रयोग भारतात कधी झाला नव्हता. तो १० वर्षे चालला याचे मुख्य श्रेय सोनिया व डॉ. सिंग यांचे. मात्र एकीकडे ज्येष्ठ नेत्यांचा असहकार, दुसरीकडे पक्षातील दुय्यम स्थान आणि तिसरीकडे गांधी कुटुंबाने आखलेली अदृश्य लक्ष्मणरेषा यातून डॉ. सिंग यांनी मार्गच काढला असे नाही, तर अनेक आघाड्यांवर अतुलनीय यश मिळविले, असे लेखक दाखवून देतो. परराष्ट्रमंत्री प्रणवदा दौऱ्याचे वृत्त द्यायला डॉ. सिंग यांना लगेच भेटत नसत, तर अँटनींना आर्थिक सुधारणांची गती झेपत नसे. ती त्यांना रोखायची असे. ते कुरकुरत.

अशा हवेत डॉ. सिंग यांनी पराक्रम केले. त्यातला पहिला 'दुसऱ्या हरितक्रांती'चा. नॉर्मन बोरलॉग, स्वामीनाथन यांच्याशी बोलून सिंग यांनी तिची आखणी केली. तिची फळे दिसत आहेत. दुसरे रोजगार हमी योजनेचा देशव्यापी विस्तार हे सिंग व रघुवंशप्रसाद सिंग यांचे यश. मात्र ते राहुल यांच्या पदरात टाकण्यावरून दरबारी राजकारण झाले. त्याची झळ पीएम व बारूंना कशी बसली, हे मुळातून वाचायला हवे. तिसरे डॉ. सिंग यांनी अमेरिकेशी जो अणुसहकार्य करार केला, तेव्हा डाव्यांना सरकार घालवायचे होते. मात्र या संकटातून सरकार तर वाचलेच, पण त्याने कम्युनिस्टांचे भूत

खांद्यावरून भिरकावून दिले. लेखकाच्या मते इथे डॉ. सिंग यांच्यातला राजकारणी दिसला. यशस्वी झाला. इतिहासही घडला.

हे सारे वाचताना मनात पंतप्रधान व सरकारची आजची 'लोकप्रिय प्रतिमा' येत राहते. पुस्तकाचे कथन व ही प्रतिमा यांच्यातील स्पष्ट विसंगतीचा अन्वय कसा लावायचा, याचे सूतोवाच बारू वारंवार करतात. किंबहुना तो त्यांच्या पुस्तकाचा एक हेतू आहे. म्हणूनच, मीडियात काहीही येत असले, किंवा सिंग यांची कन्या वारूंवर फणकारली असली, तरी या पुस्तकात पीएमविषयी एकही वावगा शब्द नाही. दुसरीकडे पीएम आजारी असताना सोनिया व राष्ट्रपतींच्या आधी बारूंना भेटतात. त्या दिवसातले पहिले चार शब्द बोलतात. 'इतिहास माझ्याकडे कदाचित अधिक औदार्याने पाहील.' असे डॉ. सिंग अलीकडेच म्हणाले. त्या इतिहासाला बारू यांनी मोलाची सामग्री दिली आहे. निकालांनंतर बळीचे बकरे शोधण्यासाठी राजधानीत मारेकरी फिरतील, तेव्हा या पुस्तकाचे संदर्भमूल्य अचानक वाढेल. त्याही दृष्टीने ते वेळेत आले आहे!

(सारंग दर्शने, महाराष्ट्र टाइम्स)

खळबळजनक पुस्तक 'द ॲक्सिडेंटल प्राईम मिनिस्टर' लवकरच मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे मराठीत...

पेंग्विन इंडियाकडून इंग्रजी भाषेत प्रकाशित झालेल्या या खळबळजनक पुस्तकाचा अनुवाद भारतातील सर्व भाषांमध्ये होत आहे.
या पुस्तकाचे मराठी भाषांतराचे हक्क मेहता पब्लिशिंग हाऊसला मिळाले आहेत.
संस्थेच्या वतीने जुलै २०१४ मध्ये हे पुस्तक प्रकाशित करून मराठी वाचकांसाठी उपलब्ध होईल.
अधिक माहितीसाठी **०२०–२४४७६९२४** या नंबरवर संपर्क साधावा.

११वी आवृत्ती

ताजमहालमध्ये सरपंच



लेखक
शंकर पाटील

किंमत : १००/-रु.
पोस्टेज : ३०/-रु.

शंकर पाटील यांनी कथा, कादंबरी,
ललित लेख वगनाट्य असे विविध
साहित्यप्रकार हाताळले असले तरी ग्रामीण
कथाकार म्हणूनच ते अधिक लोकप्रिय झाले.
ताजमहलमध्ये सरपंच हा कायम
टवटवीत राहतील अशा कथांचा संग्रह.
या कथा म्हणजे खुसखुसीत विनोदाआडून
घडवलेलं वास्तवदर्शनच!
या संग्रहातील कथांमधून ग्रामीण राजकारण,
जीवनशैली तसंच समाजातील काही
नमुनेदार नगांचं चित्रण आढळतं.
प्रत्येक कथा चटपटीत संवाद आणि
चुरचुरीत विनोदाने बहरलेली दिसते.
ती ठरवून लिहिलेली नाही तर उत्स्फूर्त वाटते.
सहजता आणि सोपेपणा या वैशिष्ट्यांमुळे
या कथा वाचकाच्या मनाला भिडतात.

पुस्तक परिचय

तरीही जिवंत मी

'Burned Alive' – पॅलेस्टिनी तरुणीची कहाणी

तरीही जिंवत मी...



लेखिका : सुआद

अनुवाद : गौरी केळकर

पृष्ठे २२० । किंमत ` २५० । पोस्टेज ` ३० । सभासदांना सवलतीत

प्रस्तावना

पॅलेस्टिनी भागातील एका छोट्याशा गावात जन्मलेल्या मुस्लीम कुटुंबातील सुआद या तरुण, सुंदर मुलीने सुमारे पस्तीस वर्षांपूर्वी भोगलेल्या मरणसदृश परिस्थितीचे वर्णन या पुस्तकात केले आहे.

मुलगी किंवा स्त्री यांना प्राण्यांपेक्षाही हीन वागणूक देणाऱ्या अत्यंत मागास विचारसरणीच्या समाजात सुआदला शेळ्या, मेंढ्या चरायला नेणे हाच काय तो बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग होता.

त्या पॅलेस्टिनी भागातील घरची सर्व कामे करणे आणि मुलांना जन्म देणे एवढेच स्त्रियांचे काम मानले जाई. शिक्षण, व्यवसाय व बाहेरची सर्व कामे पुरुषच करतात.

पुरुषांच्या मनाविरुद्ध वागणाऱ्या किंवा लग्नाआधी पुरुषाशी संबंध ठेवणाऱ्या स्त्रीला ठार मारून टाकले जाते. हे काम तिचे वडील, भाऊ, नवरा, मेव्हणा करतात.

सुआदच्या घरातही तिच्या चार सख्ख्या आणि दोन सावत्र बहिणी होत्या आणि तिला एक मोठा भाऊ होता. पुरुषांच्या गुलाम म्हणूनच वागणाऱ्या स्त्रिया तिला तिच्या आजूबाजूला आणि घरात दिसत होत्या. सुआदच्या मोठ्या बहिणीचे लग्न झाले होते. घरात भावाचे राज्य होते. वडील अत्यंत क्रूर होते. त्यांचे आणि सुआदच्या भावाचे सतत भांडण होत असे. सुआदची एक सदैव धास्तावलेली, मंद गतीने काम करणारी बहीण होती. तिने नेमके काय केले होते, ते सुआदला आठवत नाही पण घरातील सर्व जण बाहेर गेलेले असताना तिच्या भावाने त्या बहिणीच्या गळ्याभोवती टेलिफोनची वायर आवळून खून केल्याचे सुआदने पाहिले होते. एखाद्या मुलीचे पाऊल वाकडे पडले किंवा तिच्या हातून काही चुकले तर घरचे सर्वजण बाहेर जात आणि त्या मुलीला तिचा भाऊ, वडील किंवा नात्यातील पुरुष ठार मारून टाकत.

लग्नानंतर पहिल्या रात्री मुलीला होणारा रक्तस्राव हे मुलीच्या कौमार्याचे प्रतीक समजले जाते. या समाजात सर्वांना ते दिसावे म्हणून नवरा सकाळी रक्ताचे डाग असलेली चादर सर्वांना दिसेल अशा ठिकाणी लावून ठेवतो. तसे घडले नाही तर नववधूचा खून केला जातो.

सुआदला एक स्थळ सांगून आले. तो मुलगा समोरच राहात होता. श्रीमंत, देखणा होता. त्याच्याकडे कार होती. सुआदची मोठी बहीण

दिसायला फारशी आकर्षक नसल्यामुळे तिला मागण्या येत नव्हत्या. तिचे लग्न झाल्याशिवाय सुआदला लग्न करता येणार नव्हते. काही महिने गेल्यावर सुआदने त्या मुलाच्या लक्षात येईल असे समोर जाण्यास सुरुवात केली. त्याच्याशी तिची चांगलीच ओळख झाली आणि त्याने लग्नाची खात्री देऊन तिच्याशी शरीरसंबंध ठेवले.

त्यातूनच सुआद गर्भवती झाली. त्या मुलाने एक-दोनदा घरी येऊन लग्नाविषयी तिच्या वडलांना विचारले पण मोठीचे लग्न झाल्याशिवाय हिचे लग्न करता येत नसल्याचे त्याला सांगण्यात आले होते. ती गर्भवती असल्याचे कळल्यावर तो तिला सोडून तिथून निघून गेला. सुआदच्या घरी हे समजले. अपेक्षेप्रमाणे तिच्या मृत्यूचा फतवा तिच्या वडलांनी काढला आणि तिला ठार मारण्यास तिच्या मेव्हण्याला सांगण्यात आले.

ठरल्याप्रमाणे बाकी सर्वजण बाहेर गेले आणि घरात एकट्या असलेल्या सुआदच्या अंगावर पेट्रोल ओतून तिच्या मेव्हण्याने तिला पेटवून दिले. सैरावैरा पळणाऱ्या सुआदने घराच्या भिंतीवरून उडी मारली. त्यानंतर रस्त्यावर असलेल्या स्त्रियांनी तिला हॉस्पिटलमध्ये पोहोचवले. तिथेच तिने मुलाला जन्म दिला. त्या हॉस्पिटलमध्ये या 'पापी' समजल्या गेलेल्या एकोणीस वर्षांच्या मुलीला भयाण अवस्थेत राहावे लागले. तिच्याकडे कोणीही लक्ष देत नव्हते.

एके दिवशी तेरे देस होम्सच्या जॅकलिन या कार्यकर्तीला ही गोष्ट समजली. लंडनहून शिकून आलेल्या हॉस्पिटलमधील पुरुष डॉक्टरच्या साहाय्याने तिने सुआदच्या घरी तिला परदेशी नेण्यासाठी तिच्या वडलांची परवानगी मिळवली. तिने जिवंत राहू नये म्हणून हॉस्पिटलमध्ये तिच्या आईने तिला विष पाजण्याचा प्रयत्न केला. वडलांनी धमक्या दिल्या.

फक्त भावाला तिच्या परिस्थितीचे दु:ख होते पण तो काहीही करू शकत नव्हता. त्याने तिची चोरून भेट घेतली व केळी दिली. त्याचेही लग्न झाले होते. अखेरीस मृत्यू यावा म्हणून सुआदला आपण दुसरीकडे नेत असल्याचे सांगून तिला स्वित्झर्लंडला नेण्यात आले. तिच्या घरच्यांच्या दृष्टीने ती मरणच पावली होती. पण तिच्यावर उत्तम उपचार करून तिला बरे करण्यात आले. तिचा चेहरा सुधारला पण शरीरभर डाग कायमचेच राहिले. ते चट्टे आणि जळलेले व्रण यामुळे तिला बाहेर पडण्याची लाज वाटत होती. तेरे देस होम्सने तिला नोकरी मिळवून दिली. तिच्या मुलालाही अनाथाश्रमातून शोधून

तिच्याबरोबर आणण्यात आले होते.

पण तिच्या भविष्याचा विचार करून तिच्या मुलाला दत्तक कुटुंबात ठेवण्यात आले. सुआदला अँटोनिओ भेटला. सात वर्षे एकत्र राहिल्यावर दोघांनी लग्न केले. त्यांना दोन मुली झाल्या. सुआदच्या मुलाचे नाव मारुआन होते. तो सुमारे २८ वर्षांचा असताना सुआदची त्याने भेट घेऊन आपली संपूर्ण जन्मकथा ऐकली. अत्यंत समजूतदार असलेल्या मारुआनने आपल्या आईला दोष तर दिला नाहीच; उलट तितक्याच समजूतदार असलेल्या अँटोनिओंनी बोलावल्यावर तो आपल्या कुटुंबात जाऊन राहू लागला. तिन्ही भावंडांचे उत्तम जमू लागले.

सुआद 'ऑनर किलिंग'च्या प्रथेचे उदाहरण म्हणून जॅकलिनबरोबर सर्वत्र फिरते. लोकांना माहिती देते. हे अत्याचार बंद व्हावेत अशी तिची इच्छा आहे. तिच्या मुलाप्रमाणे, नवऱ्याप्रमाणे आणि मुलींप्रमाणेच आपल्याला जिवंतपणीच जाळणाऱ्यांना आपण अद्याप जिवंत असून सुखाने जगत असल्याचे दाखवण्याची तिचीही इच्छा आहे पण तसे झाले तर आपल्याला आणि आपल्या मुलांनाही धोका असल्याचे ती जाणून आहे. 'ऑनर किलिंग'ला आळा बसावा या एकाच हेतूने तिने ही कथा सांगितली आहे.

अनुवादिकेचे मनोगत

आजच्या काळातही ऑनर क्राइमसारखे क्रूर प्रकार घडतात, हे पाहून थक्क व्हायला होतं. पॅलेस्टाइनसारखा धार्मिक पगडा असलेला देश, अतिशय संकुचित विचारांचा समाज, महिलांवर लादलेली प्रचंड बंधनं यामुळे सुआदच्या कहाणीविषयी खूप उत्सुकता होती. तिनं काय काय मांडलं असेल याचं कुतूहल होतं.

सुआदच्या आयुष्यात घडलेल्या प्रत्येक प्रसंगातून, तिच्या प्रत्येक अनुभवातून सुआदचं आयुष्य उलगडत गेलं. अवखळ वयातली स्वप्नाळू सुआद... तारुण्याची चाहूल लागल्यावर रेशमी विचार करणारी सुआद... प्रियकरानं फसवल्यावर खाईत लोटली गेलेली सुआद... लग्नापूर्वी आणि शरीर संपूर्ण भाजलेल्या अवस्थेत आई झालेली सुआद... जॅकलिनच्या साथीनं स्वित्झर्लंडमध्ये येऊन तिथल्या

संस्कृतीत मिसळून जाण्यासाठी धडपडणारी सुआद... लग्न, संसारात रमल्यावर वेगवेगळ्या भावनिक-मानसिक आंदोलनांतून जाणारी सुआद... आपली कथा धैर्यानं जगासमोर मांडणारी सुआद... आणि या सगळ्या टप्प्यांवर तिच्या मनात उमटणाऱ्या भावना, विचारांची-भावनांची वादळं, नातेसंबंधांचा गुंता आणि त्यांचा उलगडा हा सगळा प्रवास म्हणजे माझ्यासाठी अपूर्व अनुभव होता. आयुष्य कुठून कुठे जाऊ शकतं, याची कल्पनाच करता येत नाही. सुआदच्या बाबतीत हे तंतोतंत खरं आहे. गावाच्या वेशीबाहेरही क्वचित गेलेल्या आणि कायम घरातल्या पुरुषी वर्चस्वाच्या तुरुंगात असलेल्या सुआदचं जीवन इतकं झंझावाती असेल आणि तिचं नवं आयुष्य थेट युरोपात सुरू होईल याची पुसटशी चाहूलही तिला वा तिच्या कुटुंबीयांना नसेल. त्यामुळेच ती आगीच्या ज्वाळांतून वाचल्यावर तिला युरोपात कसं नेलं गेलं असेल, त्यासाठी व्हिसा, पासपोर्ट अशा किचकट प्रक्रिया कशा झाल्या असतील, याविषयी माझी उत्सुकता शिगेला पोहचली होती.

सुआदनं दिलेल्या वेगवेगळ्या उदाहरणांतून आणि प्रसंगांतून त्या वेळचं सामाजिक चित्रंही डोळ्यासमोर उभं राहतं. पॅलेस्टिन-इस्राइल यांचे संबंध, महिलांच्या नशिबी येत असलेलं अत्यंत हीन आयुष्य, त्यांचे सण-समारंभ साजरे करण्याची पद्धत, अतिशय क्रूर प्रथा यातून तिथली संस्कृती, समाजजीवन जवळून अनुभवता आलं.

सुआद शिकलेली नव्हती. मोडकं-तोडकं लिहायला युरोपात शिकली असली तरी पुस्तक लिहिण्याइतकं शिक्षण आणि भाषेवर पकड तिच्याकडे नव्हती. पण, पुस्तक लिहिता आलं नाही तरी सांगता वा बोलता नक्की येईल, असा विचार करून हा पुस्तकप्रपंच केल्याचं तिनच एके ठिकाणी म्हटलंय. हा संपूर्ण अनुभव कुणालातरी सांगणं हे खरंच आव्हानात्मक वाटतं. बालपणापासून पुरुषांच्या स्वैराचाराचे भयानक प्रकार तिनं अनुभवलेले असल्याने सुखद अशा आठवणी जवळजवळ नव्हत्याच. कायम जीवघेण्या छळाचं सावट तिच्यावर असायचं आणि तेच मनावर खोलवर कोरलेलं होतं. या सगळ्या गोष्टी वयाच्या चाळिशीनंतर आठवायच्या, आठवणींचे तुकडे सलग लावण्याचा प्रयत्न करायचा, जखमांच्या खपल्या निघाल्याचा मानसिक ताण सहन करायचा हे विशेष वाटतं. प्रियकरासोबत शेतात अनुभवलेले संबंध आणि

त्यानंतर निर्माण झालेल्या सगळ्या प्रकारच्या भावना कुणाला तरी लिहायला सांगायच्या यासाठी सुआदला किती बळ एकवटावं लागलं असेल आणि त्याहीपेक्षा विशेष वाटतं ते याचं की, सुआदचं आयुष्य अतिशय सुसंगत आणि उत्तम स्वरूपात ते लिहिणाऱ्यानं मांडलंय. सुआदनं हे कुणाला लिहायला सांगितलं असेल, याचा उल्लेख पुस्तकात सापडला नाही, पण ते लिहिणाऱ्यानं तिच्याशी नेमका संवाद साधल्याचं आणि बालपणापासून आतापर्यंतचा सुआदचा प्रवास तिच्यासोबत केल्याचं सतत जाणवत राहिलं.

ऑनर क्राइमवरचं पुस्तक म्हणजे रडकं, तक्रारखोर आणि नैराश्याकडे नेणारं असणार, असा समज होऊ शकतो. पण पुस्तक एकदा चाळल्यावर ही भावना नाहीशी झाली होती आणि आता काय होईल, सुआदचं काय झालं असेल, हे कुतूहल शेवटपर्यंत कायम राहिलं.

इतके दिवस सुआद एका अर्थी माझ्यासोबत होती. ती एक धैर्य, इच्छाशक्ती आणि आयुष्याला सामोरं जाण्यासाठी एक बळ देऊन गेली, हे नक्की!

गौरी केळकर

स्वित्झर्लंडमध्ये आश्रय घेतल्यावर –

मला लिहिता यायला हवं होतं, असं राहून राहून वाटतं. मी वाचू शकते, पण फक्त छापील शब्द. मी वर्तमानपत्र बघून वाचायला शिकले. त्यामुळं मला फक्त छापलेले शब्द कळतात. हातानं लिहिलेली अक्षरं ओळखता येत नाहीत. बऱ्याचदा मला शब्द अडतात. मग मी माझ्या मुलींना विचारते.

सुरुवातीला एडमंड कैसर आणि जॅकलिन या दोघांनीही मला मदत करण्याचा प्रयत्न केला होता. बाकीच्यांसारखं मलाही लिहिता-वाचता यायला पाहिजे, असं मला फार वाटायचं. चोविसाव्या वर्षी मी जेव्हा काम करायला सुरुवात केली तेव्हा मला तीन महिन्यांचा एक कोर्स करण्याची संधी मिळाली. त्यामुळं मला खूप बरं वाटलं होतं. पण मी जितकं कमावत होते त्यापेक्षा कितीतरी जास्त खर्च तो कोर्स करण्यासाठी येत होता. त्यामुळं तो कोर्स पूर्ण

करणंही अवघड होतं. अँटोनिओनं मला आर्थिक मदत देऊ केली होती. पण मला स्वत:च्या पैशांतून शिकायचं होतं आणि मी तसंच केलं. त्रास झाला, पण मला त्या कोर्सचा खूप उपयोग झाला. बालवाडीतल्या मुलांना पेन्सील हातात धरायला शिकवतात तसं त्या कोर्समध्ये मला पेन्सील हातात धरण्यापासून शिकवण्यात आलं. माझं नाव लिहायला शिकवलं तिथं. मला अक्षरं कळत नव्हती. त्यामुळं आधी बाराखडी शिकावी लागली. त्याच वेळी ती भाषा शिकण्याचा माझा प्रयत्नही सुरू होता.

तीन महिन्यांच्या या कोर्सनंतर मला वर्तमानपत्रातले काही शब्द ओळखता येऊ लागले होते. मी वर्तमानपत्रातलं भविष्य वाचण्यापासून वाचनाला सुरुवात केली. माझी रास मिथुन असल्याचं मला कुणीतरी सांगितलं होतं. रोज प्रयत्न करून मी माझं भविष्य वाचायला शिकले होते. वाचल्यावर ते सगळं कळायचंच असंही नाही. मुळात मला सुरुवातीला छोटी वाक्यं, लहानशा ओळी वाचायला शिकायचं होतं. सगळा लेख वाचून काढण्यासाठी अजून वेळ लागणार होता. लहान वाक्यांचं आणखी एक उदाहरण म्हणजे वर्तमानपत्रातल्या दु:खद निधनाच्या बातम्या! अशा बातम्या माझ्याइतक्या बारकाईनं कुणीच वाचल्या नसतील कदाचित. 'क्ष कुटुंबाला कळवण्यास अतिशय दु:ख होते की य यांचे निधन झाले आहे. त्यांच्या आत्म्याला शांती मिळो!' मी विवाहविषयक आणि गाडीविक्रीबाबतच्या लहान लहान बातम्याही वाचत असे. पण नंतर मी हा नाद सोडून दिला. त्यातले संक्षिप्त शब्द वाचून त्यांचा अर्थ लावणं कठीण जात असे. स्थानिक वृत्तपत्र सुरू करावं असा विचार माझ्या डोक्यात येऊन गेला, पण तो मूर्खपणाचा होता, असं अँटोनिओ म्हणायचा. त्यामुळं रोज कामावर जाण्यापूर्वी मी शहरात जात असे. तिथं कॉफी घेत वृत्तपत्र वाचून माझा दिवस सुरू व्हायचा. माझा तो वेळ मस्त जायचा. माझ्यासाठी भाषा शिकण्याचा तो उत्तम पर्याय होता. माझ्या आजूबाजूला असलेले लोक जेव्हा कोणत्या तरी विषयावर बोलायचे तेव्हा मलाही त्यातलं कळतं, असं मी त्यांना दाखवू शकत असे. त्याबद्दल मी वर्तमानपत्रात वाचलेलं असायचं. संभाषणामध्ये भाग घेण्याइतका आत्मविश्वास वाढलेला होता.

आता मला युरोपच्या भूगोलाविषयी थोडंफार समजायला लागलं होतं. युरोपीय देशांच्या राजधान्या आणि काही महत्त्वाची शहरं माहीत झाली होती. इटलीमध्ये मी रोम, व्हेनिस आणि पोर्टोफिने हे भाग पाहिले होते. मी ज्या

कुटुंबात राहत होते त्यांच्याबरोबर उन्हाळ्याच्या सुटीत स्पेनमध्ये बार्सिलोनात फिरले होते. पण आम्ही तिथं फक्त पाचच दिवस राहिलो होतो. तिथला भयंकर उकाडा मला अजूनही आठवतो. उकडत होतं त्यामुळं पाण्यातून बाहेर यावंसं वाटत नव्हतं. मला सोडून बाहेर जाऊ नये म्हणून मी पप्पा आणि मम्मालाही आग्रह करत होते. त्यांना नाइलाजानं माझ्याबरोबर थांबावं लागलं. आजूबाजूला लोक असताना मी अंघोळीच्या कपड्यांत फिरतेय याची कल्पना करायलाही मी धजावले नसते. असे कपडे घालायचे तर बाजूलाच, बीचवर चारचौघं असायला नकोत असं वाटत होतं. जशी बाथरूममध्ये अंघोळ करताना मी एकटीच असते तसं असतं तर मला बीचवर त्या कपड्यात वावरायला हरकत नव्हती.

अथांग जगातला लहानसाच भाग मी पाहिलेला होता. हे जग गोल आहे, असं मी ऐकल होतं. पण ते समजून घेण्यासाठी कधीही कोणी मला मदत केली नव्हती. उदाहरणार्थ, युनायटेड स्टेट्स म्हणजे अमेरिका ते मला ठाऊक होतं. पण पृथ्वीच्या या गोलावर अमेरिका नेमकी कुठं आहे, ते मला समजायचं नाही. माझी पूर्वीची मायभूमी असलेली पॅलेस्टिनी भूमी नकाशावर कशी शोधायची तेही मला माहीत नव्हतं. माझ्या मुलींकडचं भूगोलाचं पुस्तक हातात घेतलं की देशांचा ठावठिकाणा शोधायला कुठून सुरुवात करायची तेच कळायचं नाही. यातली आणखी अडचण अशी होती की मला दोन ठिकाणातलं अंतर लक्षात यायचं नाही. उदाहरण द्यायचं झालं तर असं समजू की, कुणीतरी मला माझ्या घरापासून पाचशे मीटर अंतरावर भेटायला यायला सांगितलं तर नेमक्या अंतराचा अंदाज मला यायचा नाही. प्रत्यक्ष रस्त्यावर गेल्यावर एखादं दुकान शोधून किंवा माझ्या माहितीचं एखादं ठिकाण पाहून मी विशिष्ट ठिकाणं शोधून काढत असे. त्यामुळं जगाचा वेध कसा घ्यायचा याचं गमक मला उमगलंच नाही. मी टीव्हीवर जागतिक हवामानाचा अंदाज बघत असे. ते बघता बघता माद्रीद, पॅरिस, लंडन, तेल-अव्हिव्ह अशी ठिकाणं कुठं आहेत ते शोधण्याचा प्रयत्न करत असे. मी साधारण दहा वर्षांची असताना माझ्या वडलांबरोबर तेल अव्हिव्हजवळ काहीतरी कामासाठी गेल्याचं आठवतं. आमच्या शेतात गहू पिकवण्यासाठी मदत केलेल्या आमच्या शेजाऱ्यांना कोबीची काढणी करण्यासाठी आम्ही मदत करायला गेलो होतो. प्रत्यक्षात पाहता आम्ही ज्यूंच्या भूमीत होतो म्हणून त्यांच्यापासून रक्षण करण्यासाठी कुंपण घातलेलं होतं. ज्यूंमध्ये जायचं

असेल तर एक कुंपण लांघण्याचा अवकाश होता. या विचारानंही मला भीती वाटायची.

बालपणातल्या माझ्या सगळ्या आठवणी भीतीशी निगडित होत्या, हे मला मोठं झाल्यावर जाणवलं. याची असंख्य उदाहरणं होती. ज्यू डुकरं असतात म्हणून त्यांच्या आसपासही जायचं नाही, असं मला लहानपणी शिकवण्यात आलं होतं. आम्हाला त्यांच्याकडं बघायलाही बंदी होती. त्यामुळं त्यांच्या जवळपास जाणंही आमच्यासाठी निषिद्ध होतं. ज्यूंची राहण्याची, जेवणाखाण्याची पद्धत आमच्यापेक्षा वेगळी होती त्यामुळं ते आमच्याइतके चांगले नाहीत, असं आमच्यावर बिंबवलेलं होतं. आम्ही आणि ते म्हणजे दिवस आणि रात्र, लोकर आणि रेशीम असं काहीसं होतं. ज्यू म्हणजे लोकरीसारखे आणि आम्ही मुस्लीम म्हणजे रेशीम, असंच सांगितलं जायचं आम्हाला. माझ्या डोक्यात असे विचार का भरवले जायचे ते मला माहीत नाही, पण त्या वेळी विचार करण्याची पद्धत अशीच होती. रस्त्यावर ज्यू कुठं दिसायचेच नाहीत म्हणा! पण चुकून एखादा दिसला तर त्याच्यावर दगड भिरकावले जायचे, लाकडं फेकली जायची. मारामारी सुरू व्हायची. ज्यूंशी बोलायला गेलो किंवा त्यांच्या आसपास गेलो तरी आपणही ज्यू होऊन जाऊ, या भीतीनं त्यांच्याशी बोलाचालीस बंदी घातलेली होती. पण ज्यू लोकांनी मला कधीही कोणताही त्रास दिलेला नव्हता. त्यांच्याविषयी आम्हाला जे सांगितलं गेलं होतं ते निरर्थक होतं याची मला पूर्णपणे जाणीव झाली होती. आमच्या सध्याच्या घराजवळ खाटकाचं एक दुकान आहे. हे दुकान ज्यू माणसाचं आहे. तिथं मस्त मांस मिळतं. तितकं चांगलं मी बाकी कुठंही खाल्लं नाही. पण लहानपणापासून मनात भरवल्या गेलेल्या भीतीमुळं त्या दुकानात एकटीनं जायचं धाडस मला कधीही झालं नाही. त्याऐवजी मी ट्युनिशिअन खाटकाच्या दुकानात जात असे. कारण एकच, तो ज्यू नाही तर ट्युनिशिअन होता. असं मी का करत असे ते मला माहीत नाही. मी कितीतरी वेळा स्वत:ला सांगत असे 'सुआद, तू त्या ज्यू माणसाच्या दुकानात जाणार आहेस आणि त्याच्याकडून मटण घेणार आहेस. बाकीच्या ठिकाणी असतं तसंच मटण आहे ते.' कधीतरी मला ही भीती घालवून तिथं जायला जमेल, पण अजूनही भीती पूर्णपणे गेलेली नाही. लहानपणी आमच्या मनात ज्यूंविषयी इतका द्वेष भरलेला होता आणि त्यांच्यावरून इतके निर्बंध लादलेले होते की जणू काय ते या पृथ्वीवर अस्तित्वातच नाहीत. इतकं त्यांना

हीन लेखलं जायचं. ते मुस्लिमांचे सगळ्यात कट्टर शत्रू आहेत, असा विचार करणं म्हणजे द्वेषाच्याही पलीकडचं होतं.

माझा जन्म मुस्लीम धर्मात झाला. मी अजूनही मुस्लीमच आहे. माझा अल्लावर विश्वास होता. गावातल्या काही प्रथा मी जपल्या होत्या. मला युद्ध आवडायचं नाही, हिंसाचारालाही माझा विरोध होता. माझ्या देशातल्या लोकांविषयी वाईटसाईट बोलून मुस्लीम धर्मावर टीका करत असल्याचा आरोप करून मला कुणी बोल लावला तर त्या व्यक्तीला मी शांतपणे त्यावर चर्चा करू या, असं म्हणत असे आणि असं घडलेलं आहे. आतापर्यंत हा विषय त्यांच्या लक्षात का नाही आला, हे समजून घेण्यासाठी मी त्यांना मदत करत असे. माझी आई कितीतरी वेळा संतापून शेजाऱ्यांशी भांडायची. ती त्यांच्यावर दगड फेकायची किंवा त्यांचे केस ओढायची. आमच्या देशात बायकांचे केस ओढायची फार सवय होती. हा प्रकार बघायला भयंकर वाटायचा. ते दिसू नये म्हणून मी गोठ्यात मेंढ्यांमध्ये किंवा ब्रेड ओव्हनच्या ठिकाणी जाऊन लपत असे.

मला माहीत नसलेल्या सगळ्या गोष्टी मला शिकून घ्यायच्या होत्या. जगातल्या भिन्न भिन्न गोष्टी जाणून घ्यायच्या होत्या. त्यातले फरक समजून घ्यायचे होते. इथं असलेल्या संधींमुळं आमच्या मुलींना उपयोग होईल आणि त्यांच्या आयुष्याचं सोनं होईल, अशी आशा मला होती. माझ्या देशात चालणाऱ्या अमानुष हिंसाचारापासून नशिबानंच माझ्या पोरींचं रक्षण केलं होतं. दगडफेकीपासून, पुरुषांच्या अमानवी वागण्यापासून त्या बचावल्या होत्या. माझ्या लहानपणी माझ्या डोक्यात ज्या चुकीच्या कल्पना भरवल्या गेल्या होत्या त्या त्यांच्याही मनात घोळवल्या जाऊ नयेत, असं मला वाटत होतं. या कल्पनांपासून सुटका करून चारचौघांसारखा योग्य विचार करण्याची सवय लावण्यासाठी मला प्रचंड कष्ट घ्यावे लागले होते. त्यांच्याही नशिबात मला हेच यायला नको होतं. माझे डोळे निळे आहेत असा माझा समज करून दिला गेला आणि मी आयुष्यात कधीही आरशात पाहिलं नाही तर माझे डोळे निळे आहेत, याच भ्रमात मी आयुष्यभर राहीन. आरसा म्हणजे संस्कृती, शिक्षण आणि स्वत:विषयी, इतरांविषयी माहितीचं प्रतीक आहे. मी आरशात पाहिलं तर मी स्वत:ला म्हणू शकेन की किती लहान दिसते मी! पण जर मी आरशात पाहिलंच नाही तर एखाद्या उंच व्यक्तीच्या बाजूला उभी राहीपर्यंत मी किती लहान दिसते त्याचा मला अंदाजच येणार

नाही.

ज्यूंविषयी, त्यांच्या इतिहासाविषयी मला काहीच माहीत नाही, असं माझ्या लक्षात येऊ लागलं. ज्यूंविषयी मी माझं ज्ञान वाढवलं नाही तर मी माझ्या मुलींनाही ज्यूंविषयी चुकीची माहिती देईन अशी भीती मला वाटू लागली. ज्ञान आणि विचार करण्याची क्षमता विकसित करण्याऐवजी मी माझ्या मुलींमध्ये दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती रुजवली असती, अशीही भीती होतीच.

एके दिवशी अँटोनिओ लॅटिशियाला म्हणाला, ''तिनं अरब पुरुषाशी लग्न केलेलं चालणार नाही.''

''का बाबा? अरब माणसं तुमच्यासारखी, बाकी माणसांसारखीच असतात.''

मी अँटोनिओला म्हणाले, ''तो पुरुष अरब असेल किंवा ज्यू, स्पॅनिश असेल किंवा इटालियन, सगळ्यात महत्त्वाचं आहे ते म्हणजे आपल्या मुलींनी असा पुरुष निवडावा ज्याच्यावर त्यांचं प्रेम आहे, ज्याच्यासोबत त्या खूश राहतील.''

माझं अँटोनिओवर जिवापाड प्रेम आहे. त्याला मी का आवडते ते मात्र मला माहीत नाही आणि ते विचारण्याचं माझं कधी धाडसही झालं नाही. मी त्याला हेही कधी विचारू शकले नाही. ''अँटोनिओ, मी कशी दिसते ते बघ. मी कुठची आहे ते बघ. तू काय बघितलंस माझ्यात? माझ्या अंगावर इतक्या जखमा असताना आणि बाकीच्या इतक्या मुली असताना तू मला कसं निवडलंस?''

याच वेळी मनात एक विचित्र विचारही यायचा. त्याच्याशी फोनवर बोलताना मी त्याला एक प्रश्न नेहमी विचारत असे 'कुठं आहेस तू?' तो घरी असल्याचं त्यानं सांगितलं की मला हायसं वाटायचं. तो मला सोडून देईल, माझ्याविषयी आता त्याला प्रेम वाटत नाही, ही भीती कायम मनाच्या एका कोपऱ्यात कुठंतरी असायची. अस्वस्थ होऊन मी त्याची वाट बघतेय, अशीच मी मारूआनच्या वडलांसाठी झुरले होते, असा भास व्हायचा. अँटोनिओ दुसऱ्या कुठल्या तरी बाईसोबत आहे, असं स्वप्न कितीतरी वेळा माझी झोप उडवायचं. मला त्रास देणाऱ्या दु:स्वप्नांपैकी हे आणखी एक. नादियाचा जन्म झाल्यानंतर दोनच दिवसांत मला हे स्वप्न सतावायला लागलं. अँटोनिओ परस्त्रीसोबत असल्याचं जाणवायचं. तो दोघे गळ्यात गळे

घालून चालत असल्यासारखं वाटायचं. तिथं जाऊन अँटोनिओला बोलावून आणण्याचं त्राण माझ्यात नसायचं. मग मी लॅटिशियाला सांगायची की बाबांना बोलावून आण म्हणून. माझी मुलगी बाबांना कपड्यांना धरून खेचायची आणि त्या बाईबरोबर जाऊ नका, घरी परत चला अशी विनवणी करायची. तिनं बाबांना घरी आणायलाच हवं असं मला वाटायचं. त्यासाठी ती खूप प्रयत्न करत असलेली दिसायची. या स्वप्नाला काही शेवटच नव्हता. त्यामुळं अँटोनिओ घरी यायचा की नाही, ते मला कधीच दिसलं नाही. एकदा हे स्वप्न पडल्यावर मी अपरात्री साडेतीन वाजता दचकून उठले होते. तेव्हा अँटोनिओ अंथरुणात नव्हता. मी त्याला शोधायला उठले. तो आरामखुर्चीत बसलेलाही दिसला नाही की टीव्हीही सुरू दिसला नाही. त्याची गाडी जाग्यावर आहे का ते बघायला मी खिडकीजवळ गेले. नंतर माझ्या लक्षात आलं की तो त्याच्या अभ्यासाच्या खोलीत बसला होता. बिझनेस अकाउंटचं काम करत होता. तेव्हा माझा जीव भांड्यात पडला.

असलं एकही स्वप्न पडू नये आणि जरा शांतपणा मिळावा, अशी माझी इच्छा होती. पण आयुष्याविषयी अनिश्चितता, अस्वस्थता, असूया, संताप या भावना सतत ठाण मांडून बसलेल्या असायच्या. माझ्या आतमध्ये काहीतरी तुटलेलं होतं. पण लोकांना ते बाहेरून जाणवायचं नाही. सगळ्यांशी मी हसून, नम्रपणे बोलत असे. आदरानं वागत असे. त्यामुळं माझ्यात धुमसत असलेल्या वादळाची कुणालाही कल्पना यायची नाही. पण सुंदर केस, छान पाय आणि मस्त त्वचा असलेली अप्रतिम महिला जवळून गेली किंवा उन्हाळा आला, पाण्यात डुंबायचे, हलके, साधेसे कपडे घालण्याचे दिवस आले की काहूर माजायचं....

माझं अंग कपड्यांनी झाकलेलं असायचं. बटणं अगदी गळ्यापर्यंत लावलेली असायची. मला आनंद मिळावा म्हणून मी बाकी काही कपडे आणले होते. मोठ्या गळ्याचे ड्रेस, बिनबाह्यांचे ब्लाऊज. पण ते मला जाकिटाच्या आतच घालता यायचे. जाकिटाची बटणंही गळ्यापर्यंत बंदच असायची. दर उन्हाळ्यातही असंच असायचं. पोहण्यासाठी तलाव ६ मे रोजी उघडतो आणि ६ सप्टेंबर रोजी बंद होतो असं मी ऐकलं होतं. ते ऐकून माझा फार संताप झाला होता. उन्हाळा लवकर संपून जावा आणि मस्त थंडी पडावी किंवा पाऊस सुरू व्हावा, असं मला वाटायचं. हवा गरम असेल तर मी सकाळी लवकर किंवा संध्याकाळी उशिरा बाहेर पडत असे. हवामानाच्या

बातम्यांकडं लक्ष ठेवत असे.

तापमान ३० अंशांपर्यंत वाढलं तर मी स्वत:ला खोलीतच बंद करून घेत असे. दार लावून घेत असे आणि रडत असे. मी रोज एकावर एक दोन कपडे घालत असे. एक कपडा माझ्या अंगावरच्या खुणा झाकण्यासाठी आणि एक सर्वसाधारणपणे दिसण्यासाठी. माझ्या आजूबाजूनं जाणाऱ्या लोकांनी माझ्याकडं बघून आश्चर्य व्यक्त करू नये किंवा माझं खरं रूप त्यांना दिसू नये किंवा मी इतक्या उकाड्यात हिवाळ्याचे कपडे का घातलेत, असा विचार त्यांच्या मनात येऊ नये, असं मला वाटायचं. मला शरद, हेमंत आणि वसंत हे ऋतू आवडायचे. सुदैवानं मी वर्षातून तीन ते चार महिनेच भरपूर सूर्यप्रकाश असलेल्या देशात राहत होते. माझा जन्म साधारण उन्हाळ्याच्या दिवसांत झाला, पण असं वातावरण मला जराही सहन होत नाही.

स्विमिंग पुलाकडं पाहिल्यावर काही वेळा माझा संताप व्हायचा. मजा करण्यासाठी, पाण्याचा आनंद घेण्यासाठी खरं तर तो स्विमिंग पूल बांधला होता. माझ्यासाठी मात्र त्याचा काही उपयोग नव्हता. या पुलामुळं माझ्यात स्वत:बद्दलच्या नैराश्याच्या भावनेला खतपाणी घातलं जात होतं. माझी चाळिशी उलटली होती. उन्हाळ्याला नुकतीच सुरुवात झाली होती. जून सुरू झाला होता. यावेळी जूनचे सुरुवातीचे दिवस अचानक ऊबदार वाटत होते. मी खरेदी करून परतले होते. घरी आल्यावर आमच्या खिडकीतून काही बायका दिसत होत्या पोहण्यासाठीचा पेहराव घातलेल्या. जेमतेमच होते ते कपडे म्हणा. एकंदरीत त्या कपड्यांकडं बघता त्या नग्न असल्यासारख्याच भासत होत्या. माझ्या शेजारी एक सुंदर मुलगी राहायची. ती पुलाकडून येत होती बिकिनी घालून. सोबत तिचा उघडाबंब मित्र होता. मी घरात एकटीच होते. त्या दोघांसारखं मला वागता येत नव्हतं म्हणून मला असूया वाटत होती. काहीच्या काही उकडत होतं त्यामुळं तर माझी आणखी चीडचीड होत होती. न राहवून मी कपाटाजवळ गेले आणि त्यातले कितीतरी कपडे गादीवर नुसते पसरवून ठेवले. मलाही काही बरं घालायला मिळेल आणि थोडीतरी तगमग कमी होईल, असं वाटत होतं. पण तसा एकही कपडा सापडेना. लहान बाह्यांचा टॉप घातला, त्यावर एक शर्ट घातला. शर्ट थोडासा पातळ होता. बंद गळ्याचा. पण तोही पसंत पडेना. माझ्या पायावरची त्वचा काढून इतरत्र लावली होती म्हणून मला मिनी स्कर्टही घालता येईना. अंगावरच्या जखमांमुळं उघड्या गळ्याचे, लहान हातांचे कपडे शोभले नसते. कपाटातून

काढून गादीवर टाकलेल्यापैकी कोणतेही कपडे घालण्यासारखे वाटत नव्हते.

मी हताश होऊन गादीवर बसले. डोळे वाहायला लागले. इतक्या जीवघेण्या उकाड्यात अंगभर कपडे मला अजिबात सहन होत नव्हते. क्षणभरही मी ते वागवू शकणार नाही, असं वाटत होतं. बाकीची माणसं उकाड्याचा त्रास होऊ नये म्हणून वाटेल तसे, लहान-तोकडे कपडे घालून हिंडताना बघून माझ्या जखमेवर मीठ चोळलं जात होतं. मी घरी एकटीच असल्यामुळं वाटेल तितकं रडून घेऊन माझं दु:ख हलकं करू शकत होते. मुली शाळेत गेल्या होत्या. त्यांची शाळा घरापासून जवळच होती. मी खोलीतल्या आरशासमोर जाऊन उभी राहिले आणि स्वत:लाच सांगू लागले, 'स्वत:कडं बघ जरा! तू कशाला जिवंत आहेस? तुझ्या जगण्याला काय अर्थ आहे? तुला तुझ्या कुटुंबीयांसोबत समुद्रकिनाऱ्यावर धमालपण करता येत नाही. जरी तुम्ही किनारी फिरायला गेलात तरी तू मुलींना पाण्यात जाऊ देणार नाहीस. तुझ्यासाठी त्यांना लवकर घरी यावं लागेल. मुली शाळेत आहेत. पण घरी आल्यावर त्यांना स्विमिंग पुलाकडं जावंसं वाटेल. त्या आनंदानं उड्या मारत जातील तिकडं, पण तू नाही. तुला तर स्विमिंग पुलाजवळच्या रेस्टॉरंटमध्ये जाऊन कॉफी किंवा सरबत पीत बसताही नाही येणार. याचं एकमेव कारण म्हणजे, कोणी आपल्याकडं बघत नाही ना, याची तुला वाटणारी भीती. हिवाळा आहे की काय, असं वाटावं अशा प्रकारे तू स्वत:ला डोक्यापासून पायापर्यंत कपड्यांनी झाकून घेतेस. तुला वेड लागलंय असं लोकांना वाटेल! तुझा काहीही उपयोग नाही! कुचकामी आहेस तू! तू जिवंत आहेस, पण जगण्यास लायक नाहीस. जगताच येत नाही तुला. घरात बंद करून ठेवलेली एक वस्तू आहेस तू!'

मनात असे असंख्य विचार धिंगाणा घालत होते. मी झोपेच्या गोळ्यांची बाटली घेऊन बाथरूममध्ये गेले. धड झोप लागत नाही म्हणून मी डॉक्टरांचा सल्ला न घेताच या गोळ्या विकत आणल्या होत्या. मी त्या सगळ्या गोळ्या खाल्ल्या. थोड्याच वेळात मला कसंतरी होऊ लागलं. सगळं आपल्याभोवती गोल फिरतंय असं वाटू लागलं. अस्वस्थ होऊन मी खिडक्या उघडल्या. लॅटिशिया आणि नादियाची शाळा आमच्या घराच्या समोरच होती. शाळेकडं पाहून मी रडायलाच सुरुवात केली. मी घराचं दार उघडलं आणि बाहेर पडले. विहिरीच्या तळाशी गेल्यावर कसा आवाज येईल, तसा माझाच मला आवाज ऐकू येऊ लागला. सहाव्या मजल्यावर जायचं आणि गच्चीतून खाली उडी

मारायची, असा माझा विचार होता. झोपेत चालल्यासारखी मी चालत-फिरत होते.

'मी मेले तर त्यांचं काय होईल? त्यांचं माझ्यावर खरंच प्रेम आहे. मीच त्यांना या जगात आणलं. कशासाठी? त्रास सहन करण्यासाठी? मी जो त्रास सोसला तो पुरेसा नाही का? त्यांच्याही नशिबी तेच भोग यावेत, असं मला वाटत नाही. आम्ही तिघंही एकदम या जगाचा निरोप घेऊ, नाहीतर कुणीही नाही. नाही, मी असं करून चालणार नव्हतं. स्वत:ला संपवून चालणार नव्हतं. माझी गरज होती त्यांना. अँटोनिया कामाला जातो. तो कामात आहे, कामावर आहे असं म्हणतो, पण न जाणो तो समुद्रकिनारी असेल. तो खरंच कुठं आहे ते कसं कळणार? मी कुठंय ते मात्र त्याला व्यवस्थित माहीत असतं. प्रचंड उकाडा आहे आणि त्यात मी बाहेर पडू शकत नाही, याची त्याला कल्पना असल्यानं मी घरातच आहे, याची त्याला खात्री असते. मला पाहिजेत तसे कपडे मला घालता येत नाहीत. का नाही मला तसं करता येत? मी देवाचं काय वाईट केलं होतं म्हणून त्यानं माझ्यावर ही वेळ आणली? मी काय पाप केलं म्हणून मला हे भोगावं लागतंय?'

मी रडत होते, हताश झाले होते. दिशाहीन झाले होते. पण तरीही घरात गेले. खिडकी बंद करून टाकली. नंतर घराच्या बाहेरच्या खोलीत आले. मुलींची वाट बघत बसले. त्यानंतर मात्र रुग्णालयात पोहोचेपर्यंतचं मला काहीही आठवत नाही. झोपेच्या गोळ्या घेतल्यामुळं मला रुग्णालयात न्यावं लागलं. डॉक्टरांनी माझं पोट रिकामं केलं. मला निरीक्षणाखाली ठेवलं होतं. दुसऱ्या दिवशी आपण मानसशास्त्रज्ञाशी संबंधित रुग्णालयात असल्याचं मला जाणवलं. तिथं एक चांगली महिला मानसशास्त्रज्ञ होती. ती खोलीत आली तेव्हा मला नम्रपणे तिच्याशी हसायचं होतं, पण मला अचानक रडूच कोसळलं. शांत करण्यासाठी तिनं मला ट्रॅन्क्विलायझर दिलं. मग ती माझ्याजवळ बसली आणि नेमकं काय झालं, कसं झालं ते विचारू लागली. मी गोळ्या का घेतल्या, मला स्वत:ला संपवून टाकण्याची इच्छा का झाली, ते ती विचारत होती. मी तिला सूर्य, आग, जखमा, मृत्यूची इच्छा असं काय काय सांगितलं. पुन्हा माझे डोळे गळू लागले. माझ्या डोक्यात काय गुंता झाला होता ते मला तिला नेमक्या शब्दांत सांगता येत नव्हतं. त्या एवढ्याशा स्विमिंग पुलावरून माझ्या डोक्यात वादळाची ठिणगी पडली आणि मग रान पेटत गेलं. स्विमिंग पुलामुळं माझ्या डोक्यात जीव द्यायचा विचार आला

होता का?

''तुला माहितेय का दुसऱ्यांदा तू मृत्यूच्या जवळ जाऊन आली आहेस ते? पहिल्यांदा, तुझ्या मेव्हण्यानं तुला मारण्याचा प्रयत्न केला तेव्हा आणि आता तू स्वत:लाच मरणाच्या दारात नेलंस तेव्हा. तू पुन्हा असा प्रयत्न करणार नाहीस, याचीही खात्री नाही. पण काळजी करू नको. मी आहे तुझ्यासोबत. तुला मदत करायला. तुला मदत हवीय का माझी?''

माझं उत्तर अर्थातच 'हो' असं होतं. महिनाभर ती मला थेरपी देत होती. नंतर तिनं मला आठवड्यातून एकदा, दर बुधवारी दुसऱ्या एका मानसशास्त्रज्ञाकडं जायला सांगितलं. मला आगीच्या धगीत लोटल्यापासून पहिल्यांदाच कुणीतरी माझ्याशी माझ्याविषयी बोलत होतं. माझ्या आई-वडलांविषयी, माझ्या दु:खाविषयी, मारूआनविषयी... माझ्या आयुष्यातल्या सगळ्या गोष्टींविषयी काळजीपूर्वक ऐकत होतं. हे सोपं नव्हतं. हे सगळं थांबवावं अशी मध्येच तीव्र इच्छा व्हायची. पण मला सक्तीनं सगळं बोलायला लावलं जायचं. याचं कारणही मला नंतर कळलं. ते सगळं बोलून मला मोकळं, शांत वाटायचं.

ती मानसशास्त्रज्ञ मला दिशादर्शन करतेय असं मला काही दिवसांनी वाटलं. घरी जाण्यासाठी डावीकडं वळायला हवं हे मला माहीत असूनही ती मला उजवीकडंच वळायला सांगतेय, असं वाटायचं. मुलाचा हात धरून जात असलेल्या पालकांप्रमाणं ती माझ्याशी वागायची. मला जेव्हा जावंसं वाटेल किंवा जायची गरज भासेल तेव्हाच तिच्याकडं जावं, असं माझं मत असलं तरी मला दर बुधवारी तिच्याकडं जावंच लागे. तिनं मला प्रश्न विचारावेत, माझं बोलणं कान देऊन ऐकावं, इकडं-तिकडं बघत बसण्यापेक्षा तिनं माझ्या डोळ्यात बघावं हे मलाही आवडलं असतं. वर्षभर मी तिथून पळ काढण्याचा प्रयत्न केला, माझ्या वेड्या विचारांना धरून राहण्याचा प्रयत्न केला. पण मी अवास्तव वाहत होते ते कळत नव्हतं. नंतर हे प्रकर्षानं जाणवलं. जगण्याची इच्छा मेल्यानं मरण कवटाळणं म्हणजे निव्वळ माझा स्वार्थीपणा आहे, हे माझ्या लक्षात आलं. माझ्या दोन्ही मुलींचा विचारच मी केलेला नव्हता, याचीही जाणीव झाली. मी फक्त माझा विचार करत होते. अँटोनिओ आणि आमच्या दोन्ही मुलींचा विचारच न करता वेड्यासारखी वागत होते, हेही कळून चुकलं.

नंतर माझी मन:स्थिती सुधारली असली तरी काही वेळा प्रचंड त्रास

व्हायचा. त्या दुखऱ्या भावना मध्येच केव्हातरी डोकं वर काढायच्या. उन्हाळ्यात तर हैराण करायच्या. आम्ही या स्विमिंग पुलापासून खूप लांब जाणार होतो. आम्ही तिथून लांब गेलो आणि रस्त्याच्या कडेला वगैरे घर घेतलं तरी उन्हाळा येणारच होता! आम्ही डोंगरात जाऊ नाहीतर वाळवंटात घर बांधू, सगळीकडं उन्हाळ्याचं रूप तेच राहणार होतं. ही बोचरी जाणीवही व्हायची.

काही वेळा मला वाटायचं की सकाळी जागच येऊ नये. मला मरण यावं आणि हा त्रास कायमचा संपून जावा. माझं कुटुंब, माझी माणसं, मित्रमंडळी माझ्यासोबत होती. मी खरंच खूप प्रयत्न करत होते. पण तरीही मला स्वत:ची लाज वाटायची. मी अपघातामध्ये अपंग झाले असते किंवा होरपळून निघाले असते तर त्याच्या व्रणांकडं मी वेगळ्या दृष्टीनं पाहिलं असतं. तो माझ्या नशिबाचा भाग असता. ते काय कुणाच्या हातात असतं का? घडणाऱ्या गोष्टींना कोणीच काही करू शकलं नसतं. पण माझ्या मेहुण्यानं मला पेटवून दिलं. माझं असं करावं ही माझ्या आईची आणि वडलांची इच्छा होती. त्यांचा निर्णय होता तो. माझी ही अवस्था नशिबानं किंवा दैवानं केलेली नव्हती. माझी त्वचा मी गमावली होती, याचं सगळ्यात जास्त वाईट वाटायचं. हे नुकसान महिनाभराचं किंवा वर्षभराचं नव्हतं, तर जन्मभराचं होतं.

असे भीतिदायक प्रकार मध्येच समोर ठाकायचे. आम्ही टीव्हीवर पाश्चिमात्य सिनेमा बघत होतो. त्यामध्ये दोन पुरुष तबेल्यात मारामारी करताना दाखवले होते. त्यातला एक त्वेषाच्या भरात काडी पेटवतो आणि गवतावर भिरकावतो. ती काडी दुसऱ्या माणसाच्या दोन पायांच्या मध्ये पडते आणि क्षणात गवत पेट घेतं. आगीच्या ज्वाळा भडकू लागतात आणि तो माणूस त्यात सैरावैरा पळत सुटतो. ते दृश्य बघताना मी जोरात ओरडायला सुरुवात केली. माझ्या तोंडातला घास तसाच बाहेर आला. मी वेड्यासारखी वागत होते. अँटोनिओ म्हणाला, ''घाबरू नको सोन्या. तो सिनेमा आहे. खोटं असतं ते सगळं.'' असं म्हणत त्यानं टीव्ही बंद करून टाकला. मला शांत करण्यासाठी त्यानं मला मिठीत घेतलं आणि म्हणाला, ''तो टीव्ही आहे फक्त बाळा. त्यात काहीही खरं नसतं. नाटक आहे ते.'' इतके दिवस मी स्वत:ला सावरलं होतं. पण त्या प्रसंगानं मला काही पावलं मागं आल्यासारखं वाटलं. ज्वाळांमध्ये धगधगत असल्याचा भास झाला. त्या रात्री मी टक्क जागी होते. माझ्या मनात आगीनं बस्तान मांडलेलं होतं. लहानशी

ठिणगी दिसली तरी मला मोठी आग लागल्यासारखा दाह व्हायचा. अँटोनिओला सिगारेट पेटवताना पाहिलं की मी काडी विझेपर्यंत किंवा सिगारेट लाइटर शांत होईपर्यंत स्तब्ध होत असे. यामुळंच मी टीव्हीही फार बघत नव्हते. काहीही जळताना पाहिलं की भीतीच्या लाटा उसळायच्या. माझ्या मुलींना माझ्या या भीतीची जाणीव होती. त्यामुळं मला घाबरवणारं काही दिसलं की ती गोष्ट त्या गायब करायच्या. त्यांनी काडेपेटीची काडी पेटवू नये असं मला वाटायचं. घरात सगळ्या गोष्टी विजेवर चालणाऱ्या होत्या. स्वयंपाकघरातही मला आगीचा लवलेश नको होता. पण एक दिवस कुणीतरी माझ्यासमोरच काडेपेटीशी खेळत होतं. त्यानं बोटावर अल्कोहोल लावला आणि काडी पेटवली. आश्चर्य म्हणजे त्याचं बोट अजिबात भाजलं नाही. काहीतरी क्लृप्ती केली त्यानं. मी संतापानं आणि भीतीनं थरथरत ओरडले,

''दुसरीकडं कुठंतरी जाऊन हे प्रकार कर. निघून जा इथून! मी आगीचा दाह सोसलाय. तो कसा असतो ते तुला कळणार नाही!''

मी जर लांब उभी असेन तर विस्तवातल्या आगीची मला भीती वाटायची नाही. पाणी कोमट असेल तर त्याचीही भीती वाटायची नाही. बाकी गरम गोष्टींची मात्र मला भीती वाटायची. आग, गरम पाणी, ओव्हन, टीव्ही, विजेवरच्या बिघडलेल्या वस्तू, व्हॅक्युम क्लीनर, जळकी सिगरेट... जे जे पेट घेऊ शकतं ते मला भीती घालायचं. माझ्यामुळं माझ्या पोरीही भेदरायच्या. माझ्यामुळं एक पंधरा वर्षांची मुलगी इलेक्ट्रिक बर्नर सुरू करू शकत नव्हती. हे चुकीचं होतं. मी घरात नसले तर पास्ता किंवा चहा करण्यासाठी मी त्यांना गरम पाणी किंवा स्टोव्ह वापरू देत नव्हते. माझ्या समक्ष काय ते केलं जावं असा माझा हट्ट असायचा. प्रत्येक गोष्टीकडं बारकाईनं लक्ष देण्यासाठी मी तिथं असायलाच हवी, असं मला वाटायचं. इलेक्ट्रिक बर्नर बंद केल्याचं तपासल्याशिवाय मी सुखानं झोपूच शकत नव्हते.

दिवस-रात्र या भीतीनं मी पछाडलेली असे. यामुळं बाकीच्यांना किती कटकट व्हायची. माझ्या नवऱ्याची सहनशक्ती कमालीची होती, पण माझ्या अनाठायी भीतीच्या प्रकारानं तो कधी कधी थकून जायचा. माझ्या मुली चहा पिताना बशी हातात धरतानाही थरथरायच्या.

मी चाळिशीत आल्यावर आणि एका भीतीनं मला पछाडलं. मारूआन

आता मोठा झाला असेल. मी त्याला वीस वर्षांत पाहिलेलं नाही. माझं लग्न झालं ते त्याला माहीत होतं. त्याला बहिणी आहेत हेही माहीत होतं. पण आपल्याला एक भाऊ आहे हे लॅटिशिया आणि नादिया यांना माहीत नव्हतं. मी हे गुपित कित्येक वर्षं जपून ठेवलं होतं. अँटोनिओला मारूआनबाबत सुरुवातीपासूनच कल्पना होती. पण तो कधीच त्याविषयी बोलला नव्हता. जॅकलिनलाही माहीत असलं तरी ती तिच्या व्यापात असायची. वेगवेगळ्या मोहिमांवर जायची. काही वेळा यशस्वी होऊन परतायची, काही वेळा रिकाम्या हातांनी. तिनंही माझ्या मौनाचा आदर राखला होता. महिलांसमोर ऑनर क्राइमविषयी बोलावं म्हणून मी कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हावं असं ती म्हणायची. जाळून मारण्याचा प्रयत्न करण्यात आलेली स्त्री म्हणून, अशा क्रूर प्रकारांतून वाचल्यानं या कृत्यांची साक्षीदार म्हणून मी बोलावं असं तिचं म्हणणं होतं. हे करू शकेन, अशी मी एकटीच त्या वेळी होते.

मी सातत्यानं खोटं बोलत होते. मारूआनच्या अस्तित्वाचा उल्लेखही न करता, या भयावह प्रकारापासून माझ्या मुलाचं रक्षण करत असल्याचं स्वत:ला सांगत होते. मारूआन आता मोठा झाला असेल. खरं तर प्रश्न असा होता की, मी मारूआनचं रक्षण करत होते की, मी केलेल्या कृत्याची मला वाटणारी लाज, मुलाला दत्तक दिल्याबद्दल वाटणारी अपराधी भावना यावर पांघरूण घालत होते? सगळं एकमेकांत गुंतलेलं आहे, हे माझ्या नंतर लक्षात आलं. आमच्या गावात मानसशास्त्रज्ञ वगैरे नाहीत. महिलांनी स्वत:ला असले प्रश्न पडूच द्यायचे नसतात. आम्ही फक्त बाईचा जन्म मिळाला म्हणून अपराधी वाटून घ्यायचं असतं.

माझ्या मुली मोठ्या झाल्या होत्या. त्यामुळं माझ्या डोक्यातला प्रश्न आणखीच गुंतागुंतीचा झाला होता.

‘‘पण आई, त्यांनी तुला पेटवून का दिलं?’’

‘‘कारण मला माझ्या आवडीच्या मुलाबरोबर लग्न करायचं होतं आणि मला त्याच्यापासून दिवस गेले होते.’’

‘‘त्या बाळाचं काय झालं? ते कुठंय आता? ’’

तो एका अनाथाश्रमात होता. नाही तरी हे मी मुलींना सांगूच शकले नसते.

८वी आवृत्ती

सामान्यांतले असामान्य

मूळ लेखिका - सुधा मूर्ती

अनुवाद - उमा कुलकर्णी

किंमत : १५०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.

सुधा मुर्ती यांचं नर्मविनोदी शैलीतलं वैशिष्ट्यपूर्ण पुस्तक मराठीत!
उत्तर कर्नाटकातल्या या सर्व माणसांना स्वत:चं असं खास व्यक्तित्व आहे. तसेच ते सगळे इथल्या वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती भागही आहेत. यातील सर्व कथा म्हणजे टपोऱ्या, सुगंधी मोगऱ्याच्या फुलांचा गजरा, अस्सल कर्नाटकी गोफात गुंफलेला!
या सर्वसाधारण माणसांमध्ये जाणवणारं 'असामान्यत्व' लेखिकेच्या स्वभावातील ऋजुता अधोरेखित करतं

८वी आवृत्ती

जुगलबंदी

लेखक - शंकर पाटील

किंमत : १००/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.

''मी बोलतोय आलं का ध्यानात
एक आयडिया सुचलीया
तीनचार दिवस वर्गाची सहल काढगं.
मला वाटतं गोव्याला गेलं तर?
तुम्ही दिवसभर समुद्र दाखवत हिंडायचं
रात्री मुक्काम सम्राटवर करायचा''



माफिया क्वीन्स ऑफ मुंबई

मुंबईच्या गुन्हेगारी जगाचा कारभार समर्थपणे पेलणाऱ्या
माफिया क्वीन्स



लेखिका : एस. हुसेन झैदी, जेन बोर्जस

अनुवाद : उल्का राऊत

पृष्ठे २२४ । किंमत ` २२० । पोस्टेज ` ३० । सभासदांना सवलतीत

विशाल भारद्वाज यांच्या प्रस्तावनेतील काही भाग

अध्यात्मापेक्षा अपराध, गुन्हे अधिक थरारक आणि नाजूक गुलाबाच्या फुलांपेक्षा धडाडणाऱ्या बंदुका जास्त प्रभावी वाटतात. आणि म्हणूनच – संत महंतांपेक्षा गुन्हेगारांचं जीवन जास्त रोमांचकारी आणि चटकदार असतं – असं मला वाटतं.

आपल्याकडे क्राइम रिपोर्टिंग फक्त वृत्तपत्रांपुरतंच मर्यादित असतं आणि लोकांना फारच चटकन अशा बातम्यांचा विसरही पडतो. त्यामुळेच गुन्हे आणि गुन्हेगारीविषयक पुस्तक ही गोष्ट फारच दुर्मीळ आहे.

चित्रपट निर्माता असल्याने मी अशा चित्तथरारक क्राइम स्टोऱ्यांच्या शोधातच असतो. स्वप्ननगरी बॉम्बेचा – आताची मुंबई – गुन्हेगारी इतिहास फारच रोमांचकारी आहे; पण त्याविषयीची तपशीलवार माहिती उपलब्ध नाही. 'ब्लॅक फ्रायडे' हा चित्रपट पाहिल्यानंतर मात्र मला आशेचा किरण दिसला. माझा प्रिय मित्र आणि उत्कृष्ट दिग्दर्शक अनुराग कश्यपचा हा चित्रपट, एस. हुसेन झैदींच्या याच नावाच्या पुस्तकावर आधारित आहे. १९९३ सालच्या मुंबईमधील महाभयंकर बॉम्बस्फोटांमागची कारणं आणि त्यांचे दूरगामी परिणाम ह्यांचं अत्यंत अभ्यासपूर्ण वर्णन ह्या पुस्तकामध्ये आढळतं.

त्यानंतर हुसेनचं नाव माझ्या चांगलंच लक्षात राहिलं. त्यांच्या क्राइम स्टोऱ्या मी मोठ्या उत्सुकतेने वाचायला लागलो. अर्थात त्यासाठी त्यांनी नोकरी बदलली की, मला माझं वर्तमानपत्रही बदलावं लागे; ही गोष्ट अलाहिदा.

पुढे माझ्या 'कमीने' ह्या चित्रपटासाठी माहिती गोळा करत असताना त्यांची-माझी भेट झाली. 'मादक पदार्थांचा व्यापार' ह्या मुंबईतल्या माफिया जगताच्या अविभाज्य घटकाची माहिती मिळवण्यासाठी त्यांनी मला अतिशय मोलाची मदत केली. संबंधित लोक आणि जागांशी त्यांच्यामुळेच माझी ओळख झाली. 'भविष्यात आपल्या पुस्तकावर आधारित चित्रपट करायचा विचार असल्यास त्यावर पहिला हक्क माझाच राहील', असं आश्वासनही मी त्यांच्याकडून घेतलं.

ह्या गोष्टीला दोन वर्षं झाली असतील. एके दिवशी अचानक मला त्यांचा फोन आला. आत्ता तुमच्या हाती असलेल्या 'माफिया क्वीन्स ऑफ मुंबई'ची

प्रस्तावना मी लिहावी हे सांगण्यासाठी हा फोन होता. या पुस्तकामधील विलक्षण कथा ह्यापूर्वी कोणी ऐकल्या नसतील, याची मला खात्री आहे.

कोणत्याही कथेतील हिरोपेक्षा, हिरॉइन मला अधिक चित्तवेधक वाटतात. मॅक्बेथ किंवा किंग डंकनपेक्षा लेडी मॅक्बेथची व्यक्तिरेखा कितीतरी पटीने जास्त गुंतागुंतीची आणि खिळवून टाकणारी वाटते. मॅडम बोवारी, ॲना कॅरेनिना, फूलनदेवी ह्यांच्यामध्ये काहीतरी वेगळे, विलक्षण गुण आहेत असं मला वाटतं.

हे पुस्तक वाचणं हा एक आनंददायी अनुभव ठरला, किंबहुना हा एक थरारक प्रवास आहे, असं म्हणणं जास्त सयुक्तिक ठरेल. वाचताना हसवणारं, दु:खदायक, तर कधी धक्कादायक; पण कधीही कंटाळा येऊ न देणारं, अत्यंत नाट्यमय पुस्तक आहे हे. करीमलाला, हाजी मस्तान आणि 'आपला' दाऊद इब्राहिम यांसारख्या खतरनाक डॉनना आपल्या बोटाच्या इशाऱ्यांवर लीलया नाचवणारी महाधूर्त जेनाबाई दारूवाली... वेश्या व्यवसाय करणाऱ्या दुर्दैवी बायकांना समाजात इज्जत आणि महत्त्व मिळावं म्हणून झगडणारी कामाठीपुऱ्याची राणी गंगूबाई घरवाली... प्रत्यक्ष दाऊद इब्राहिमने ठार मारलेल्या आपल्या पतीच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी, केविलवाणी धडपड करणारी एक जिद्दी पत्नी... अशा अनेक 'हिरॉइन्स' पुस्तकाच्या पानांतून साकार होताना दिसतात.

अतिशय चित्रमय भाषाशैलीमुळे पुस्तक वाचत असताना आपण चित्रपट पाहत आहोत, असं वाटत राहतं. पटकथेप्रमाणे कथानकाची रचना केल्याने वाचक भूतकाळातून वर्तमान आणि पुन्हा भूतकाळात सहजपणे फिरत राहतो. प्रत्येक कहाणी एक से बढकर एक असल्याने चित्रपटासाठी कोणती निवडावी, हे ठरवणं अतिशय कठीण आहे.

सुंदर, मुत्सद्दी, दयावंत अशा ह्या रणरागिणींच्या विलक्षण जगामध्ये तुमचं स्वागत आहे. 'अंडरवर्ल्ड ही केवळ पुरुषांची मक्तेदारी असून निडर, बेदरकार, क्रूर पुरुषांचीच तिथे सत्ता चालते', हा समज ह्या तथाकथित नाजूक, कोमल मनाच्या स्त्रियांनी मोडीत काढला.

'मुंबईची राणी कोण?' ह्या प्रश्नाचं उत्तर ही तुम्हाला पुढील पानांमध्ये सापडेल.

– विशाल भारद्वाज

मुंबई महानगरीतील गुन्हेगार स्त्रियांच्या गुंतागुंतीच्या मानसिकतेचा शोध घेण्याचा

'माफिया क्वीन्स ऑफ मुंबई' हे पुस्तक म्हणजे मला पडलेल्या एका प्रदीर्घ स्वप्नाचा आविष्कार आहे. १९९० सालच्या अखेरपर्यंत मी क्राइम रिपोर्टिंग करत असे. त्यासंदर्भात अनेक गुन्हेगार स्त्रियांबद्दलही ऐकायला मिळायचं. त्यांचे किस्से ऐकून मी अक्षरश: थरारून जायचो. त्यांच्याविषयी अतिशय कुतूहल वाटायचं. पुरुष गुन्हेगारांपेक्षा त्या अधिक धाडसी, कमालीच्या कारस्थानी असतात आणि काम तडीस नेण्यासाठी त्या दयामाया न दाखवता कोणत्याही थराला जाऊ शकतात, हे माझ्या लक्षात आलं.

लल्लन भाभीच्या कहाणीने माझ्या मनावर खोल ठसा उमटवला. पेट्रोलची भेसळ करणाऱ्या भाई लोकांच्या गर्दीत ती एकमेव भाभी होती. पावसाळ्यातील एका संध्याकाळी तिला पोलिसांनी अटक केली. शिवडी येथील पोलीस स्टेशनमध्ये तिची रवानगी झाली. नियमाप्रमाणे तिला एक फोन करायची परवानगी देण्यात आली. सर्वसाधारणत: असा फोन नातलगांना किंवा जामीन मिळवण्यासाठी वकिलाला केला जातो.

या पठ्ठीने पोलीस स्टेशनमधूनच, पोलिसांच्या नाकावर टिच्चून आपल्या घरीच फोन लावला. धाकट्या भावाला तिने फोनवरून सूचना दिली, 'आज रात्री मी घरी येणार नाही. स्वयंपाकघरातलं सामान हलवायचं बघ.'

हे संभाषण ऐकून चौकीतले सारे पोलीस चांगलेच बुचकळ्यात पडले. नुकतीच अटक झालेली ही बाई मुलं, नवरा किंवा स्वत:च्या सुटकेची चिंता न करता स्वयंपाकघराचा विचार का करत्येय?

अर्थात तिला काही विचारण्यात अर्थ नव्हताच. ती पोलिसांना सर्व काही प्रामाणिकपणे सांगेल, हे अर्थातच शक्य नव्हतं. स्त्री असल्याने पोलिसी खाक्या दाखवून तिला बोलतं करणं, हेही शक्य नव्हतं. शेवटी पोलिसांनी घरी जाऊन तिच्या भावालाच बोलतं केलं. त्याने सर्व धडाधडा सांगून टाकलं, 'स्वयंपाकघरातलं सामान हलव, म्हणजे भेसळयुक्त पेट्रोलचा तिथे लपवलेला साठा त्वरित दुसरीकडे नेण्याची व्यवस्था कर.'

या एका उदाहरणाने लल्लनभाभीने आपली धमक दाखवून दिली. 'आपण कायद्याला भीक घालत नाही, अटक झाली तरी लवकरच सुटका

होऊन आपले धंदे पूर्ववत चालू करणार’ हेच तिच्या एकूण आविर्भावातून दिसून आलं. कैदेत असताना आर्थिक नुकसान होऊ नये एवढीच माफक इच्छा असल्याने, तिने ‘तो’ फोन केला होता.

ही गोष्ट ऐकताक्षणी माझ्यामधील पत्रकार आणि लेखक जागा झाला. एका स्त्रीचं धाडस, मुत्सद्दीपणा पाहून मी कमालीचा चक्रावून गेलो. त्यानंतर मी स्त्री-गुन्हेगारांविषयीचे तपशील गोळा करायला सुरुवात केली. पुढे-मागे पुस्तक लिहिलंच तर उपयोग होईल हा दृष्टिकोन त्यामागे होता.

गेली अनेक वर्षं मी विविध गुन्हेगारांविषयी लिहीत आलोय. स्त्री आणि पुरुष गुन्हेगारांची तुलना करता गुन्हेगार स्त्रियांचं जीवन अधिक खडतर आणि धोकादायक असतं, असा निष्कर्ष मी काढलाय. एखाद्या जेनाबाई दारुवालीपेक्षा दाऊद इब्राहिम असणं जास्त सोपं आहे. छोटा राजन आणि छोटा शकीलसारखे अनेक गँगस्टर आढळतील; पण प्रत्यक्ष दाऊदला आव्हान देण्याचं धारिष्ट्य दाखवणारी सपना दीदी एखादीच! तसे धारिष्ठ्य दाखवण्याची भयंकर शिक्षाही तिला मिळाली. अत्यंत निर्घृणपणे तिची हत्या झाली. २२ वेळा तिला भोसकण्यात आलं होतं. त्यापैकी चार वार तिच्या गुप्तांगावर केले गेले होते. ‘माफियाशी पंगा घेणं महाग पडेल’ अशी धोक्याची सूचना होती ती.

गुन्हेगार स्त्रियांच्या अत्यंत गुंतागुंतीच्या मानसिकतेला समजून घेण्याचा प्रयत्न मी या पुस्तकामधून केला आहे. त्यांचं उदात्तीकरण करण्याचा उद्देश अजिबात नाही. केवळ माफियांमुळेच गुन्हेगारी जगात त्यांनी प्रवेश केला असंही नाही. त्यांच्या जीवनाने असं धोक्याचं वळण घेतलं, त्यामागे अनेक गुंतागुंतीची कारणं आहेत. गरिबी हे एक महत्त्वाचं कारण होतं. कधी केवळ नाइलाजाने, आयुष्यात अन्य कोणताही पर्याय नसल्यानेच, अनेक स्त्रियांनी हा मार्ग स्वीकारला असणार ह्यात शंका नाही. प्रचलित सामाजिक नीतिमूल्यांच्या सीमा तोडण्याचं अफाट धैर्य त्यांच्यामध्ये होतं, या कारणामुळेच मला त्या चित्तवेधक वाटतात.

गुन्हेगारी विश्वामधील १३ असामान्य आणि शक्तिशाली स्त्रियांच्या जीवनकहाण्या शब्दबद्ध करणं अतिशय आव्हानात्मक काम होतं. कारण त्यांच्याविषयी फारसं काही लिहिलंच गेलं नव्हतं. बेकायदा दारूचा धंदा करणारी जेनाबाई दारूवाली, कुंटणखान्याची मॅडम गंगूबाई काठियावाडी अशा स्त्रियांविषयी माहिती मिळवणं फार कठीण गेलं.

पत्रकारितेचा पहिला नियम म्हणजे पत्रकारांनी तटस्थ राहून, कोणतंही मत न बनवता अहवाल द्यावा. प्रश्न विचारावेत; पण बाजू घेऊ नये. हा नियम आम्ही कसोशीने पाळला आहे. मतप्रदर्शन टाळून फक्त वस्तुस्थिती समोर ठेवली आहे. न्यायालयीन कागदपत्रं, पोलिसांच्या नोंदी, विश्वासार्ह पत्रकार आणि महत्त्वाच्या वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध झालेले वृत्तान्त, अशा सूत्रांच्या माहितीवर हे पुस्तक आधारलेलं आहे.

ह्या माध्यमांकडून न मिळू शकलेल्या माहितीसाठी आम्ही कथानायिकांचे नातलग, शेजारी-पाजारी, निवृत्त पोलीस अधिकारी, मुरलेले अनुभवी पत्रकार आणि साक्षीदार अशा लोकांच्या मुलाखती घेतल्या. एखादा मुद्दा वादग्रस्त वा संशयास्पद वाटला, तर त्याबाबत दोन वेगवेगळ्या लोकांकडून खात्री करून घेतली. परस्परविरोधी तपशील आढळले, तर त्यांचा समावेश न करण्याची खबरदारी आम्ही घेतली आहे.

या पुस्तकाद्वारे मुंबईच्या राण्यांचं वास्तववादी चित्रण केले आहे. या पुस्तकामध्ये कपोलकल्पित काहीही नाही. कथेमध्ये नाट्यमयता आणि जिवंतपणा आणण्यासाठी काही जागी आम्ही वाङ्मयीन स्वातंत्र्य घेतलं आहे, पण तेदेखील अत्यावश्यक असेल तेव्हाच. कथेमधील सत्यता त्यामुळे जराही कमी होणार नाही, या गोष्टीची खबरदारी सातत्याने घेतली आहे.

– एस. हुसेन झैदी

पुरुषापेक्षा स्त्री अधिक धोकादायक असते, असे रुडियार्ड किपलिंग या ब्रिटिश लेखकाने शंभर वर्षांपूर्वी लिहून ठेवले आहे.

– रुडियार्ड किपलिंग

मुंबई माफियांच्या इतिहासाकडे पाहिल्यास मात्र 'स्त्री पुरुषापेक्षा जास्त खतरनाक आहे' तशी खात्री पटते. अनपेक्षित घटनेमुळे डॉनच्या पत्नीला सूत्रं हाती घ्यावी लागली असताना, 'हम भी कुछ कम नहीं' असं तिने वादातीतपणे दाखवून दिलं आहे.

१९९०मध्ये दहशतवाद फारच वाढला. मुंबई आणि आंतरराष्ट्रीय पोलिसांनी अंडरवर्ल्डविरुद्ध अतिशय कठोर पावलं उचलल्यामुळे मुंबई माफियांचं कंबरडं साफच मोडलं, निदान पोलिसांना तसं वाटलं होतं. वस्तुत: कायद्याच्या तडाख्यात सापडू नये, तसंच पोलिसांचं लक्ष दुसरीकडे

वेधावं ह्या उद्देशाने माफिया डॉननी आपल्या 'व्यवसाया'ची सूत्रं आपल्या विश्वासू सहकाऱ्यांकडे सोपवली होती.

तथापि, विश्वासू माणसं मिळणं अतिशय मुश्कील ठरू लागलं. दुसऱ्या गँगला जाऊन मिळण्याचं प्रमाण वाढत चाललं होतं. त्यामुळे आपल्याच माणसांवरचा विश्वास उडू लागला. 'व्यवसाय' सुपुर्द करण्यासाठी विश्वसनीय माणसं मिळणं अशक्यप्राय झालं. अशा संशयित मन:स्थितीमधील अनेक डॉननी आपल्या बायकोचा पर्याय निवडला. आत्तापर्यंत ह्या सौभाग्यवती पतिदेवाचे रक्तरंजित कारनामे दूरवरून बघत असत. घरकाम आणि देवघरात देवांची पूजाअर्चा करणं, एवढ्यापुरतंच त्यांचं आयुष्य सीमित होतं. अचानक ह्या गृहिणींवर फार मोठी जबाबदारी येऊन पडली. घर सांभाळता-सांभाळता ह्या साध्यासुध्या स्त्रियांना पूर्ण गँग सांभाळण्याचं जोखमीचं काम करावं लागलं.

खतरनाक गुंडांना सांभाळणं हे आपल्या घरात मुलाबाळांना सांभाळण्याइतकं सोपं नाही, हे लवकरच त्यांच्या ध्यानात आलं. तरीदेखील पतिरक्षणार्थ सदैव तलवार उपसून तयार अशी आदर्श भारतीय नारी असल्याने, प्रत्येकीने गुन्हेगारी जगतामध्ये मोठ्या धडाडीने जम बसवला. 'साधीसुधी, अबला गृहिणी अत्यंत सहजतेने' महत्त्वाकांक्षी, आक्रमक, पाताळयंत्री आणि हुशार गँगलीडरच्या भूमिकेत शिरली. पुढे त्यांचं महत्त्व इतकं वाढलं की, त्यांच्याविना काम करायची कल्पनाही पतिदेव डॉनच्या डोक्यात आली नाही.

ह्या गृहिणी अत्यंत थंडपणे धमक्या, खूनखराबा, वेगवेगळ्या प्रकारचे गुन्हे आपल्या गँगकडून करवून घेत.

पद्मा ही राजनचा सहकारी रवी पुजारीची महत्त्वाकांक्षी पत्नी. नंतर पुजारीने स्वत:ची गँग बनवली. आपल्या नवऱ्याच्या गँगची सारी सूत्रं पद्मा मोठ्या अक्कलहुशारीने, पण पडद्यामागून हलवायची. पतिदेवाच्या गँगची रक्तरंजित कृष्णकृत्यं बिनबोभाट चालावी ह्यासाठी पैशांची नियमित आवक होत राहावी, या सद्हेतूने काही पतिव्रता राजकारणात उतरल्या. काही जणी समाजकार्य करीत. काही एखादा व्यवसाय तर काही चक्क नोकऱ्याही करत. उदाहरणार्थ, फरारी डॉन छोटा राजनची पत्नी सुजाता निकाळजे हिने नवऱ्याची बेकायदेशीर कृत्यं कायदेशीर करण्याच्या उद्देशाने रियल इस्टेटचा मोठा व्यवसाय सुरू केला. डॉन अरुण गवळी अंडरवर्ल्ड सोडून राजकारणात

पडला. त्याची बायको आशा गवळी ही भक्तिसंगीत गायिका होती. तिने पतीला राजकीय पक्ष स्थापण्यास मदत केली. बनावट चकमकींपासून त्याचं संरक्षण करण्यात हा राजकीय पक्ष फारच उपयुक्त ठरला. ह्याउलट आपल्या लंडनमध्ये शिकलेल्या इंजिनिअर नवऱ्याला गुन्हेगारी जगात येण्यास नीता नाईकने उद्युक्त केलं. अश्विन नाईक पुढे अट्टल गँगस्टर झाला आणि त्याच्या कृष्णकृत्यांना संरक्षण मिळावं, म्हणून नीता राजकारणात पडली.

गँगची सूत्रं अशी स्त्रियांच्या हाती आल्याने, अंडरवर्ल्डचा नायनाट करण्याचा चंग बांधलेल्या पोलीस खात्याला चांगलंच गोंधळवून टाकलं. शक्तिकेंद्रामध्ये असा अनपेक्षित बदल – थोड्या काळाकरता का होईना – घडल्याने पोलिसांचं तपासकार्य मंदावलं.

गुन्हेगारी जगात झपाट्याने 'प्रगती' करत ह्या गृहिणी छोटे-मोठे गुंड आणि अट्टल गँगस्टरच्यासुद्धा 'मम्मी' आणि 'नानी' बनल्या, तेव्हा पोलीस खातं साफच हडबडून गेलं होतं. अशाच काही गृहिणींच्या – आशा गवळी, नीता नाईक, सुजाता निकाळजे आणि पद्मा पुजारी यांच्या ह्या कथा आहेत.

आशा गवळी

मुंबईमधल्या भायखळा भागातील एक झोपडपट्टीबाहेर लहानसा घोळका जमलाय. बहुसंख्येने वृद्ध आणि मध्यमवयीन मुसलमान पुरुष घोळक्यात आहेत. एक उंचेपुरे, पण सर्वसामान्य दिसणारे वयस्कर गृहस्थ त्या घोळक्याजवळ येत आहेत. उजव्या हाताने लांब, पांढरीशुभ्र दाढी कुरवाळणं चालू आहे. घोळक्याजवळ गेल्यावर हळू आवाजात कुजबुजणाऱ्या साऱ्यांनी ७० वर्षीय सद्‌गृहस्थाचं प्रेमाने स्वागत केलं. ते येणाऱ्या-जाणाऱ्यांनाही आपल्यामध्ये सामील होण्यासाठी बोलावताहेत.

अखेर त्यांची प्रतीक्षा संपली. आतुरतेने सारे जण ज्या गाडीची वाट पाहत होते, ती झोपडपट्टीच्या समोर येऊन थांबली. शुभ्र दाढीवाल्यासह सारे गाडीजवळ गेले. उजवा हात उंचावून सारे एक साथ घोषणा देत होते, 'मम्मी झिंदाबाद! मम्मी झिंदाबाद!'

हिरव्या रंगाची साडी परिधान केलेली 'मम्मी' गाडीतून खाली उतरली. उत्साहपूर्ण स्वागत पाहून तिने सर्वांकडे हसून प्रतिसाद दिला. काळेभोर केस,

वयाच्या खुणा दाखवणाऱ्या सुरकुत्याही फारशा नव्हत्या, जेमतेम पन्नाशीची वाटणारी – अशा तिचं बुजुर्ग मुसलमान पुरुष प्रेमादराने स्वागत करताहेत, तिला 'मम्मी' म्हणजेच 'आई' म्हणून तिचा जयजयकार करताहेत – एखाद्या अनोळखी व्यक्तीला हा सर्व प्रकार चमत्कारिक वाटला असता. वयामुळे अथवा ती मुस्लीम असल्याने तिला हा मान आणि प्रेम मिळतंय, असं अजिबात नाही. हिंदू डॉन अरुण गवळी ह्याची ती पत्नी आहे आणि वस्तीमधील लोक त्याला 'डॅडी' म्हणतात.

आज ती डॅडींसाठी प्रचार करायला आली आहे. राजकीय वर्तुळामध्ये नगण्य म्हणता येईल, अशा एका पक्षाचा डॅडी उमेदवार आहे. राज्यसभेत आपल्या पतीला पुन्हा एकदा निवडून देण्यासाठी त्याला मत द्यावं, अशी ती मोठ्या नम्रपणे विनंती करते आहे. जमावदेखील लक्षपूर्वक तिचं बोलणं ऐकतो आहे.

कपाळावर कुंकू आणि मंगळसूत्र घातलेली आशा गवळी आदर्श हिंदू पत्नीची मूर्तिमंत प्रतिमा दिसते आहे. 'समाजकार्य करणाऱ्या तिच्या पतीला पोलिसांनी खोट्या आरोपांवरून विनाकारण तुरुंगात डांबलं आहे. तिची दयनीय परिस्थिती पाहून लोकांना तिच्याविषयी अनुकंपा वाटावी' असाच तिचा एकूण आविर्भाव आणि बोलणं आहे. पोलीस रेकॉर्डमध्ये मात्र आशा गवळीचं फारच वेगळं चित्र बघायला मिळतं.

पोलिसांच्या खोट्या चकमकी आणि कारवाईपासून पतीचं रक्षण करण्याचं संपूर्ण श्रेय आशालाच जातं. 'अखिल भारतीय सेना' हा पक्ष स्थापण्यासाठी तिनेच त्याला मदत केली. तिच्याच प्रयत्नांमुळे अरुण अखेर महाराष्ट्राच्या विधिमंडळाचा सभासद होऊ शकला. पत्नीच्या रूपात असा खंबीर साथीदार मिळाल्याने मुंबई पोलीस आणि महाराष्ट्र सरकारच्या नाकावर टिच्चून, मुंबईमध्येच राजकारण आणि गुन्हेगारी अशा दोन्ही क्षेत्रांमध्ये जम बसवणारा अरुण गवळी हा एकमेव डॉन आहे, ह्यात आश्चर्य नाही.

झुबेदा मुजावर उर्फ आशाबरोबर लग्न केलं, तेव्हाच अरुण एक जानामाना गँगस्टर होता. वयाच्या २०व्या वर्षी आपल्या पित्याप्रमाणे महालक्ष्मी येथील शक्ती मिल्समध्ये अरुण नोकरीला लागला. कांजुरमार्ग येथील क्रॉम्टन ग्रीव्ह्ज लिमिटेड ह्या कंपनीत लागल्यानंतर मात्र त्याचं सरळमार्गी आयुष्य बदललं. अंडरवर्ल्डशी तेव्हाच त्याचा संबंध आला. जुना मित्र आणि शाळासोबती रामा नाईक ह्याच्याशी हातमिळवणी केल्यानंतर

दोघंही अनेक स्थानिक टोळीयुद्धांमध्ये गुंतले होते. साथीदार नाईक आणि बाबू रेशीम नावाचा आणखी एक गँगस्टर (हा माझगाव डॉकच्या कँटीन कामगारांचा नेता होता) ह्यांच्या मदतीने अरुणने पारसनाथ पांडे ह्या मटका किंग आणि बेकायदा दारूचा धंदा करणाऱ्या गुन्हेगाराचा १९८०मध्ये काटा काढला. ह्या घटनेनंतर गवळी प्रसिद्धीच्या झोतामध्ये आला. मध्य मुंबईमधील मटका आणि दारूमध्ये मिळणाऱ्या पैशांवर कब्जा करण्यासाठी ह्या त्रिकुटाने पांडेचा खून केला होता.

त्यानंतर 'नॅशनल सिक्युरिटी ॲक्ट'खाली अरुणला अटक झाली, पण एक महिन्याच्या तुरुंगवासानंतर त्याला सोडण्यात आलं. सुटकेनंतर त्याचा प्रभाव आणि शक्ती अधिकच वाढली. ह्याच काळात १७ वर्षांच्या झुबेदाशी त्याची ओळख झाली. तीही भायखळ्यालाच राहायची. अरुण तिच्या प्रेमात पडला. झुबेदाचं तेव्हा एका मुस्लीमधर्मीय मुलाशी लग्न ठरलं होतं, पण अरुणने मागणी घातल्यानंतर तिने मोठ्या आनंदाने होकार दिला. भिन्नधर्मीय आहेत ह्या मुद्द्यावरून नाईक आणि रेशीमने ह्या लग्नाला विरोध केला. हिंदू महाराष्ट्रीय अरुण एका मुस्लीम मुलीबरोबर लग्न करतोय, ह्या कल्पनेने दोघंही कमालीचे चकित झाले होते. अरुण आपल्या निर्णयावर ठाम राहिला आणि अखेर त्याने झुबेदाशी लग्न केलंच. लग्नानंतर धर्म बदलून ती हिंदू झाली – आशा. तिच्या रूपाने दगडी चाळीतील त्याचं घर चालवणारी पत्नी तर त्याला मिळालीच; पण एक विश्वासू, भरवशाची सहकारीही सापडली.

आशाला पाच मुलं झाली. (गीता, महेश, योगिता, योगेश आणि अस्मिता) आरंभी ती नवऱ्याच्या बेकायदेशीर उद्योगांपासून दूरच राहायची. मुलांचं संगोपन, त्यांचं शिक्षण ह्यामध्येच तिचा वेळ जायचा. अरुणची रक्तरंजित माफियागिरी चिंतित मनाने, मूकपणे बघणं याव्यतिरिक्त त्याच्या कामांमध्ये तिचा सहभाग नव्हता.

तथापि, अरुण वारंवार सरकारी पाहुणा बनून तुरुंगात जात असल्याने, तिला बघ्याची भूमिका सोडून सूत्रं हलवावयाची जबाबदारी उचलावीच लागली. ते काम तिने अतिशय कर्तबगारीने निभावलं. पतीला पोलिसांपासून वाचवण्यासाठी ती बऱ्याच शकला लढवत असे. पकडवॉरंट घेऊन आलेल्या पोलिसांना अरुण घरामध्ये कधीच सापडायचा नाही. त्याला लपून बसण्यासाठी आशाने घरामध्ये चक्क खड्डे बनवले होते. पोलिसांच्या सांगण्यानुसार एक खड्डा तर गॅससिलिंडर ठेवण्याच्या जागेखालीच खणलेला

होता.

थोड्याच अवधीत गँगमधील तिचं महत्त्व कमालीचं वाढलं. ती अरुणची 'सर्वांत विश्वासू सहकारी' बनली. काहीशी लाजाळू, पुराणमतवादी आशा पाहता-पाहता अतिशय आक्रमकतेने आणि कावेबाजपणे गँगची प्रकरणं हाताळायला लागली. गँगमधले सारे अरुणला 'डॅडी' म्हणत. साहजिकच ते आशाला 'मम्मी' म्हणायला लागले.

१९९६मध्ये अरुण कोल्हापूर जेलमध्ये होता. 'टेररिस्ट अँड डिस्रप्टिव्ह ॲक्टिव्हिटीज ॲक्ट' (TADA) खाली त्याला अटक करण्यात आली होती. मी लेखासाठी चर्चा करण्यासाठी, त्याला तिथे भेटलो होतो. त्या वेळीच 'पुढे-मागे राजकारणात पडायचंय' असं तो ओझरतं बोलला होता. त्याचं कारणही सांगितलं–पोलीस एन्काउंटरपासून संरक्षण मिळविण्यासाठी! त्याच्या मागच्याच वर्षी आशा महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी उभी राहिली होती. त्यामुळे आपल्याला राजकीय वजन प्राप्त होईल आणि पतीला पोलिसांपासून वाचवता येईल असा तिचा होरा होता; पण तिचा फार मोठा पराभव झाला. धडा शिकल्यानंतर तिने नवऱ्याच्या राजकीय कारकिर्दीकडे लक्ष केंद्रित केलं. १९९७मध्ये पत्नीच्या प्रोत्साहन आणि पाठिंब्याच्या आधारे अरुण गवळीने 'अखिल भारतीय सेना' ह्या पक्षाची स्थापना केली. तो स्वत: पक्षाध्यक्ष होता आणि आशा महिला शाखेची धुरा सांभाळायची. पोलीस चकमकी आणि अटकेपासून बचाव करण्यासाठी डॉन, ह्याच महिला शाखेचा ढालीसारखा उपयोग करायचा. दगडी चाळीतून बाहेर पडताना अरुणच्या सभोवताली कायम महिलांच्या गराडा असे. सदैव बायकांच्या घोळक्यामध्ये वावरतो म्हणून इतर डॉन त्याची खिल्लीही उडवत असत; पण हे डावपेच यशस्वी ठरले. एक म्हणजे बायकांच्या घोळक्यात लपलेला अरुण पोलिसांना दिसायचाच नाही. शिवाय महिलांवर हिंसाचार करणंही अशक्य असे. ह्या दोन्ही कारणांमुळे तो अनेकदा पोलिसांच्या जाळ्यातून सहीसलामत निसटला होता.

१९९८मध्ये स्वत: आशालाच मनीष शहा खून-खटल्यामध्ये अटक झाली.

शहा हा उद्योजक वल्लभ ठक्करचा भागीदार होता. २ फेब्रुवारी १९९८ रोजी मलबार हिल येथील सागर महाल ह्या त्याच्या घराजवळ त्याची हत्या करण्यात आली. अरुणच्या सांगण्यावरून त्याच्या चौघा अनुयायांनी गोळ्या

झाडून शहाला ठार मारलं, असं पोलीस तपासात आढळून आलं. हत्या झाली त्या वेळी अखिल भारतीय सेनेचे अध्यक्ष अमरावती सेंट्रल जेलमध्ये होते. 'महाराष्ट्र प्रिव्हेन्शन ऑफ डेंजरस ॲक्टिव्हिटी ॲक्ट'च्या अंतर्गत गवळीला अटक झाली होती. पोलिसांनी दगडी चाळीमधील अरुणच्या घरावर धाड टाकली असताना काही चिठ्ठ्या सापडल्या. त्यापैकी एक मनीष शहाच्या संबंधी होती – 'आशा, राजाला सांगून बंड्याकडून मनीष शहाचं काम लवकर करून घे.' असं त्या चिठ्ठीत म्हटलं होतं.

पतीच्या बेकायदेशीर कृत्यांमध्ये आशाचीही छुपी मदत असते, हे उघडकीस आणणारे अनेक लेख आणि वृत्तान्त 'एक्स्प्रेस न्यूजलाइन'ने छापले. अरुणची कसून उलटतपासणी केल्यानंतर त्याने कबुलीजबाब दिला. १९९८च्या जानेवारी महिन्यात तुरुंगात असताना, त्यानेच आशाला ती चिठ्ठी लिहिली होती. आशा नंतर जामिनावर सुटली. तिला अडवण्याइतका पुरावा मिळाला नव्हता, पण त्या घटनेनंतर पोलीस तिच्यावर बारीक नजर ठेवायला लागले.

सुटकेनंतर आशाने एका सनसनाटी नियतकालिकाला मुलाखत दिली. त्यामध्ये ती म्हणाली, ''अरुण गुन्हेगार आहे, हे मला माहीत आहे; पण तरीही मी त्याला साथ देते, कारण माझं त्याच्यावर प्रेम आहे. मलाही सर्वसामान्य जीवन जगावंसं वाटतं, पण तसं घडणं कदापिही शक्य नाही, हेही मला माहिती आहे. अरुणवर माझं प्राणांतिक प्रेम आहे. त्याच्याशिवाय सारं व्यर्थ आहे. मी त्याच्यासाठी काय वाटेल ते करीन.'' तिने समारोप केला.

२००२मध्ये अखिल भारतीय सेनेने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका लढवल्या आणि पहिल्याच प्रयत्नात पक्षाचे दोन उमेदवार चक्क निवडून आले – अरुणची सर्वांत थोरली मुलगी गीता गवळी आणि सुनील घाटे – हा एके काळी खून करण्यासाठी सुपाऱ्या घ्यायचा. आशाने अरुणच्या राजकीय पक्षाचं सुनियोजन आणि व्यवस्थित देखरेख केल्याने अखेर अरुण भायखळा मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आला. त्याच वर्षी आशाला पुन्हा अटक करण्यात आली. एका स्त्रीवर हल्ला केल्याचा आरोप तिच्यावर होता. अर्चना काटे आणि भावना पाटील ह्या आशाकडे घरकामाला होत्या. २० डिसेंबर २००४ रोजी ह्या तिघींनी सुषमा सावंत नावाच्या महिलेवर लाठीहल्ला केला. तिघींचीही अटक केल्यादिवशीच प्रत्येकी ३००० रुपये जामिनावर सुटका करण्यात आली. घडलं ते असं – आपल्या

मुलीचे दागिने चोरीला गेले, अशी तक्रार आशाने नोंदवली होती. चोरीचा आरोप सुषमाच्या मुलावर केला होता. त्याच्याविषयी चौकशी करण्यासाठी तिने सुषमाला आपल्या घरी बोलावलं. बोलाचाली वाढत जाऊन प्रकरण हाणामारीवर गेलं. आशाने घरकामाच्या बायकांच्या मदतीने सुषमाला मारलं होतं.

पतीच्या प्रोत्साहन आणि पाठिंब्यामुळे आशाने एक संगीत कंपनी सुरू केली होती. भक्तिसंगीताचे अनेक अल्बम ह्या कंपनीने बाजारात आणले. विक्री झाली नाही; तरीदेखील तिच्या कंपनीला– 'आई म्युझिक सर्व्हिस'ला – भरपूर फायदा होताना दिसून येत होता. दोन वर्षांपूर्वी आयकर खात्याने 'व्हॉलन्टरी डिसक्लोजर ऑफ इन्कम स्कीम' (VDIS) खाली करमाफी जाहीर केल्यानंतर डॉनने वार्षिक उत्पन्न एक कोटीच्यावर दाखवलं होतं. २००४मध्ये निवडणुका लढवण्यापूर्वी त्याने उत्पन्नाचं निवेदन सादर केलं. त्यानुसार त्याच्या म्युझिक कंपनीचं उत्पन्न चक्क दोन कोटी झालं होतं.

विधानसभेच्या २००९ सालच्या निवडणुकांना दोन वर्षं असतानाच गवळी पुन्हा एकदा तुरुंगात गेला. ह्या वेळी त्याला 'महाराष्ट्र कंट्रोल ऑफ ऑर्गनाइज्ड क्राइम ॲक्ट' (MCOCA) खाली पकडण्यात आलं होतं. (टाडा रद्द केल्यानंतर महाराष्ट्र सरकारने १९९८मध्ये श्णर्धी – मोका हा अतिशय कडक कायदा जारी केला होता. संघटित बेकायदेशीर कृत्यं रोखण्यासाठी भक्कम कायदा नसल्याने, सरकारने हा कोणत्याही पळवाटांना जागा नसणारा कायदा तयार केला होता. पुढे गुजरात आणि दिल्ली सरकारांनीसुद्धा संघटित गुन्हेगारी रोखण्यासाठी ह्याच कायद्याचा आधार घेतला होता.) अशा कडक कायद्याखाली अरुणला तुरुंगात डांबण्यात आलं, तरीही आशाने धीर सोडला नाही. तिने त्याच्या नावाने उमेदवारीचा अर्ज भरला आणि गीताला, तिच्या मुलीला बरोबर घेऊन मोठ्या धडाडीने त्याचा प्रचार करायला सुरुवात केली. 'एशियन एज'मध्ये जिग्ना व्होराचा निवडणूक पूर्व वृत्तान्त छापून आला होता. 'अग्नी' ह्या सेवाभावी संस्थेने 'अरुणने विधिमंडळाचा सदस्य असताना फार चांगली कामगिरी केली, तो सर्वांत जास्त कार्यक्षम होता' असे गौरवोद्‌गार काढले होते. असं ह्या वृत्तान्तामध्ये नमूद केलं. वास्तविक पाहता अरुणने सदस्यत्वाचा बहुतांश कालावधी तुरुंगामध्येच व्यतीत केलेला होता. आशाच स्थानिक लोकांच्या समस्या आणि तक्रारींचं निवारण करीत असे. लोकांना खूश ठेवलं, तरच आपला

नवरा पुन्हा निवडून येणं शक्य आहे, हे ती जाणून होती. प्रचार करताना ती नवऱ्याच्या गँगचे पैसे वापरायची. लोकांची मर्जी राखणं, ह्या एकमेव उद्देशाने ती काम करत होती; परंतु एक महत्त्वाचा मुद्दा त्यांनी विचारात घेतला नव्हता. स्वत: अरुणची अनुपस्थिती. दुसरी गोष्ट म्हणजे विधिमंडळाच्या अधिवेशनामध्ये तो गैरहजर होता हे राजकीय निरीक्षकांच्या ध्यानी आलं होतं. त्याच्या मतदारसंघातील लोकांनी मतं न दिल्यामुळे अरुण निवडणुकीत अयशस्वी ठरला. असं असलं, तरी मम्मी ह्यामुळे निराश झालेली नाही, अनेक वेळा कायद्याच्या कचाट्यात सापडूनसुद्धा अरुण सुरक्षित आहे, पोलिसांच्या चकमकींपासून बचावला आहे, हीच गोष्ट तिच्यासाठी सर्वांत जास्त महत्त्वाची आहे. पोलिसांच्या एन्काउंटरमध्ये अनेक बडे डॉन – अरुण नाईक, सदा पावळे, नारी खान – मृत्युमुखी पडले. इतकंच नव्हे, तर छोटे-मोठे गुंडही पोलिसांच्या एन्काउंटरपासून सुटले नाहीत. गवळी पोलिसांच्या गोळ्यांपासून अजूनही बचावला, चक्क आमदार झाला. त्याची मुलगी आणि काही पक्ष कार्यकर्ते नगरसेवक बनले, ह्याचं बहुतांश श्रेय त्याच्या पत्नीला जातं. आपल्या किल्लेवजा घरातून अरुण गवळी फार क्वचितच बाहेर पडतो. त्याची बाहेरची सर्व कामं आशा करते. निवडणूक प्रचार असो, कोर्टामध्ये कज्जे-खटले असोत किंवा पोलीस स्टेशनांच्या आणि मंत्र्यांच्या कार्यालयाबाहेर धरणं धरायचं असो – आशा सर्व आघाड्या सांभाळते.

आशाच्या प्रचारसभांना गर्दी करणाऱ्या लोकांचा भरघोस पाठिंबा मिळतोय तोपर्यंत मम्मी आणि डॅडी कायदा आणि सुव्यवस्था राखणाऱ्या यंत्रणांना सुखनैव चकवत राहतील, हे निश्चित.

नीता नाईक

'माझ्या प्रत्येक श्वासामध्ये अश्विन भरलेला आहे. मला जगण्यासाठी अन्नपाणी नसलं, तरी चालेल. त्याच्या सुखद आठवणींवर मी आयुष्य काढू शकेन,' फरारी गँगस्टर अश्विन नाईकची पत्नी नीता नाईक मला म्हणाली. १९९७मध्ये मी तिची मुलाखत घेतली, तेव्हा तिने हे उद्‌गार काढले होते. भायखळ्यातील सुभाषनगरमधील भपकेदार सजावट असलेल्या तिच्या खोली नं. १४४मध्ये आम्ही बसलो होतो. एका अत्यंत खंबीर मनाच्या

राजकारणी आणि प्रभावी नगरसेविकेच्या तोंडून अशा प्रकारचं मनस्वी विधान ऐकायला मिळावं ह्या गोष्टीचं मला काहीसं नवल वाटलं.

मला तिचं हे विधान, तिचे खोल गेलेले डोळे आणि हॉलिवुड तारका मॅगी जिलेनहाल हिच्यासारखे अति उंच गालफडं, ह्या सर्वांची आठवण त्यानंतर तीन वर्षांनी आली होती – नीताचा तिच्या पतीने खून केला ही बातमी समजली तेव्हा...

पत्नीच्या एकनिष्ठतेविषयी शंका असल्याने अश्विनने आपल्याच टोळीमधल्या लोकांकडून नीताची हत्या करवली होती. परिकथेतील राजा-राणीच्या प्रेमकथेची अशी भीषण अखेर झाली होती. दोघांनीही एकमेकांवर अपार प्रेम केलं. त्यासाठी अनेक दिव्यं पार केली आणि शेवटी त्या प्रेमाचा अंत असा शोकात्म झाला होता.

१९८० साली नीता-अश्विनच्या प्रेमकहाणीला सुरुवात झाली. नीता ब्रीच कँडी ह्या दक्षिण मुंबईच्या उच्चभ्रू वस्तीत राहणारी, कॉन्व्हेंट शाळेत शिकणारी गुजराती मुलगी, तर अश्विन महाराष्ट्रीय होता. भाजी विक्रेता ते डॉन असा प्रवास केलेल्या अमर नाईकचा भाऊ. नीता आणि अश्विन एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडाले होते. नीताच्या कुटुंबीयांना ह्या प्रकरणाची कुणकुण लागल्यानंतर त्यांच्या प्रेमप्रकरणाला काहीशी खीळ बसली.

नीताने सोफाया कॉलेजमधून कला शाखेतून पदवी प्राप्त केली. अश्विन इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग करण्यासाठी लंडनला गेला. प्रेमी युगुलामध्ये इतकं अंतर असूनही त्यांचे प्रेमसंबंध चालूच होते. अश्विन लंडनहून परतल्यानंतर दोघांनीही पळून जाऊन लग्न केलं. नीताच्या जुन्या विचारांच्या गुजराती परिवाराच्या प्रखर विरोधाला न जुमानता हे लग्न झालं. सुरुवातीची काही वर्षं दोघांचं वैवाहिक जीवन फारच आनंदात गेलं. 'डॉनचा भाऊ' हा कलंक पुढे अश्विनला सहन होईनासा झाला, त्यामुळे त्याने मुंबई सोडायचा निर्णय घेतला. चेन्नईला स्थायिक व्हायचं ठरवून, तिथे घर शोधण्यासाठी नीता आणि अश्विन एक-दोनदा चेन्नईलाही जाऊन आले. १९९१मध्ये चेन्नईहून परतत असताना, दोघांचाही मृत्यूशी सामना झाला. त्या एका घटनेने त्यांचं आयुष्य संपूर्णपणे बदलून गेलं.

मुंबईतील सांताक्रूझ विमानतळावरून घरी जात असताना, अश्विनच्या गाडीवर गोळीबार करण्यात आला. छोटा राजनच्या गँगने हा हल्ला केला होता. नीता आणि तिचे सासरे अश्विनच्या मागच्या गाडीत होते. साधारण २०

माणसांनी अश्विनच्या गाडीवर धडाधड गोळ्या झाडायला सुरुवात केल्यावर, खेरवाडी हायवेवर एकच गोंधळ उडाला. आपला पती नि:शस्त्र आहे, हे नीताला माहीत होतं. आपल्या गाडीतून खाली उतरून ती मोठमोठ्याने आरडाओरडा करू लागली. किंचाळणं ऐकून कोणीतरी पोलिसांना फोन करील, अशी तिला आशा वाटत होती. एव्हाना अश्विन कसाबसा गोळ्या चुकवून निसटण्यात यशस्वी झाला होता. ''त्याप्रसंगी मला कळून चुकलं की, माझ्या पतीच्या जिवाला धोका आहे. तू मला जिवंत, जीता-जागता हवा आहेस. तुझं निर्जीव शरीर बघायची मला इच्छा नाही, असं मी अश्विनला सांगितलं. त्यासाठी त्याने भावाशी हातमिळवणी करून संघटित गुन्हेगारीचा मार्ग धरला असता, तरीही मला चाललं असतं. कसंही करून त्याने सुरक्षित राहावं, हीच माझी इच्छा होती.'' नीताने आपल्या मुलाखतीत मला सांगितलं होतं.

पत्नीने अतिशय जोर दिल्यामुळे अश्विन अखेर अंडरवर्ल्डमध्ये सामील होण्यास तयार झाला. मुंबईच्या माफिया वर्तुळामध्ये तो पहिला उच्चशिक्षित गँगस्टर ठरला.

लवकरच अतिशय काटेकोर योजना आणि शिस्तबद्ध संघटन कौशल्य यांसाठी अश्विनचं नाव झालं. कल्याण लोकल ट्रेनमध्ये तान्या कोळी आणि महालक्ष्मीला टेक्स्टाइल टायकून सुनित खटाव यांच्या अत्यंत योजनाबद्ध रीतीने झालेल्या हत्यांसाठी आजही अश्विनचं नाव घेतलं जातं. अश्विनला नंतर टाडाखाली अटक करण्यात आली, पण त्यामुळे त्याचे उद्योग बंद झाले नाहीत. छोटा राजन आणि दाऊदमध्ये बेबनाव होऊन दोघं वेगळे झाल्यानंतर अश्विन दाऊदला जाऊन मिळाला. त्यामुळे गुन्हेगारी जगात त्याचं वजन फारच वाढलं. या सर्व काळात नीता त्याच्यामागे खंबीरपणे उभी होती. ती त्याची अतिशय जवळची, विश्वासू सहचर आणि व्यक्तिगत सल्लागार होती.

पण १९९२मध्ये त्यांच्या आदर्श विवाहामध्ये तडे पडायला सुरुवात झाली. अश्विनच्या इच्छेविरुद्ध नीताने बाळ ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश करायचा आणि नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये उभं राहायचा निर्णय घेतला.

राजकारण वाईट आहे, असं नीता म्हणत असे. तरीही त्यामध्ये पडायचा निर्णय तिने घेतला, कारण तिला स्वत:चं वेगळं अस्तित्व निर्माण करायचं होतं. शिवाय राजकीय वजन वापरून आपल्या नवऱ्याच्या कृत्यांना कायदेशीर स्वरूप देता येईल, अशी शक्यताही तिला वाटत होती.

निवडणूक ती प्रचंड मताधिक्याने जिंकली, यात नवल नाही. अर्थात नवऱ्याला घाबरून असल्यामुळेच लोकांनी आपल्याला मतं दिली हे जाणून असल्यामुळे, तिने आपल्या यशाचं सारं श्रेय पतीला दिलं. कार्यक्षम नगरसेविका बनून चांगलं नाव कमवायचं, हे मात्र तिने पक्कं ठरवलं होतं. राजकारणी आणि गँगस्टरची पत्नी, असं दुहेरी आयुष्य ती जगायला लागली.

मधल्या काळात दाऊदबरोबर केलेल्या हातमिळवणीमुळे अश्विनची ताकद बरीच वाढली. दाऊदचा प्रतिस्पर्धी अरुण गवळी याला त्यामुळे हादरे बसू लागले. १९९४मध्ये गवळीच्या माणसांनी अश्विनवर गोळ्या झाडल्या. त्या हल्ल्यामध्ये त्याचे प्राण वाचले, पण जायबंदी झाल्यामुळे त्याला जन्मभर व्हीलचेअरवर खिळून बसावं लागलं. शत्रू आणि पोलिसांचा वेढा आवळत चाललेला पाहून जीव वाचवण्यासाठी अश्विन प्रथम कॅनडा, तिथून साउथ आफ्रिका आणि नंतर सिंगापूर इथे पळाला. पत्नी आणि दोन मुलांना मुंबईमध्येच ठेवलं होतं. त्याच्या पलायनानंतर पतिपत्नीने एकमेकांशी संपर्क ठेवला नव्हता. हा निर्णय नीताने जाणीवपूर्वक घेतला. आपला फोन टॅप केलेला आहे, आपल्यावर करडी नजर ठेवली जात आहे, याची तिला कल्पना होती. कोणत्याही परिस्थितीत आपल्या राजकीय कारकिर्दीवर परिणाम होऊ नये, यासाठी ती अतिशय दक्षता घेत होती. अश्विनच्या गँगमधील प्रत्येकाला ती नावानिशी ओळखायची; पण त्यांच्या खंडणी, धमक्या वगैरे प्रकरणांमधून ती संपूर्णपणे दूर राहायची. राजकारणात पडल्यापासून ती अधिकच काळजीपूर्वक वागत असे.

पोलिसांकडे तिच्याविषयी विशेष माहिती नव्हती. ती स्वतः गुन्हेगार नसल्यामुळे तिचं पोलीस रेकॉर्डही नव्हतं. स्पेशल ब्रँचमध्ये नीताविषयी एक छोटीशी फाइल होती. 'पती परागंदा झाला असताना ती त्याच्याशी संपर्क साधून होती आणि त्याचे आर्थिक व्यवहार तिने थोड्या काळासाठी हाताळले होते,' असं त्या फाइलमध्ये नमूद केलं होतं. नीताने मात्र ह्याबाबतीत आपल्याला काहीही माहीत नाही, असं म्हणून अज्ञान प्रकट केलं.

अश्विन फरारी झाल्यानंतर नीता नव्याने मिळालेल्या स्वातंत्र्याचा आनंद घेऊ लागली. त्या वेळी शिवसेनेमध्ये स्त्रियांना स्थान मिळणं कठीण असायचं, पण नीताने आपलं अस्तित्व सर्वांना जाणवून दिलं. लोकांशी संपर्क साधताना तिचं कॉन्व्हेंटमधील शिक्षण खूप उपयोगी पडायचं. बॉम्बे म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या स्थायी समितीच्या बैठकींमध्ये ती प्रभावी भाषणं

करायची, त्यामुळे तिची चांगलीच छाप पडत होती. तिचा राजकारणातील मुत्सद्दीपणा आणि महत्त्वाच्या व्यक्तींशी असलेले संबंध, ह्यामुळे नीता लोकप्रिय झाली. त्याच कारणांमुळे १९९५ साली ती महानगरपालिकेच्या निवडणुकीत पुन्हा एकदा निवडून आली. त्याचवेळी तिची जाऊ अंजली नाईक (अमर नाईकची पत्नी) आणि आशा गवळी (अरुण गवळीची पत्नी) या दोघीही निवडणुकीच्या रिंगणात होत्या; पण फक्त नीताच यशस्वी झाली होती.

पती फरारी असल्याने हा विजय मी स्वत:च्या बळावर मिळवत आहे, हे नीताने स्पष्ट केलं. सुशिक्षित, धूर्त आणि सर्व काही झटपट आकलन करणारी नीता शिवसेनेसाठी एक बहुमोल सदस्य ठरली होती. आता दुसऱ्यांदा निवडून आल्यानंतर सेनाप्रमुख बाळ ठाकरे ह्यांच्या बांद्रा येथील 'मातोश्री' ह्या घरात नीताला सहज प्रवेश मिळू लागला. नीताला स्वत:च्या कर्तबगारीची जाणीव होत गेली, तशी ती आणि अश्विनमधील दरीही रुंदावत गेली. दोघांचे संबंध अधिकच बिघडले. दोघांना विभक्त होऊनही बरीच वर्षं लोटली होती. नीताला फारच एकटेपणा जाणवू लागला. दोन्ही मुलांना गुन्हेगारीच्या जगतापासून दूर राखण्यासाठी दोघांनीही खूप प्रयत्न केले होते. मुलांना कटाक्षाने उत्तम शिक्षण दिलं होतं; पण आता एकटीने सर्व आघाड्या सांभाळणं नीताला जड जाऊ लागलं. आधारासाठी तिला भक्कम खांदा हवा होता आणि तो तिला शरीररक्षक लक्ष्मी झिमन ह्याच्या रूपाने सापडला.

१९९९च्या ऑगस्ट महिन्यात अश्विनला पोलिसांनी अटक केली. तो बांगलादेशाची हद्द पार करून भारतामध्ये प्रवेश करण्याच्या तयारीत होता. त्याला तिहार जेलमध्ये ठेवण्यात आलं. त्यानंतर एका आठवड्यानंतर नीताने एका सनसनीखेज बातम्या छापणाऱ्या नियतकालिकाला मुलाखत देताना म्हटलं, ''अश्विनचं पुनरागमन ही फारशी आनंददायक घटना नाही. पुन्हा एकदा मी फक्त अश्विन नाईकची पत्नी म्हणून ओळखली जाणार. लोकांना कसं सामोरं जावं, हेच मला समजत नाही. मला यापुढे झगडत राहायची शक्तीच उरलेली नाही... अश्विन नाईकची पत्नी आहे, ह्याचा मला पश्चात्ताप नक्कीच नाही; पण मला माझं हे जीवनच असह्य झालंय... त्याला भेटून भविष्यात काय करायचं, ह्या विषयाचा सोक्षमोक्ष लावून टाकायचाच.''

नीताच्या तथाकथित विवाहबाह्य संबंधाविषयी प्रसिद्धी माध्यमांमध्ये बरंचकाही छापून आलं होतं. झिमानशी तिचे संबंध होते, ही गोष्ट अश्विनला

अर्थातच आवडली नव्हती. तो कमालीचा पझेसिव्ह असल्याने, नीताचं असं वागणं त्याला सहन होत नसे. पूर्वीदेखील एकनाथ खानविलकर नावाच्या इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टरचा अश्विनने खून करवला होता. एकनाथने काही काळ त्याच्या घरात कामं केली होती. त्या वेळी नीता नाईकशी त्याची घसट फारच वाढली होती, हे अश्विनच्या कानावर आलं, तेव्हा त्याने एकनाथचा काटा काढला होता. आपल्या माणसांकरवी त्याने नीता आणि झिमनचे एकत्र असतानाचे फोटो काढले होते. ते पाहिल्यानंतर त्याच्या सहनशक्तीचा कडेलोट झाला.

१३ नोव्हेंबर २००० या दिवशी नीता आपल्या भायखळ्यातील घरी परतली. दुपारचे साधारण १२ वाजले असतील. ती दरवाजा उघडत असताना दोघांनी – त्यांची नावं नंतर समजली – एक मनोज भालेकर आणि दुसरा सुनील जाधव – अत्यंत निष्ठुरपणे गोळ्या झाडून तिची हत्या केली. परळ येथील के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये तिला तातडीने नेण्यात आलं. दुसऱ्या दिवशी तिचा मृत्यू झाला.

प्रसिद्धी माध्यमांनी नीताच्या हत्येला ठळक प्रसिद्धी दिली. तिला असं भयंकर मरण आलं, ह्याचं कारण तिचे विवाहबाह्य संबंध हेच आहे, असं लिहून आलं होतं. दुर्दैवाने तिला मृत्युदंड देणारा तिचा पतीच होता. त्याहूनही मोठा दैवदुर्विलास म्हणजे, तिच्या प्रोत्साहनामुळेच तो गुन्हेगारी करण्यास प्रवृत्त झाला होता.

नीताच्या खून प्रकरणी पाच लोकांना अटक करण्यात आली. नंतर त्यापैकी दोघांची सुटका झाली. भालेकर, नीलरतन मुखर्जी आणि जाधव ह्यांच्यावर गुन्हा शाबीत झाला. जाधव पुढे एका एन्काउंटरमध्ये मारला गेला. भालेकर आणि मुखर्जींनी दिलेल्या कबुलीजबाबाच्या आधारे अश्विनवर पत्नीच्या खुनाचा आरोप ठेवण्यात आला. अश्विन तेव्हाही तुरुंगातच होता. स्पेशल मोका लावून अश्विनवर आरोपपत्र ठेवलं गेलं. पोलिसांच्या अहवालानुसार अश्विन तिहार जेलमध्ये असताना, तिथूनच त्याने नीताच्या हत्येचा कट रचला होता.

३१ जानेवारी २००९ रोजी विशेष मोका न्यायालयाने पुराव्याअभावी अश्विनची पत्नीच्या खुनाच्या आरोपातून मुक्तता केली. अश्विन-नीताच्या सुंदर प्रेमकहाणीचा अखेर असा भयानक अंत झाला.

४थी आवृत्ती

आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान

लेखक
निरंजन घाटे

किंमत : १८०/-रु.
पोस्टेज : ३०/-रु.



शेवटचा डायनोसॉर आणि पहिला मानव
यांच्यात सहा कोटी वर्षांचं अंतर आहे.
पृथ्वीच्या जन्मानंतर एक अब्ज वर्षापर्यंत
तिच्यावर एकाही सजीवाचा वावर नव्हता.
माकडापेक्षा वानर वेगळे असतात.
मॅन्ड्रिल माकडाचा चेहरा रंगीबेरंगी असतो.
ज्यांच्यावर आपण राहतो ते खंड सतत सरकत असतात.
कॅम्पोसोग्नॅथस हा डायनोसॉर कोंबडीइतका लहानखुरा होता.
विश्वास नाही ना बसत. हीच तर विज्ञानाची नवलाई आहे.
अशा कितीतरी आश्चर्यजनक गोष्टींचा नजराणा म्हणजे
वैज्ञानिक अलीबाबाची अद्‌भुत गुहाच.
आणि ती उघडण्यासाठी कोणत्याही मंत्राची आवश्यकता नाही.
फक्त ही पानं उलटा आणि हवी तितकी रत्नं गोळा लुटा.

इंग्रजी पुस्तक परिचय

Karen Propp

Karen Propp is the author of two memoirs: *In Sickness & in Health : A Love Story* and *The Pregnancy Project: Encounters with Reproductive Therapy*. Her essays, poetry, and reviews have appeared in *The Women's Review of Books, Lilith,* and *Ploughshares*, and she has won several grants from the Massachusetts Cultural Council. She lives in Cambridge with her husband and son.

Jean Trounstine

Jean Trounstine, author, activist, and professor, published *Shakespeare Behind Bars: The Power of Drama in a Women's Prison*, based on her award-winning work directing plays behind bars. She has been featured on NPR and the *Today* show and has written for the *Boston Globe* and *Working Woman* magazine. She coedited *Finding a Voice* and *Changing Lives Through Literature* and has published a collection of poetry, *Almost Home Free*. She and her husband live in Tewksbury, Massachusetts.

BOOK REVIEW



Why I'm Still MARRIED

Editors
KAREN PROPP
JEAN TROUNSTINE

Price : 395/-
Postage : 30/-

Sometimes the most mundane conversation or fleeting wisps of ideas lead to perception-changing, thought-provoking literary works. An anthology by Karen Propp and Jean Trounstine, titled 'Why I Am Still Married' is one such book that examines a question that probably every woman asks herself in her lifetime. However, be aware, that the book is not a despondent woman's self-help guide to examine her marriage before taking recourse to divorce. In fact, far from it. The clever play of words in the title should give intelligent readers a glimpse of this fact. Instead of titling it as 'Why Am I Still Married', the editors have titled the book as *'Why I Am Still Married'*. It is a confident, knowledgeable narrative by several women in various stages of their married life, about what makes them stay on in that marriage despite the tedium and typicality that inevitably becomes a part of the best of unions. In the foreword itself, Karen and Jean specify what made them compile this anthology. "We wanted to examine

why does one stay married despite knowing that the love may not last; the passion may wean; the independence may be compromised; and one may not even be in control of one's choices? We wanted to know about the real marriages that survive despite obstacles and struggles. We wanted to hear about the longings, losses, and betrayals in conjugal life that had tested their commitment" they explain.

The duo has delved into this research in a finely segregated manner, incorporating write-ups from women in marriages as young as one to five years to those in marriages as old as fifty years! The sub-titular segregation of write-ups as per the number of years spent in marriage, is also riveting. For instance, the section 'From Silver to Gold' has contributors married beyond twenty years at a stretch; whereas the section 'From Paper to Wood' has articles from newly-married women in the first flush of marital life. This segregation enables readers to take stock of the institution of marriage with different socio-cultural scenarios on the backdrop and the effects of the same on the ideas related to marriage. While all essays are mostly bit-sized biographies in their own individual sense, a common thread running through them all is the logic/reason that each author gives for staying on in her marriage. Anne Bernay's essay called 'Fifty Years in the Bonds of Matrimony' talks of the Victorian times when a woman was a feminist in public but a docile, subjugated wife behind the doors. She talks about the emotional turmoil they both went through when Anne decided to revert to her maiden name and drew firm lines about not picking up her husband's dirty laundry from the floor! However, after getting over that storm, the couple couldn't have found better friends to spend the rest of their lives with. In the same section, Bharati Mukherjee's essay titled 'An Experiment in Improvisation' tells about the rigidity of arranged marriage systems and the

subsequent adjustments that she had to make after having a love marriage with a fellow Canadian student, only to develop into a beautiful bond over the years that she never feels like forsaking. In '18260 Breakfasts' Eve Le Plante paints a poignant picture of the sense of belonging that she yearned for all life due to being a child of acrimoniously divorced parents, and how her life finally got stable after marrying David. Children of divorce have a poignant sense of loss. Besides the trauma of the break-up, there's the prolonged pain of missing one parent and the security of an intact family. Eve found that security in David and has glossed over all the negative aspects for that main one. Susan Cheever's article 'Mrs. Married Woman' highlights her sheer love for being in a marriage. She loves the very idea of being married for the sense of belonging, protection and stability that it brings. On a bolder note, Hannah Pine in her article titled 'My Husband, His Girlfriend, Her Husband, My Lover, and Others' talks about being in her marriage for the 'best of both worlds' that it offers. Hannah is in an open marriage where they both are free to date other people. She loves being in such an open marriage that accords her stability and yet gives her the luxury of free choices. In 'First Person Plural' Helen Fremont sheds light on being married to a woman! She elucidates on the joys and pains of this rare coupling that makes her go on despite the occasional bursts of tempers. Women in new marriages talk about savouring the normalcy of a loving, straight relation after coming from a history of parents divorced due to her mother's yo-yoing sexual preferences (Nell Casey, 'Marrying Out of History') and loving the idea of "having my body and my soul in the same place when I go to bed with a man" so as to not give it up for anything, after several years of fearing that a monogamous life if not for her (Kamy Wicoff, 'Monogamy Meltdown').

The stories, all written by established authors, make for interesting reads if nothing more. However, there definitely is much more to every story than it just qualifying as an interesting read. Varied experiences of women from various ages and socio-eco-cultural backgrounds on a common topic, throw up multifarious tangents that make the readers think from angles they might have never explored till then. Yes, the book also tends to get voyeuristic by proffering the unusual pleasure of looking into someone's deeply personal life. For that too, it might seem interesting to read. However, most of all – for Indian readers who look at marriage and its aftermath in a very emotional way – the book dishes out several practical tangents to the institution. It showcases reasons as to why one can remain in a marriage for reasons apart from emotional and societal commitments. It tells us that marriage is worth living in as much for its physical & emotional joy, stability and protection as it is for the freedom, friendship and sheer unbridled fun that it offers. It showcases the various shades that a marriage takes on as it grows in years. Much like finely mulled wine, marriage turns from passionate to protective to humdrum to quarrelsome to even possessive as the years go by; and each of these shades gives us one more reason to stay on.

The book is definitely worth one, if not many reads, for the fantastic flow of language; the deft way in which this delicate subject matter has been handled; and for the sheer variety of experiences and learning that it throws up .

- RESHMA S KULKARNI

Why I'm Still MARRIED

***by* Karen Propp & Jean Trounstine**

Mehta Publishing House, Pune, Rs. - 395/-

प्राच्यविद्यापंडित, सत्यशोधक कॉ. शरद पाटील यांचे निधन

ज्येष्ठ विचारवंत, सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचे संस्थापक, प्राच्यविद्यापंडित कॉ. शरद पाटील (वय ८७) यांचे १२ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले आणि एक मुलगी आहे.

८ मार्चला पक्षाघाताचा झटका आल्याने त्यांना खासगी रुग्णालयात दाखल केले होते. प्रकृती सुधारल्याने त्यांना पुन्हा घरी जाऊ देण्यात आले होते. २३ मार्चला त्यांना महाराष्ट्र इतिहास परिषदेचा वा. सी. बेंद्रे महान इतिहासकार पुरस्कार व १० एप्रिलला सत्यशोधक विचारवंत रा. ना. चव्हाण स्मृतीनिमित्त महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. 'दासशूद्रांची गुलामगिरी' आणि 'अब्राह्मणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र' अशी अनेक गाजलेली पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. अब्राह्मणी वैचारिक परंपरेचा धागा वैदिकपूर्व काळापर्यंत नेण्याचे संशोधन त्यांनी केले आहे.

धुळ्यातील एका सत्यशोधक कुटुंबात १७ सप्टेंबर १९२५ ला त्यांचा जन्म झाला होता. बालपणापासूनच त्यांच्यावर सत्यशोधकी संस्कार झाले होते. अभ्यासू व व्यापक सामाजिक भान असलेले शिक्षक व पालक लाभल्याने बालवयातच त्यांना सामाजिक बांधिलकी व ध्येयवादाची प्रेरणा मिळाली. चित्रकलेसह अवांतर वाचनाचा त्यांना मोठा व्यासंग होता. चित्रकलेत प्रावीण्य असूनही जे. जे. स्कूल ऑफ आर्टसमध्ये तिसऱ्या वर्षाला असताना त्यांना राज्यव्यापी विद्यार्थी संपामुळे शिक्षण अर्धवट सोडावे लागले होते.

१९४५ मध्ये कम्युनिस्ट नेते नथूभाऊ पारोळेकर यांच्या निवडणूक प्रचारार्थ धुळे येथे आलेल्या शाहीर दत्ता गव्हाणकर, शाहीर अमर शेख व शाहीर अण्णा भाऊ साठे यांच्याशी त्यांचा परिचय झाला. स्वत:च्या प्रखर

वैचारिक ध्येयवादामुळे त्यांना कम्युनिस्ट पक्षाचे आकर्षण वाटले. त्यामुळे ते जीवनदानी कम्युनिस्ट बनले. त्यांची वाटचाल सातत्याने संघर्षमय राहिली. गिरणी कामगार चळवळ, संप, तुरुंगवास, हद्दपारी, सत्याग्रह, आदिवासी शेतकऱ्यांच्या हक्काची लढाई अशा अनेक चढ-उतारांतून जाताना त्यांनी वाचनाचा व्यासंग कधीच सोडला नाही. त्यांनी अनेक पुस्तकांचे लेखन केले.

ज्येष्ठ कवी सुधीर मोघे कालवश

'फिटे अंधाराचे जाळे', 'सांज ये गोकुळी', 'दिस जातील, दिस येतील', 'एकाच या जन्मी जणू' यारखी अजरामर गीते लिहिणारे प्रख्यात कवी, गीतकार सुधीर मोघे दीर्घ आजाराने निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते.

संगीत दिग्दर्शन, संवाद लेखन, ललित लेखन, रंगमंचीय सादरीकरण, दिग्दर्शन अशा विविध क्षेत्रांत त्यांनी मुशाफिरी केली होती.

ग. दि. माडगूळकर व शांता शेळके या थोर कवींची परंपरा राखणारा हा कवी होता. गदिमा व शांता शेळके यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी अतिशय सोपे काव्य लिहिले आणि त्यांच्या शब्दाशब्दात श्रोत्यांच्या मनाचा खोल ठाव घेण्याचे सामर्थ्य होते. हेच विलक्षण गुण सुधीर मोघे यांच्याही काव्यात ओतप्रोत होते.

'तात्या' उर्फ वसंत संकपाळ यांचे निधन

सांगलीच्या संकपाळ बुक सेलर्सचे मालक श्री. वसंत लक्ष्मण संकपाळ यांचे सांगली येथे २ एप्रिल २०१४ रोजी निधन झाले. १९८० पासून ते पुस्तक विक्रीचा व्यवसाय करत होते. राज्यशास्त्र विषयाचे ते पदवीधर होते. प्रथम त्यांनी फुटपाथवर बसून जुन्या पुस्तकांचा व्यवसाय केला. हळू हळू नवी पुस्तके पण ठेवण्यास प्रारंभ केला. प्रकाशक आणि घाऊक पुस्तक विक्रेत्यांचा विश्वास संपादन करून चोख व्यवहार ठेवून विक्री वाढवली. १९९९ मध्ये त्यांनी कापड बाजारात मध्यवर्ती ठिकाणी २००० चौ.फू.चे

प्रशस्त ग्रंथदालन संकपाळ बुक सेलर्स या नावाने उभे केले. आज त्यांची दोन्ही मुले हा व्यवसाय सांभाळत आहेत. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे आणि मेहता बुकसेलर्स, कोल्हापूर तर्फे त्यांना श्रद्धांजली.

सुधाताई वर्दे यांचे निधन

स्वातंत्र्य चळवळीमधील अग्रणी आणि राष्ट्र सेवा दलाच्या पहिल्या महिला अध्यक्ष सुधाताई वर्दे यांचे निधन झाले. त्या ८४ वर्षाच्या होत्या. स्वातंत्र्य चळवळीपासून आणीबाणी, नामांतरलढा, महिलांचे हक्क आणि अधिकारांबद्दलच्या अनेक चळवळींमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. 'लोकरंजनातून लोकशिक्षण' हे सेवादलाच्या कलापथकाचे ब्रीद घेऊन त्यांनी या माध्यमातून लोकजागृतीसाठी अवघा महाराष्ट्र पिंजून काढला. राष्ट्र सेवा दलाच्या बहराच्या काळात सुधाताईंची कार्यकर्ता आणि कलावंत या दोन्ही अर्थानेही कारकीर्द बहरली होती. ज्येष्ठ समाजवादी नेते, महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री राहिलेले प्रा. सदानंद वर्दे आणि सुधाताई हे एक परस्परपूरक असे सहजीवन होते. त्यांच्या पश्चात मुलगी झेलम परांजपे व मुलगा अभिजित वर्दे असा परिवार आहे.

राष्ट्र सेवा दलाच्या बहराच्या काळात सुधाताईंनी कार्यकर्ता आणि कलावंत या दोन्ही अर्थानेही कारकीर्द बहरली होती. नृत्यनिपुण सुधाताईंनी आपल्या अभिनयाने सांस्कृतिक जीवन फुलवले. समाजप्रबोधनासाठी वापरले गेलेले कलापथक हे अतिशय ताकदवान माध्यम. वसंत बापट, निळू फुले, अशा दिग्गज कलावंतासोबत त्यांनीही 'पर्यायी रंगभूमी' गाजवली. समता, बंधुत्व, एकात्मता या त्रिसूत्रीवर कार्याची बांधणी केली. दलित शोषित महिलांना मुख्य प्रवाहात स्थान मिळायला हवे यासाठीही त्यांनी आग्रही भूमिका घेतली.

साहित्यिक गार्सिया मार्क्वेझ यांचे निधन

'क्रॉनिकल ऑफ डेथ फोरटोल्ड' 'लव्ह इन द टाइम ऑफ कॉलरा' आणि 'ऑटम ऑफ द पॅट्रिआर्क'सारख्या अभिजात मानल्या गेलेल्या साहित्यकृतींचे नोबेल पुरस्कार प्राप्त लेखक ग्रॅबिएल गार्सिया मार्क्वेझ (वय ८७) यांचे १७ एप्रिल रोजी निधन झाले.

अनुभवांची दाहकता व्यक्त करणाऱ्या मार्क्वेझ यांच्या साहित्यकृतीत विषण्णताही भरलेली होती. त्यांच्या अनेक साहित्यकृतींनी खपाचे लाखोंचे विक्रम केले. जन्माने कोलंबियन असलेल्या गार्सिया यांनी साहित्यजगतात मोठी उंची गाठली. मार्क ट्वेन आणि चार्लस डिकन्स यांच्याबरोबर त्यांची तुलना केली गेली. १९६७मध्ये आलेल्या त्यांच्या 'वन हंड्रेड इयर्स ऑफ सॉलिट्यूड' या साहित्यकृतीच्या २५ भाषांमध्ये पाच कोटींवर प्रतींची विक्री झाली. त्यांच्या कादंबऱ्या आणि लघुकथांनी असंख्य वाचकांना वेड लावले. त्यांना १९८२ मध्ये साहित्याचे नोबेल बहाल करण्यात आले.

छायालेखक व्ही. के. मूर्ती यांचे निधन

दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते ख्यातनाम छायालेखक व्ही. के. मूर्ती यांचे निधन झाले, ते ९१ वर्षांचे होते. गुरूदत्त यांच्या 'प्यासा' व 'साहिब बिबी गुलाम' या चित्रपटात त्यांनी उत्कृष्ट छायाचित्रण केले होते. त्यांच्या पश्चात मुलगी छाया मूर्ती आहे.

भारतीय चित्रपटसृष्टीत दादासाहेब फाळके पुरस्कार हा सर्वोच्च मानला जातो. १९६९ मध्ये हा पुरस्कार सुरू

करण्यात आला. मूर्ती यांना २००८ मध्ये या पुरस्काराने गौरवण्यात आले. मूर्ती यांनी भारतातील महिला सिनेमास्कोप चित्रपट 'कागज के फूल'चे चित्रीकरण केले होते. गुरुदत्त यांच्या चित्रपटांसाठी त्यांनी कॅमेऱ्याचा केलेला उपयोग कलात्मक होता. त्यांनी 'चौदहवी का चाँद' या चित्रपटाचे केलेले चित्रण हा त्यांच्या कामगिरीचा एक आगळा नमुना होता. 'प्यासा' चित्रपटात 'वक्त ने किया क्या हसी सितम' या गाण्यात त्यांनी समांतर आरसे वापरून 'बिम शॅट' घेतला होता. कमाल अमरोही यांच्याबरोबर त्यांनी 'पाकिजा' व 'रझिया सुलतान' हे चित्रपट केले. 'कागज के फूल' व 'साहिब बिबी और गुलाम' या चित्रपटांसाठी त्यांना फिल्मफेअर पुरस्कार मिळाले होते.

त्यांनी पन्नासच्या दशकात गुरुदत्त बरोबर काम सुरू केले. नंतर त्यांनी श्याम बेनेगल यांची 'भारत एक खोज' ही मालिकाही चित्रित केली. १९९३ मध्ये त्यांनी कन्नडमधील 'हुवा हान्नू' हा चित्रपट केला. ॲमस्टरडॅम मध्ये २००५ मध्ये त्यांना चित्रपट अकादमी पुरस्कार देऊन गौरवण्यात आले होते.

मूर्ती यांचा जन्म म्हैसूर येथे १९२३ मध्ये झाला. त्यांनी १९४३-४६ या काळात एस. जे. पॉलिटेक्निक या बंगळुरूच्या संस्थेतून छायालेखनाचा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला होता.

'मेहता पब्लिशिंग हाऊस'ची वाचकांसाठी सुवर्णसंधी...

आता महाराष्ट्रातील खालील ठिकाणी कॅश ऑन डिलिव्हरीची सुविधा उपलब्ध!

अकोला	कोल्हापूर	नाशिक	बारामती	उल्हासनगर	सातारा
अमरावती	चन्द्रपूर	नांदेड	मुंबई	कल्याण	सांगली
अहमदनगर	चिपळूण	पुणे	वाशी	शहापूर	सोलापूर
औरंगाबाद	जळगाव	पिरंगुट	ठाणे	पनवेल	
कणकवली	नागपूर	पिंपरी	भिवंडी	कळंबोली	
कराड	बुटिबोरी	पंढरपूर	वसई	लातूर	

१०००/- रुपये (Net) किंवा अधिकच्या खरेदीवरील पुस्तके
कॅश ऑन डिलिव्हरीच्या माध्यमातून आपल्याला घरपोच मिळू शकतात.
१००/- Handling Charges राहील.



एल्मर आणि हरवलेला टेडी

रात्रीची वेळ होती. सगळीकडे काळोख दाटून आला होता. आकाशात चांदण्या चमचम करत होत्या. सगळीकडे शांतता पसरलेली होती. एवढ्यात आपल्या 'पॅचवर्क'वाल्या एल्मर हत्तीला कुणाच्या तरी रडण्याचा आवाज ऐकू आला. ते हत्तीचं छोटं पिल्लू होतं.

''काय झालं? हा छोटू का रडतोय?'' एल्मरनं त्या पिल्लाच्या आईला विचारलं. ''अरे, त्याला त्याचा टेडी हवाय. पण काल आम्ही ट्रीपला गेलो होतो ना, तिथे कुठे तरी त्याचा टेडी हरवला. आणि टेडीशिवाय हा काही झोपायला तयार नाही, म्हणून चाललीय रडारड!'' पिल्लूच्या आईनं सांगितलं.

''काकू, तुम्ही काही काळजी करू नका. आत्तापुरता मी माझा टेडी त्याला देतो. आपण उद्या त्याचा टेडी शोधू.'' एल्मर समजूतदारपणे म्हणाला.

घरात जाऊन एल्मर स्वत:चा टेडी घेऊन आला आणि तो त्या पिल्लाला दिला. टेडी पाहून पिल्लू खूश झालं

आणि त्याला जवळ घेऊन लगेच गाढ झोपला– सुद्धा!

दुसऱ्या दिवशी सकाळी एल्मर टेडीच्या शोधात निघाला. तो थोडंच अंतर गेला असेल... एवढ्यात त्याला त्याचा चुलत भाऊ विल्बर भेटला.

"काय म्हणतोस? कसा आहेस?" एल्मरनं चौकशी केली आणि म्हणाला, "अरे, आमच्या शेजारच्या छोट्याचा टेडी हरवलाय. तो शोधायला मी बाहेर पडलोय. तुला कुठे दिसला का एखादा टेडी?"

"नाही बुवा. पण दिसला ना, तर मी तुला नक्की सांगेन." विल्बर म्हणाला.

एवढ्यात एल्मरला कुणी तरी आपल्याशी बोलतंय, असं वाटलं. "हॅलो एल्मर, सकाळी सकाळी कुठे निघाला आहेस?" सिंह विचारत होता.

"काय सांगू सिंहदादा? आमच्या शेजारच्या छोटूचा टेडी हरवलाय, तोच शोधतोय." एल्मर उत्तरला.

"टेडी हरवलाय? मग झालंच! अरे, आमच्या छाव्याला पण टेडीचं फार वेड आहे. त्याचा टेडी जरा कुठे दिसला नाही की, तोही लगेच भोकाड पसरतो. हे बघ, मला दिसला ना, तर मी लगेच तुला बोलावणं पाठवेन. त्या वाघोबाला विचारून बघ बरं. एखाद वेळेस त्यानं बघितलं असेल." सिंह म्हणाला.

एल्मर वाघाच्या गुहेपाशी पोहोचला. त्यानं बाहेरूनच जोरात हाक मारली – "योहो भाऊ!" त्याची हाक ऐकून वाघ दबक्या पावलांनी बाहेर येत म्हणाला, "शूऽऽ... हळू बोल.

माझी जुळी बाळं आताच झोपलीत!''

''सॉरी हं. मला माहीत नव्हतं.'' एल्मरनं दिलगिरी व्यक्त केली आणि म्हणाला, ''काही काम नव्हतं माझं, पण आमच्या शेजारच्या छोटू हत्तीचा टेडी सापडत नाहीये. तुम्ही बघितलात का कुठे?''

''टेडी का? आत्ताच्या या मुलांना असल्या खेळण्यांची फार सवय लागलेली असते. आमच्याहीकडे तेच आहे. आमचेही दोन्ही बछडे त्यांच्या टेडींशिवाय झोपत नाहीत. बरं, तुमचा टेडी दिसला तर तुला आवाज देईन ना मी!'' वाघोबा म्हणाला.

एल्मर तसाच पुढे गेला. त्याला इतरही प्राणी भेटले.

त्यांच्या सगळ्यांच्या बाळांकडे त्यांचे-त्यांचे टेडी होते, पण छोटूचा टेडी कुणालाच दिसला नव्हता. सगळ्यांचं एकच उत्तर होतं, ''आम्हाला दिसला, तर तुला सांगू!''

आता दुपार व्हायला लागली. एल्मर सकाळपासून टेडीला शोधत फिरत होता, पण अजूनही तो सापडत नव्हता. ''सापडेल, सापडेल.'' असं म्हणत एल्मर स्वत:चीच समजूत घालत होता.

हळूहळू संध्याकाळ झाली. अंधार पडायला लागला. एवढ्यात ''मी हरवलोय... मला कुणी तरी घ्या. मला घरी जायचंय...'' असं म्हणत मुसमुसण्याचा आवाज आला. एकदा नव्हे, दोनदा. कुणी तरी रडत होतं.

एल्मर त्या आवाजाच्या दिशेनं पुढे झाला. दोन-तीन झुडपं बाजूला सारून बघतो, तर काय! तिथे टेडी बेअर होतं. तेच रडत होतं. ''ए हत्तीदादा, मला घे ना. मला माझ्या छोटू हत्तीकडे जायचंय. मला त्याची खूप आठवण येतेय. मी ना, हरवलोय. मला घेऊन चल छोटूकडे – प्लीऽजऽऽ'' टेडी म्हणालं.

''अरे! गंमतच आहे! टेडी असून तू चक्क चक्क



बोलतोयस?'' एल्मर आश्चर्यानं म्हणाला.

''हो. पण ते जाऊ दे; मला आधी छोटूकडे पोहोचव. मला त्याच्याशिवाय झोप नाही येत.'' टेडी रडवेला होऊन म्हणाला.

पण एल्मरला ते खरं वाटत नव्हतं. त्यानं त्याच्याकडे नीट पाहिलं. ''तुझा आवाज येतोय, पण तुझं तोंड कुठे हलतंय?'' त्यानं विचारलं. एवढ्यात गमत्या विल्बर झाडातून बाहेर आला.

''हं, विल्बर! या टेडीसाठी तूच आवाज काढून बोलत असणार, हे माझ्या लक्षात यायला हवं होतं.'' एल्मर हसत-हसत म्हणाला.

''मी तुला प्रॉमिस केलं होतं ना, टेडी दिसला की, मी तुला हाक मारेन. म्हणून मी हाक मारून तुला बोलावलं. चल, आता मात्र आणखीनच अंधार पडायला लागलाय. आपण आधी या टेडीला छोटूकडे घेऊन जाऊ.'' विल्बर म्हणाला.

दोघंही टेडीला घेऊन गाणी म्हणत, नाचत घराकडे निघाले.

छोटूनं आपल्या टेडीला बघून आनंदानं टुण्कन उडीच मारली. टेडीला जवळ घेतलं आणि शहाण्या मुलासारखा एल्मरचा टेडी त्याला लगेच परत देऊन टाकला.

एल्मर आणि विल्बरचे कसे आभार मानावेत, हे छोटूच्या आईला कळेना. तिलाही खूप आनंद झाला. तिनं दोघांना खाऊ देऊन शाबासकी दिली. दोघंही घरी जायला निघाले.

वाटेत विल्बरनं एल्मरला विचारलं, ''काय रे, त्या छोटूला तुझा टेडी तू तात्पुरता दिलास; पण त्यानं तुला तुझा टेडी परत दिला नसता तर? तुला काळजी नाही वाटली? कारण, तुझा टेडी कसा एकदम मस्त ''स्पेशल'' आहे ना!''

त्यावर एल्मर म्हणाला, ''तसं काही नाही. माझा एकट्याचा टेडी स्पेशल नाहीये; सगळेच टेडी स्पेशल असतात. आणि